म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ९०३
IRBK-0100903
IRBK-0100903
IRBK-0100903

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
आ. नं. १७९/२

G10700903

IRBK-0100903

IRBK-0100903

नाटक १५८

नाट २८८

# कविवर्य रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनि यांचा अभिप्रायः-

तुमचें नवीन नाटक "पेशवाई" वाचिलें, एकंदरींत बरें साधलें आहे. शेवटच्या बाजीरावाच्या वेळीं त्याच्या अनाचारानें व जुलमानें लोक कसे त्रस्त होऊन गेले होते, व टोपिवाल्यांचें न्यायी राज्य येईल तर बरें अशी बहुतेक लोकांची इच्छा झाली होती हें तुम्हीं बरोबर दाखविलें आहे. आपापसांतल्या दुहीमुळें, द्वेषानें, ... उगाविण्याच्या बुद्धीनें राष्ट्रांत कोणा एकाची सत्ता प्रबल राहिली नव्हती, हेंही बरच.

पण शील-वर्णनासंबंधें आक्षेप घेतां येतील. तुम्हीं बाजीरावाला दुधखुळें केलें. ...च्यापेक्षां त्याचा नौकर जास्त समंजस ठरविला आहे. इतिहास व बखरी वाचून ...झा असा समज झाला आहे कीं, भाषणगौरवांत त्याची कडी एल्फिन्स्टनसाहे-बावर होती. त्यानें साहेबांस पुष्कळदां चकविलें आहे. पण स्वतः तो कधीं ...ला नाहीं.

# अभिप्राय.

"रा. कृष्णाजी हरि दीक्षित यांचेकडून पेशवाई नाटक अभिप्रायार्थ आलें आहे. नाटक वाचून तत्कालिन समाजाचें यथार्थ चित्र कल्पनेपुढें उभें रहातें. सर्व पात्रांचें स्वभाववर्णन इतकें हुबेहुब साधलें आहे कीं, १९१७ चा विसर पडून आपणही १८१७ सालांतच आहोंत कीं काय असा वाचकांस भास होऊन तोहि श्रीमंताचा विचित्र स्वभाव पाहून कष्टी होतो, बाळाजीपंतांचा तिरस्कार करूं लागतो, अन्याबावर रागावतो, गोखले, विंचूरकर, पुरंदरे वगैरे सरदारांची स्वामिभक्ति पाहून प्रसन्न होतो, लक्ष्मीची निष्काम राष्ट्रसेवा पाहून गहिंवरतो आणि अखेरीस अपयश आलें म्हणून उद्विग्नतेंत बुडतो ! केवळ नाटक वाचीत असतां चित्तवृत्ति क्षणभर तल्लीन होते, तर प्रत्यक्ष नाटक पाहून प्रेक्षकाचे मनावर विशेषच परिणाम घडत असेल असें वाटतें. कांहीं कांहीं नाटकांवरून एकंदर नाटकांविरुद्ध जो पुष्कळांचा ग्रह झालेला असतो, तो बदलण्यास असलीं नाटकें उपयोगी पडतील. शक्य त्यानें एकवार हें नाटक वाचावें, जमेल तर पहावें; म्हणजे १८१७ सालची बरोबर कल्पना होऊन प्रत्येकाला आपआपल्यापरीं बोध घेण्याला साधन होईल."

धुळें.
१८४१ भाद्रपद शु॥ ४ } शंकर श्रीकृष्ण देव.

( पहिल्या आवृत्तीस मीं लिहिलेले ' दोन शब्द '

श्रीराम.

# माझे दोन शब्द.

' सुदर्शन ' नाटकाचें पुस्तक १९१७ चे आगष्ट महिन्यांत प्रसिद्ध झालें. त्याचे-वर " पुढील नवीं नाटकें " या सदराखालीं पेशवाईचा उल्लेख केला होता. त्याचे आधींच म्हणजे जुलै महिन्यांत ' नाट्यकला प्रसारक कंपनी ' नेंही ' केसरी ' तून ' लवकरच करणार ' या सदराखालीं ' पेशवाई ' जाहीर केली होती. १८१८ जून ३ तारखेस ' पेशवाई ' चा बेदावा झाला, तेव्हां बरोबर शंभर वर्षांनीं त्याच तारखेस ' पेशवाई ' रंगभूमीवर आणून तिचें शतसांवत्सरिक श्राद्ध करावें, हा हेतु होता. त्याप्रमाणें १९१८ च्या मार्च महिन्यांत ' पेशवाई ' चें लेखनही सुरू केलें. दुसऱ्याच अंकाच्या मध्यास कुटुंब-वियोगाचा प्रसंग ओढवला तरी केवळ कर्तव्यावर नजर देऊन सुतकामध्येंच हें अत्यंत शोकपर्यवसायी नाटक पूर्ण करून शोकास शोकानें छेद दिला ! कंपनीनेंही जून ३ तारखेलाच नाटक रंगभूमीवर आणावयाचें अशी जारीनें तयारी चालविली. पण भवितव्यतेचा विलक्षण योग असा कीं एप्रिल अखेरपासून जून अखेरपर्यंत कंपनीवर कल्पनातीत बिकट प्रसंग ओढवले ! पण अखेरीस निश्चयाचे बळाला १९१८ चे आगष्ट महिन्यांत फळ आलें; आणि पहिला प्रयोग ' पेशवाई ' च्या राजधानींत म्हणजे सातारा येथें झाला.

अशीच स्थिति या पुस्तकाचीही झाली. गेल्या सप्टेंबरांत सर्व पुस्तक प्रस्तावना वगैरे इतर भाग आणि फोटो यांशिवाय छापून तयार होतें. पण मध्यंतरीं माझ्यावर आणि माझ्या हितचिंतकांवर असे कांहीं विलक्षण स्थित्यंतर करणारे प्रसंग गुदरले कीं त्यामुळें हें पुस्तक सूर्यप्रकाश तरी पहातें कीं नाहीं असें

वाटूं लागलें. अखेरीस.याही कार्याला यश येऊन श्रीरामप्रभूचें भक्त-वात्सल्य प्रत्ययास आलें.

ता. ३१ आगष्ट १९१८ इ. रोजीं सातारा येथें पहिला प्रयोग झाला. त्यावर ता. ४ सप्टेंबरच्या तेथील ' श्रीशाहू ' मध्यें श्री. मृगराज यांनीं आपलें परीक्षण प्रसिद्ध केलें आहे. त्याचा बराच भाग या पुस्तकास मुद्दाम जोडला आहे. त्यांत ' केळकरांचें पुस्तक ( मराठे व इंग्रज ) पाहूनच कदाचित् दीक्षितांना नाटक लिहिण्याची कल्पना सुचली असेल, ' असें म्हटलें आहे. पण हें विधान वरील हकिगतीवरून चुकीचें आहे, हें समजून येईल. रा. खाडिलकरांच्या आणि माझ्या नाट्यकथानकांचा विलक्षण योगायोग झाला आहे. त्याचाही फायदा माझ्या विरोधी मित्रांनीं मनसोक्त घण्याला कमी केलें नाहीं. त्यांना ' पेशवाई ' आणि ' मराठे व इंग्रज ' यांचा योग हें नवीनच खाद्य अनायासें मिळालें आहे. विपरीत ग्रह झालेल्या हटवाद्यांना वस्तुस्थिति काय आहे हें पाहण्याची सुबुद्धि केव्हां होईल तेव्हां होवो !

खरें पाहूं गेलें तर ' पेशवाई ' लिहिण्याची ऊर्मी मला आनुवंशिक आहे. माझे परमपूज्य वडील कै. हरि आप्पाजी दीक्षित यांनीं ' अनाचार दुष्परिपाक अथवा धाकटे बाजीराव पेशवे यांची राज्यच्युति ' या नांवें चार अंकीं गद्य नाटक लिहिलेलें असून तें सन १८८८ सालीं मुंबईंत फ्यामिली प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध झालें आहे. बऱ्याच लायब्ऱ्यांमध्यें या पुस्तकाच्या प्रती अद्यापही आढळतात. त्या पुस्तकाच्या नेहमींच्या सान्निध्यानें जशी मला नाट्यलेखनाची गुरुकिल्ली मिळाली तशीच पेशवाईचीही स्फूर्ति झाली. माझ्या वडिलांनीं लिहिलेल्या ' राज्यच्युती ' ला रंगभूमीवर आणून महाराष्ट्राची सेवा करावी, या माझ्या हेतूला पेशवाईच्या शतसांवत्सरिक श्राद्धतिथीच्या शिवाय अनुकूल आणि योग्य समय दुसरा कोणता असणार ? " मराठे व इंग्रज " यावरून ' पेशवाई ' ची कल्पना सुचली म्हटल्यापेक्षां ' पेशवाई ' वरून ' मराठे व इंग्रज ' लिहवून घेण्याचें ' प्रिंटिंग एजन्सी ' च्या लक्षांत आलें व तें रा. केळकरांनीं तांतडीनें लिहून दिलेंही, असें म्हटलें असतांच कदाचित सत्याच्या जवळ जवळ येऊं. गाजावाजा करण्याचें एखादें साधन माझ्या हातीं असतें

तर " मृगराज " यांना ' कदाचित् ' शब्द घालून सुद्धां ती शंका लिहून दाखविण्याची जरूरी मीं राहूं दिली नसती. कांहीं असो. ' मराठे व इंग्रज ' हें उपयुक्त पुस्तक याच संधीस बाहेर पडलें हें महाराष्ट्रास उपयुक्तच झालें आहे, यांत शंका नाहीं. असो.

आतां माझ्या वडिलांनीं आपल्या पुस्तकास जोडलेल्या प्रस्तावनेचा महत्त्वाचा भाग येथें उद्धृत करतों. त्याशिवाय मीं आणखी कांहीं लिहिण्याला पाहिजे असें मला वाटत नाहीं. माझे वडील लिहितात:—

' पेशवाई कशी बुडाली, अनाचाराचा परिणाम काय होतो, कुबुद्धीचें फळ काय, हें या नाटकांत वर्णिलें आहे. गृहकलह हा मूळ नाशाचा पाया होय. कृत्या आनंदीबाईनें भोळ्या काकाला घेरून बिचाऱ्या नारायणरावाला गारद्यांचा बळी केलें; तेव्हांच या पेशवाईची गादी डगमगली; ती खालावत जाऊन रावबाजीला बेदावा लिहून देण्याची वेळ आली ! नाहींतर एवढें जोरदार राज्य दोन बारांत पार व्हावयाचें नव्हे. आणि बखरी लिहिणारे म्हणतात कीं ' पेशवे यांचे वंशांत बाजीराव साहेब यासारखा बेहिमती, दुसऱ्याचा विश्वास नाहीं, शहाणे मनुष्य जवळ ठेवावयाचें नाहीं आणि अंगांत शिपाईगिरीही नाहीं ' तें सत्य आहे.

" अशाचें वर्णन कां करितां ? दुसरीं सुंदर सुंदर चरित्रें नाहींत काय ? खरें तें. पण सगळ्यांनीं आपल्या लोकांच्या गुणांचेंच वर्णन केलें तर दुर्गुणांचें तरी कोणी करावें ? ' अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ' आतां धाकटे बाजीराव स्वतांच गादीला अपाय करणारे आहेत, असें नाना फडनवीस म्हणत होतेच. त्यांत आणखी आमचे शाईर सगनभाऊही म्हणतात कीं, " चौघांनीं भरी भरून घातली गोष्ट बिशादीला । फुटली मूठ आंवळ्याची राव पडला अवकाळीला" असेंही झालें आहे. खरें. "

हें लिहिणें ३५।४० वर्षांपूर्वीचें म्हणजे ' पेशवाई ' बुडाल्यावर ६०।७० वर्षांनंतरचें आहे, हें मात्र लक्षांत आणावें.

गंगाधरशास्त्री पटवर्धन, गायकवाडांचे पुण्यास आलेले वकील, यांस त्रिंबकजी डेंगळ्यानें मारल्यानंतर ( १८१५ ) बाजीराव मालकम साहेबास शरण जाईपर्यंतचा ( १८१८ ) अडीच वर्षांचा दुःखमय इतिहास यांत रेंखाटला आहे. एक

लक्ष्मीखेरीज सर्व पात्रें ऐतिहासिक आहेत. पुष्कळ प्रसंग ऐतिहासिक सत्य आहेत. फारच थोडा भाग माझा आहे. पुष्कळसे प्रवेश माझ्या वडिलांच्या नाटकांतलेच आहेत. सध्यांच्या रंगभूमीला योग्य असें रूप देऊन माझ्या वडिलांच्याच नाटकाचा मीं जीर्णोद्धार केला आहे, असेंच म्हणावें. गंगाधरशास्त्री मारला याचें कारण त्याच्याबरोबरचीं 'फक्कड पांखरें' असें इतिहास बोलतो, तेव्हां त्या आधारावरच लक्ष्मीच्या पात्राची उठावणी केली आहे.

पुस्तकलेखक आणि प्रस्तावनाकार यांचा संबंध गवई आणि त्यांचे बजवय्ये साजिंदे या सारखा असतो, असा आपला प्रत्यहींचा अनुभव आहे. "तेहि नो दिवसा गताः" हा प्रस्तावना दाखल माझे मित्र रा. सीताराम दिनकर जोगळेकर बी. ए., एलएल. बी. हायकोर्ट वकील, मुंबई यांचा विस्तृत लेख वरील प्रचलित समजुतीला अगदीं धरूनच आहे असें नाहीं. रा. जोगळेकर हे नाट्यविषयाचे अत्यंत आस्थेवाईक व्यासंगी आहेत. तेव्हां त्यांचा लेख प्रस्तुत लेखकाविषयींचें लोकमत आणि नाट्यकलेची सद्यःस्थिती यांची कायमची स्मृति राखणारा होईल, यांत शंका नाहीं.

सर्व मराठी साम्राज्याचा इतिहास नाटक रूपांत आणावा असा संकल्प आहे. त्याप्रमाणे 'यक्षिणीची कांडी'—बाजी देशपांडे व श्रीशिवाजी महाराज यांच्या हातमिळाफीचा प्रसंग दाखविणारें नाटक—लिहून तयार होऊन सुप्रसिद्ध व जुन्यांत जुनी नाट्यकलाप्रवर्तक नाटक मंडळी तें आगष्टच्या २ ऱ्या तारखेपासून रंगभूमीवर करूं लागली आहे.

शेवटीं इच्छा हीच की या वाङ्‌यज्ञानें तो राष्ट्रदेव, तो माझा श्रीरामप्रभु संतुष्ट होवो व सर्वांचें कल्याण करो.

शहापूर—बेळगांव,<br>
१८४१ विजयादशमी

कृष्णाजी हरि दीक्षित.

[ पहिल्या आवृत्तीस रा. जोगळेकर यांनीं लिहिलेली प्रस्तावना. ]

॥ श्री ॥

## ते हि नो दिवसा गताः ।

कालाची गति अतर्क्य आहे. इतिहासकारांनीं अथवा राष्ट्रांच्या उत्कर्षाचें व अपकर्षाचें निरीक्षण करणाऱ्या मोठ्या माणसांनीं "इतिहासाची पुनरावृत्ति होत असते," असें म्हटल्याचें वारंवार ऐकण्यांत येत असतें. हें खरें असो वा नसो; परंतु आजच्या परिस्थितींत त्या म्हणण्याची सत्यता मनाला पटण्यासारख्या गोष्टी घडून येत आहेत, पेशवाईची आठवण आम्हांस–प्रत्यक्ष पेशवाईचीं सुखदुःखें अनुभवलेल्या माणसांच्या दुसऱ्याच पिढीच्या वंशजांस– आज १०० वर्षांनीं व्हावी, व यापूर्वी तिच्या आठवणीचा मागमूसही दृष्टोत्पत्तीस येऊं नये यांतील बीज काय ? आज पेशवाईचें अस्तित्व दाखविणाऱ्या गोष्टींपैकीं बहुतेक गोष्टी कालाच्या ओघाबरोबर लुप्तप्राय झाल्या आहेत. राजकीय, सामाजिक, धार्मिक, व्यावहारिक, व्यापारविषयक अथवा इतर कोणत्याही बाबींत आमच्या समाजाचें १०० वर्षांत इतकें परिवर्तन झालें आहे कीं, त्या वेळच्या एखाद्या माणसास त्या वेळची स्थिति पहातां पहातां झोंप लागली अशी कल्पना केली व तो आज रिप् वॅन विंकलप्रमाणें जागा झाला असें कल्पिलें, तर त्यास हल्लींचा समाज पूर्वींच्या पिढीच्या वंशजांचा अथवा दुसऱ्याच कोणाचा त्याचा उलगडा होणें फार कठीण–किंबहुना अशक्य– होईल. पेशवाई अस्तित्वांत असतां जे आमचे आचार विचार होते ते चांगले अथवा हल्लींचे चांगले याबद्दल मतभेद असेल –नव्हे तो आहे– याची साक्ष अद्यापि आम्हांस पदोपदीं पटत आहे. जुन्याची व नव्याची सरमिसळ होत असतां जुन्याचे अभिमानी व नव्याचे पुरस्कर्ते यांजमध्यें स्वभावतः मतभेद असणारच. परंतु पेशवाईचे वेळीं–पेशवाई जात असतां – पेशवाईचें अखेरचें दर्शन प्रजेस होत असतां व तें दर्शन प्रजेच्या दृष्टीसमोरून बाजूस दृष्टीआड होत असतां— जी सामाजिक स्थिति होती ती आज प्रजेची नाहीं, याबद्दल दुमत होणें शक्य नाहीं. ज्या राजकीय आकांक्षा जनतेच्या मनोभूमीवर पेश-

वाईच्या वेळीं आपला प्रभाव गाजवीत होत्या, ज्यांच्या उसळीमुळें आमच्या हल्लींच्या प्रभूस बराच काळपर्यंत अस्वस्थपणा आला होता, त्यांचा आतां कालाचे प्रभावानें मागमूसही लागेनासा झाला आहे. त्या वेळचा व्यापार, व्यापारी वर्ग, व्यापारी माल, इतकेंच काय पण व्यापारी गिऱ्हाईकही नाहींसें झालें, याबद्दलची साक्ष हल्लींची परिस्थिति देत आहे. सृष्टि प्रतिक्षणीं बदलत जात असते असें म्हणतात. त्या मताप्रमाणें पाहिलें तर त्या वेळचें पुणें शहर —पेशवाईची राजधानी— ज्या स्थितींत होतें, त्या स्थितींत तें आतां नाहीं हें निर्विवाद आहे. त्या वेळची पर्वती जी भाषा बोलत असेल ती भाषा आतांची पर्वती—अथवा तेथील पडकीं भिंताडें — बोलणें शक्य नाहीं. शनवारवाडा, कीं ज्या ठिकाणीं पेशवे बोलले, पेशवे हंसले–पेशवे खेळले–पेशव्यांनीं सरदारांशीं मसलत केली, तो शनवार वाडा आज आपणांस–त्याच पेशवाईच्या लेंकरांस– काय सांगेल ? ज्या वाड्यांत स्वराज्याचा परिपोष कसा करावा याबद्दल विचार चालू होता, त्याच वाड्याच्या आवारांत मुदतीच्या कायद्याची अगर दुसरी कसली तरी हरकत आणून रास्त, न्याय्य व प्रामाणिकपणें देणें असलेला पैसा —संपत्ति कशी बुडवावी याविषयीं विचार करणारीं डोकीं काय करीत असतील असें अनुमान करण्यास पुष्कळ जागा आहे. इतक्या गोष्टी पेशवाईचा विसर पाडण्यास सज्ज होऊन बसल्या आहेत. हें परिवर्तन पेशवाईचा विसर पाडण्यास कारणीभूत झालें, अथवा पेशवाईच्या विसरामुळें हें परिवर्तन घडून आलें याचा निर्णय करणें कठीण आहे. इतकी गोष्ट मात्र खरी कीं, पेशवाई प्रत्यक्ष पाहिलेलीं माणसें आज हयात नाहींत. *

ज्यांचें बालपण पेशवाई नष्ट झाल्यानंतर सुरू झालें, ज्यांनीं तरुणपणांत पेश-

---

* नुकतेंच पेशवाई प्रत्यक्ष पाहिलेल्या किंबहुना पेशवाईशीं अत्यंत निकट संबंध असलेल्या एका साध्वींचें देहावसान झालें, हें सर्वांस माहित असेलच. पेशवाईचें अस्तित्व संपून बरोबर १०० वर्षांच्या सुमारासच त्या थोर परंतु अनुकंपास्पद घराण्यांतील जवळ जवळ शेवटच्या व्यक्तीचा अंत व्हावा, हा योगायोग विचित्र तर खराच; परंतु अंतःकरणाला चटका लावणारा नाहीं काय ?

वाईची वाईट बाजूच ऐकिली, ज्यांच्या मध्यम वयांत ' पेशवाई ' हा शब्द जुन्यापुराण्या, कमदर्जाच्या, हीनतेज अशा समाजस्थितीचा समानार्थक म्हणून रूढ झाला, त्यांस पेशवाईचें शतसांवत्सरिक श्राद्ध करावें असें कां वाटावें, हा प्रश्न विचारणीय आहे.

पेशवाईच्या वेळची स्थिति व आजची स्थिति यांत असें काय साम्य आहे कीं ज्याच्या योगानें आमच्या मनांत पेशवाईची आठवण जागृत व्हावी ? पेशवाई जरी आम्हीं प्रत्यक्ष पाहिली नाहीं, तरी त्या वेळचा इतिहास आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांच्या कृपेनें आह्मांस अवगत होण्याचें साधन उपलब्ध झालें आहे. ग्रँटडफसाहेब अथवा त्या वेळचा अधिकारीवर्ग यांच्या वेळीं काय स्थिति असेल ती असो, परंतु हल्लीं जुन्या वस्तूंचा नाश करण्याच्या प्रवृत्तीच्या ऐवजीं पुराण-वस्तु-संशोधन व जुन्या वस्तूंचा संग्रह करणें या गोष्टींकडे येथील नोकरशाहीचें लक्ष लागलें आहे, व यामुळेंच जुनें दप्तर आह्मांस पहाण्यास मिळत आहे. या दप्तराकडे पाहिलें तरीं पेशवाईच्या या राहिल्या साहिल्या कागदपत्रांनीं आम्हांस केवढें ज्ञान खुलें करून दिलें, याची कल्पनाही करवत नाहीं. बरेच दिवस जेवण न मिळाल्याकारणानें बुभुक्षित झालेला भिकारी ज्याप्रमाणें कसलेंही अन्न मिळ-तांच त्यावर तुटून पडतो, त्याप्रमाणें जुन्याची ओळख विसरण्याच्या पंथास लाग-लेले व अतएव जुन्या इतिहासाच्या ज्ञानांत पूर्ण दारिद्र्य भोगणारे भिकारी, जुनीं बाडें सांपडतांच त्यांवर इतके हुरळून गेले कीं, फलाणा मनुष्य जेवला केव्हां, अमक्यानें भाजी कसली लावली, तमक्याच्या गाई किती होत्या, इत्यादि प्रका-रच्या मजकुरानें भरलेलीं पत्रें सुद्धां आह्मांस फार महत्वाचीं अशीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें वाटूं लागलीं व तीं आम्हीं छापून काढूं लागलों. नोकर-शाहीनें छापखान्याचा कायदा केला व दुसऱ्या एका कायद्यानें अडचणीचें व आक्षेपार्ह वाङ्मय जप्त करून नष्ट करण्याची तजवीजही केली. परंतु त्या काय-द्याची अंमलबजावणी या जुन्या दप्तराचें अस्तित्व नाहींसें करूं शकली नाहीं, यावरून नोकरशाहीसही जुन्या वस्तूंचें महत्व पटत चाललें आहे, हें उघड नाहीं काय ? असो. तर या सवलतीमुळें पेशवाईची आठवण जागृत केली. पहिले पेशवे श्रीमंत बाळाजीपंत श्रीवर्धन सोडून घाटावर गेले, त्या वेळेस सामाजिक

स्थिति काय होती, धान्याचे भाव कसे होते, वाहनें कोणतीं असत, मार्गांत अड-चणी किती होत्या, त्या वेळच्या राजकारणी पुरुषांपुढें कोणतें ध्येय असे व त्याच्या परिपोषणार्थ ते कसे यत्न करीत, या माहितीपासून तों श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब यांच्या वेळीं काय स्थिति होती याबद्दलची माहिती आह्मांपुढें हीं दप्तरें सांगूं लागलीं व त्यामुळें साहजिक पेशवाईची माहिती प्रत्यक्ष जरी नाहीं तरी परंपरेनें आह्मांस होऊं लागली. स्वत्वाचा अभिमान सर्वांसच असतो; त्याप्रमाणें तो आम्हांसही उत्पन्न झाला; व आमच्या राज्यकर्त्यांच्या वहिवाटीस अनुसरून आम्हांसही जुन्याचें स्मरण, जुन्याचें संगोपन करावें असें वाटूं लागलें.

दुसरें असें कीं, आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांच्या चालीरीतींचा पगडा आम-च्यावर आमच्या नकळत बसत चालला आहे. त्यांचा पोषाख आम्हीं उचलला. त्यांच्या रीतिरिवाजांचें अनुकरण आम्ही करूं लागलों. फार काय पण स्त्रीजा-तीच्या संबंधीं दाक्षिण्याच्या प्रचलित कल्पना आम्हीं पाश्चात्यांपासून च उचलल्या. अनुकरणाची ही आवड गणपतींच्या मूर्तीमध्येंही इतकी दृग्गोचर होत आली आहे कीं, कित्येक " सार्वजनिक " गणपतींचे पोषाखही नव्या परंपरेचे द्योतक दिसून आले आहेत. असो; तर एकंदरींत ही अनुकरणप्रवृत्ति बाकीच्या बाबतींत ज्याप्र-माणें दिसूं लागली, त्याप्रमाणें ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव करण्याच्या बाबतींतही दिसून आली. श्रीशिवाजी महाराजांचा महोत्सव आज आपण कित्येक वर्षें करीत आहोंत. आमच्या राज्यकर्त्यांच्या समाजांतील हा रिवाजही आम्हीं उच-लला व आम्हीही असे उत्सव करूं लागलों. पेशवाईचा उत्सव—अथवा श्राद्ध—करण्याची कल्पनाही याच प्रवृत्तीची द्योतक नाहीं काय ? अशा तऱ्हेचे उत्सव भिन्न भिन्न अंतःकरणांत भिन्न भिन्न मनोवृत्ति उत्पन्न करीत असले, तरी या उत्स-वांची कल्पना राज्यकर्त्यांपासून आह्मीं उचलली यांत संशय नाहीं. या दृष्टीनें पाहिलें तरी पेशवाईची आठवण अथवा आठवणीचा देखावा १०० वर्षांनीं दाख-विण्याची स्फूर्ति आम्हांस झाली, हे ओघानें येणारें आहे.

शिवाय पेशवाईच्या अंताच्या वेळची परिस्थिति व आजची परिस्थिति यांत एक विलक्षण साम्य आहे. हल्लींच्या आमच्या राज्यकर्त्यांच्या संरक्षणछत्राखालीं ज्याप्रमाणें आम्ही आहो, त्याचप्रमाणें आह्मी त्या वेळीं पेशव्यांच्या अथवा मरा-

२८८/१

ज्यांच्या छायेखालीं होतों. आमच्या राज्यकर्त्यांसंबंधीं आम्ही राजनिष्ठ राहून त्यांचें यश ज्यायोगें उज्ज्वल होईल, त्यांचा दरारा ज्याच्या योगानें चहूं राष्ट्रीं गाजेल, तें सत्कृत्य करावें असें ज्याप्रमाणें आम्हांस वाटत आहे, त्याच प्रमाणें त्या वेळींही हिंदुपदपातशाहीची इभ्रत—दर्जा, मरातब, दरारा, श्रेष्ठपणा आसेतुहिमाचलसमुद्रवलयांकित हिंदुस्थानांत गाजावा, कालानें प.तशाहतीवर चढलेला गंज नाहींसा होऊन मराठ्यांचें तेज जिकडे तिकडे फांकावें या राष्ट्रप्रेममूलक भावनेला अनुरूप असें आमच्या राष्ट्राचें वागणें असे. राजाकरितां ज्याप्रमाणें आज आपण आपले प्राण द्यावयास तयार आहोंत, राजाकरितां ज्याप्रमाणें आपलें धन द्यावयास तयार असलें पाहिजे असें आम्हांस वाटत आहे, आमचें बुद्धिबल राजाच्या उत्कर्षाकरितां, आमचें शरीरबल राजाच्या रक्षणाकरितां कारणीं लागल तर त्यास शोभा येईल असें ज्याप्रमाणें आह्मांस आज वाटत आहे, राज्यकर्ते अमुक बोलले, राज्यकर्ते असे वागले इत्यादि गोष्टी बोलून ज्याप्रमाणें आम्ही आज कौतुक करीत आहोंत, त्याप्रमाणेंच पेशवाईच्या वेळीं मराठे व पेशवे यांजपाशीं प्रजेचें वर्तन होतें. परंतु या साम्याशिवायही आजची स्थिति व तेव्हांची स्थिति यांमध्यें एक विलक्षण साम्य होतें. ज्याप्रमाणें पेशवे प्रजाजनासंबंधें अविश्वस्त वृत्तीचे होते, गोखले पटवर्धन यांनीं पेशव्यांकरितां त्यांचे हिताकरितां एखादा घाट जमवून आणावा व त्यांनीं प्रजेच्या हातांपेक्षां आपल्या पायांवरच जास्त विश्वास ठेवून प्रजेस व आपल्या सरदारांस दूर करावें—आपल्या पायांनीं दूर करावें, असें होत असे, त्याप्रमाणेंच आज आमच्या राज्यकर्त्यांचा आमच्यावर विश्वास नाहीं. पेशवे प्रजेवर विश्वास ठेवीत नसत, याचें कारण त्यांचें मनच इतकें भित्रें झालें होते कीं, आपल्या सरदारांनीं आपणांस कितीही मदत केली, तरी आपली स्थिति इतकी असहाय झाली आहे कीं, त्या मदतीचा उपयोग बिलकूल न होतां निराशेच्या व अवनतीच्या भोंवऱ्यांत आपण खास बुडणार असें त्यांना वाटत असे. आज जो जनतेवर राज्यकर्त्यांचा विश्वास नाहीं असें दिसत आहे, तो राज्यकर्त्यांच्या आंगांत कांहीं दुर्गुण आहेत म्हणून नसून प्रजेपैकींच कांहीं आततायी व मूर्ख लोकांचीं अविचारी कृत्यें सर्वसामान्य मंडळीविषयीं सरकारची वृत्ति साशंक करण्यास कारणीभूत झालीं आहेत. आणि याचमुळें राष्ट्रीय भावनेनें हृदय उचंबळ-

णारे मदतगारांपेक्षां पैशानें नोकरी करण्यास पुढें सरसावलेले रडतराव घोडेस्वार आपल्या उपयोगी पडतील असें प्रभूंस वाटत आहे. अविश्वासाचीं कारणें जरी भिन्न असलीं, तरी राजा आणि प्रजा यांमध्यें परस्पर विश्वास नाहीं ही गोष्ट त्या वेळीं, व आज, सारखी आहे हें निर्विवाद आहे. राज्यकर्ते आणि प्रजाजन यांमध्यें परस्पर विश्वास नसावा ही स्थिति अनुकंपनीय आहे. त्याप्रमाणें राष्ट्रोदयास विघातक आहे. या विषयाची चर्चा जास्त खुलासेवार करण्याची ही जागा नव्हे. आज आपणांस पेशवाईची आठवण कां झाली, या गोष्टीचा विचार करणें आहे व त्याबद्दलचें एक कारण म्हणून वरील विचारांचा उल्लेख केला आहे इतकेंच. हल्लींचा गैरसमज नाहींसा करणें हें प्रजाजनाचें काम आहे व तें काम कसें पार पाडावें, याबद्दल राजकारणी पुढाऱ्यांत अद्याप एक मत होत नाहीं; मग केवळ रंगभूमीवरील नूपुरांचा झणत्कार कोणत्या प्रकारचा असतो याचा विचार करणाऱ्या अनभिज्ञ मंडळींच्या मनाची वृत्ति ' किं कर्म किमकर्मेति ' अशा प्रकारच्या संशयानें मोहित झाल्यास नवल काय ?

असो; तर वरील एकंदर विवेचनावरून पेशवाईची आठवण आम्हांस आज कां झाली, याचीं कारणें वाचकांच्या लक्षांत येतील. या प्रकारानें झालेल्या आठवणीचें दृश्य फल म्हणून जो तो आपापल्या मतीप्रमाणें वागूं लागला. नाट्यलेखकांची भावना नाट्यदेवतेवर जास्त असल्यामुळें नाट्याचार्य आपली लेखणी पुढें सरसावून या दिवसाची आठवण अथवा स्मारक कशा स्वरूपांत साजरें करावें याचा विचार करूं लागले व अशाच तऱ्हेचा प्रयत्न आमचे मित्र रा. कृष्णाजी हरि दीक्षित यांचा आहे.

रा. दीक्षित यांची ओळख नाट्यवातावरणांत वावरणाऱ्या समाजास नवीन करून देण्याची आवश्यकता नाहीं. त्यांनीं यापूर्वी पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत. रंगभूमीची सेवा त्यांनीं इतकी केली आहे कीं, त्यांच्या नाटकांच्या संख्येवरून त्यांचे स्नेही कौतुकानें व त्यांचे विरोधी थट्टेनें त्यांस ' शेक्सपीअर ' म्हणत असतात. वस्तुतः पहातां शेक्सपीअर हा जगाचा नाट्यलेखक होता. रा. दीक्षित यांची जी माहिती प्रस्तुत लेखकास आहे, त्यावरून तशा तऱ्हेचें महत्त्व आपणांस आहे असें ते मानीत नाहींत. नाट्यकलेनें आपणांस आपण होऊन माला घातली अशी फुशारकी

मिरविण्यासारखें आपणांत कांहीं आहे असेंही त्यांस वाटत असल्याचें दिसून येत नाहीं, अथवा आपण नाट्यकलेचे पती अशा तऱ्हेचा बाणा अद्याप त्यांनीं कोठेंही मिरविला नाहीं. ते एक नाट्यदेवतेचे उपासक आहेत व अद्यापपर्यंत ते रंगभूमीची यथाशक्ति सेवा करीत आहेत. तरी एवढें खरें कीं, त्यांची सरस्वतीच्या राज्यांत पूर्ण ओळख पटण्याइतकी तरी साहित्यसेवा त्यांजकडून घडली आहे. अशा परिचित ग्रंथकाराच्या नाटकास प्रस्तावना लिहिण्याचें काम प्रस्तुत लेखकासारख्या वाङ्मयव्यवसायांत केवळ अनभिज्ञ अशा नवाशिक्यावर पडावें यापेक्षां ' विधेर्विचित्राणि विचेष्टितानि " या म्हणीचें दुसरें ढळढळींत उदाहरण तें कोणतें असणार ! विधीच्या विचेष्टितांच्या खेळामुळें जशी पेशवाई नामशेष झाली, त्याचप्रमाणें तिची आठवण जनतेस देण्याकरितां रा. दीक्षित प्रस्तुत नाटक लिहीत असतांच त्यांच्यावर भार्यावियोगाचा प्रसंग आला. व त्या अत्यंत दुःखदायक व अडचणीच्या प्रसंगांत ते असतां सदर नाटक केवळ कर्तव्य म्हणून त्यांना पुरें करावें लागलें. परंतु जरूर म्हणून प्रवास करणाऱ्या मनुष्यास प्रवास संपतांच जो थकवा येतो त्याचा परिणाम रा. दीक्षित यांसही जाणवूं लागला. निरनिराळे चित्तविक्षेप करणारे व्यवहार उपस्थित होऊं लागले व त्यांतच पुस्तकप्रकाशनाकडेही लक्ष पुरवणें अवश्य असल्यामुळें हें काम मजसारख्या नवाशिक्याकडून करून घेणें भाग आलें. पेशवाई नाटक ऐतिहासिक प्रसंगावर विशेषतः ज्या प्रसंगाची माहिती बरीचशी पुष्कळांस आहे, त्या प्रसंगावरील असल्यामुळें त्याबद्दल खुलासेवार लिहिणें अवश्य होतें. पेशवाई कां नामशेष झाली हें पहाणें इतिहासज्ञांचें काम आहे. व त्या विषयाची चर्चा त्या कामांत प्रवीण अशा लेखकांनीं केलीच आहे. त्याचा नाट्यसृष्टीशीं फारसा संबंध नाहीं. नाट्यसृष्टींतील माणसांस त्या वेळची परिस्थिति दृश्य रूपानें दाखवून त्यानंतरचें काम विचारावर सोंपवावयाचें एवढें केलें म्हणजे पुरें होतें. ऐतिहासिक नाटकांत विशेष हा असतो कीं, त्यांतील पात्रांचे स्वभाव ऐतिहासिक व्यक्तींचे असल्यामुळें होतां होईल तों काय, परंतु सर्वस्वीं इतिहासाला धरून असले तरच त्यांचें यथातथ्य वर्णन झालें म्हणतां येईल. यासाठींच ज्या ऐतिहासिक प्रसंगांबद्दल इतिहासज्ञांत ऐक्यमत्य नाहीं. त्या प्रसंगांस नाट्यवेष देतांना फार जपलें पाहिजे. ऐतिहासिक नाट्यलेखकानें ज्या प्रसंगांस आधार केवळ

अफवांचा असतो ते प्रसंग नाट्यवस्तुविषय म्हणून न निवडल्यास बरें. विशेषतः ज्या अफवांची उभारणी केवळ कुटाळकीवर झालेली असेत, त्यांस ऐतिहासिक नाट्यप्रसंगांत महत्त्व देणें सर्वसंमत नाहीं हें उघड आहे; परंतु कांहीं ऐतिहासिक तत्त्वें अशीं असतात कीं, तीं त्या त्या प्रसंगांचें जीवनसर्वस्वच असतात. अशा प्रकारांस धक्का लावणें योग्य नव्हे. इतकेंच काय, पण ते प्रकार यथातथ्य वर्णन करणेंच योग्य होय. या दृष्टीनें पाहिलें असतां रा. दीक्षित यांचे नाटकांत बाजीरावाच्या विषयलोलुपतेबरोबरच त्या वेळच्या बाकीच्या परिस्थितीचाही उल्लेख होण्यासारखी रचना झाली आहे; असें आढळून येईल. त्या वेळीं चहूंकडे फांकलेलें मनुष्यबल एकत्र करण्याकडे त्या वेळच्या पुढाऱ्यांचे कसे प्रयत्न चालू होते, त्या वेळच्या सामान्य जनतेमध्यें कोणत्या विचाराचा पगडा जास्त होता, कांहीं माणसें स्वार्थपरायणतेपुढें राष्ट्रकार्य कसें तुच्छ लेखीत होतीं. व या सर्व दुर्दैवी गोष्टींस आळा घालण्याच्या प्रयत्नांस रावबाजीच्या भेकड व कर्तव्यहीन मनोवृत्तीमुळें कसा पायबंद बसत होता, याचें वर्णन हृदयद्रावक रीतीनें पहाण्यास सांपडेल, असा भरंवसा आहे. लक्ष्मीचें काल्पनिक पात्र योजण्यांत ज्याप्रमाणें कल्पकता व मार्मिकपणा दिसून येतो, त्याप्रमाणेंच त्या वेळच्या सात्विक मनोवृत्तीच्या स्त्रियांत राजाबद्दल व राज्याबद्दल केवढा तळमळ होती याचें चित्र मनापुढें उभें रहातें. प्रस्तुत नाटक वाचून माझा असा ग्रह झाला कीं, केवळ नाट्यसांप्रदायाच्या तडाक्यांत रा. दीक्षित सांपडले नसते, तर त्यांस जनतेची सेवा जास्त करतां आली असती. नाट्यसृष्टींतील पाहुण्यांची सेवा करण्याचें रा. दीक्षितांनीं मनांत आणिलें आहे. ती सेवा घेण्याचें नाट्यप्रेक्षकांकडे आहे. रंगभूमीची जी आजची स्थिति झाली आहे तिजकडे पाहिलें असतां ' ते हि नो दिवसा गताः ' असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. अस्सल सोनें दुर्मिळ झालें म्हणजे नकली दागिन्यांवर गरज भागावेण्याकडे प्रवृत्ति होते व कांहीं दिवसांनीं नकली दागिने तेच अस्सल असें वाटूं लागतें; तशांतला प्रकार मराठी रंगभूमीचा झाला आहे. ज्यांनीं रा. गणपतराव जोशी, कै. बाळाभाऊ जोग, कै. भाऊराव कोल्हटकर, कै. जोगळेकर, कै. विनायकराव जोशी अशा नटांचे अभिनय व गायन यांतील कौशल्य पाहिलें, ज्यांनीं कै. आगरकर, कीर्तने, प्रो. केळकर, किर्लोस्कर, देवल, यांच्या नाट्यकृतींचा रस सेवन केला,

त्यांना नाटक या नांवाखालीं हल्लीं चालत असलेला तमाशेवजा धिंगाणा पहाण्याचें नशिबीं आलें आहे ! अस्सल गायन व अभिनय यांच्या कमतरतेमुळें भासणारी उणीव, छचोर पोषाख, अश्लील अभिनय यांनीं भरून काढण्याकडे झालेली नटवर्गांची प्रवृत्ति पाहाणें त्यांना भाग पडत आहे ! शाब्दिक कोट्या करण्याची एका प्रसिद्ध सरस्वतीभक्तानें सुरू केलेली प्रवृत्ति भरभसाड रीतीनें नाटकासारख्या दृश्य काव्यांत घालण्यासही बहुतेक कविब्रुवांस संकोच वाटेनासा झाला आहे. असल्या कोट्या नाटकांत असल्यास त्या नाटकास व्यवहाराचा आदर्श म्हणण्यापेक्षां लेखकाच्या भाषा प्रभुत्वाच्या प्रदर्शनाचें एक साधन म्हणावें लागेल. व्यवहारांत अशा शाब्दिक कोट्या सर्रास वापरण्याइतका भाषासेवक व भाषाभक्त निदान आपला समाज तरी झाला नाहीं ही साधी गोष्ट समजण्याइतकें ज्ञान आपल्या भाषाप्रभुत्व दाखविण्याच्या हांवेस बळी पडल्यामुळें नाट्यलेखकांस रहात नाहींसें झालें आहे. नाट्यसृष्टीच्या बाहेर दिसणाऱ्या मतांच्या लोकप्रियतेवरून नाटकांची ही योग्यता ठरविण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे आपल्या आवडीप्रमाणें विशिष्ट मतांच्या लेखकांनांच निरनिराळ्या नाटकमंडळ्यांनीं आराध्यदैवत समजून त्यांचीं नाटकें नाट्यगुणांत कशींही असलीं तरी जबरीनें रंगभूमीवर आणण्याचा तडाका चालू आहे. अशा स्थितींत गोपीचंद, तोतयाचें बंड, पुण्यप्रभाव, झुंझारराव यांसारखीं नाटकें मागें पडावीं, कांचनगडचे मोहनेला जुनी पुराणी म्हणून त्याज्य मानण्याकडे प्रवृत्ति व्हावी व या ऐवजीं बाष्कळ व अश्लील विनोद भरलेलीं व मुख्य वस्तुविषयाचा परिपोष कोणत्याही तऱ्हेनें होत नसला तरी आंगातुकाप्रमाणें जोरानें मध्येंच घुसणार प्रवेशांचें प्रदर्शन करणारीं चोपडीं रंगभूमीवर स्वैर वावरावीं व उच्च अभिनय व भारदस्त परंतु मनोरंजक विचार व प्रसंग ज्यांत आहेत अशीं दृश्यें पाहण्याचा योग म्हणजे शाहुनगरवासी नाटक मंडळी गांवीं येईल त्या वेळच्याच कपिलाषष्ठीचा ठरावा, हें पाहून ' ते हि नो दिवसा गताः ' असें कोणत्या रसिकास वाटणार नाहीं ?

लेखकांस उपरोक्त भिकार वाङ्मय उत्पन्न करण्याचा मोह नाटकमंडळ्यांचे भिडेमुळें पडतो कीं नाटकमंडळ्या लेखकांचे भिडेस्तव असलीं नाटकें करण्याचे मोहास बळी पडतात, हें मला मी नाट्यलेखक अथवा धंदेवाल्या नाटकमंडळीचा मालक

नसल्यामुळें सांगतां येत नाहीं. परंतु लोकाभिरुचि अस्सल वस्तूच्या अभावीं नकलेकडे वळत चालली आहे. व त्या बदलणाऱ्या अभिरुचीचाच परिपोष करण्याचें पातक जोडण्याचा लेखक व नाटकमंडळ्या यांचा सांप्रदाय झाल्यासारखा दिसत आहे. या अनिष्ट प्रकारांपैकीं कारण कोणतें व कार्य कोणतें अथवा हे दोन्ही प्रकार अन्योन्याश्रित आहेत हें ठरविणें फार बिकट आहे.

या एकंदर चालू असलेल्या परिस्थितीचा परिणाम रा. दीक्षित यांच्या लेखणीवरही झाल्यासारखा दिसल्यावांचून राहाणार नाहीं. वास्तविक पहातां सामाजिक विषयांवर नेहमीं दोन प्रकारचीं मतें असणें साहाजिक आहे व त्यांतील एका पक्षाचा पुरस्कार करणाऱ्या लेखकानें नाटक लिहिलें असतां विरुद्ध पक्षावर असत्या नसत्या दोषांचा आरोप करून अतिशयोक्ति करण्याकडे लेखकाची प्रवृत्ति होत असते. याचीं उदाहरणें तरुणीशिक्षण नाटिका, जरठोद्वाह, रूढिविनाशन, दंभस्फोट, मतिविकार, वगैरे नाटकांतून पहाण्यास सांपडते. याच प्रवृत्तीचा पगडा रा. दीक्षित यांच्या अंधविश्वास, कुंकुमातिलक, सुदर्शन वगैरे नाटकांत दिसून येईल. नाटकें अथवा काव्यें यांचा उपयोग लोकशिक्षणाकडे मुळींच होणार नाहीं असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी सामान्यतः लोकांची प्रवृत्ति नाटकांचा असा उपदेश करून घेण्यापेक्षां त्यांपासून मनोरंजन करून घेण्याकडे जास्त असते हें उघड आहे, आणि यासाठींच असल्या वादग्रस्त विषयांवरील नाटकें समाजांत तात्पुरती खळबळ उठवून क्षणजीवि होतात; हें जरी खरें असलें, तरी हीं नाटकें पुस्तकरूपानें कायमचीं होऊन बसतात; तेव्हां अशा पुस्तकांत ग्राम्य व अश्लील प्रकार टाळण्याची किती आवश्यकता आहे हें सहज दिसून येणारें आहे. ज्याप्रमाणें ग्राम्य शब्द बोलण्यांत वापरणारांस समाजांत असभ्य समजतात त्याप्रमाणेंच असभ्य प्रकार वर्णन करणाऱ्या लेखकांस दूषण आल्यास नवल नाहीं, हें समजण्याइतकी विद्वत्ता बहुतेक लेखकांमध्यें असूनही त्यांनीं या आचरट सांप्रदायास बळी पडावें हें पाहून कोणास वाईट वाटणार नाहीं ?

असो. तर या सांप्रदायाचा प्रतिकार करण्यास प्रत्येक सभ्य माणसानें झटलें पाहिजे. परंतु 'अंगें भिजलीं जलधारांनीं । ऐशा ललना स्त्रयें..........' या दृश्याचें यथातथ्य आविष्करण केल्याशिवाय नाट्यप्रयोगास पूर्तता येत नाहीं व हा प्रकार दुर्बिणींतून सहकुटुंब सहपरिवार पाहिल्याशिवाय नाटकप्रेक्षणसाफल्य झालें

२८८/१



असें होत नाहीं; अशा तऱ्हेची वृत्ति नाटकवाले व प्रेक्षक यांची जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत हे प्रकार ज्यांस आवडत नसतील त्यांनीं 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' या तत्त्वावरच भिस्त ठेवणें जरूर आहे.

प्रस्तुत पेशवाई नाटकांत असल्या प्रकारास जितका आळा घालतां येणें शक्य आहे तितका तो घातला आहे हें वाचणारांस दिसून येईल. रावबाजीच्या लीलांपैकीं कांहीं भाग अंशतः तरी पेशवाईच्या ऱ्हासास कारणीभूत झाला हें खरें आहे. व ऐतिहासिक नाटक या दृष्टीनें त्या प्रकाराचें दिग्दर्शन नाटकांत होणें अपरिहार्य होतें हें उघड आहे. तरी या प्रकारामुळें जर प्रेक्षकांची मनोवृत्ति क्षुब्ध होतें असें दिसलें तर त्याचा पुढचे आवृत्तीची वेळ आल्यास विचार करावा असें रा.दीक्षितांस सुचविणें अगत्य आहे. * ही विनंति केवळ अस्थानीं आहे असें नाहीं. द्रोणसंकोप, सुंदरमाधव; कांचनगडची मोहना, भाउबंदकी; देवयानी, अंधविश्वास; अशा तऱ्हेचीं विसदृश नाटकें ज्या कलमबहाद्दरांच्या लेखणींतून सहज लीलेनें बाहेर पडतात, त्या लेखकांस आपल्या लेखणीचा उपयोग सत्कारणीं करण्यास माझ्यासारख्या त्रयस्थांनीं विनंति केली, तर ती भलत्याच ठिकाणीं केल्यासारखीं होणार नाहीं.

या एकंदर विवेचनाकडे अवधान देऊन वाचकांनीं पुढील पुस्तक वाचण्यास आरंभ करावा. केवळ कीर्ति मिळविण्याचे हेतूनें लेखन-व्यवसाय करणाऱ्या लेखकांहून रा. दीक्षित हे निराळ्या परिस्थितींत आहेत. नाट्यलेखन हा त्यांचा उदरनिर्वाहाचा धंदा आहे. व त्यासाठीं बाजारांत जो माल खपेल तोच उत्पन्न करणे हें धंद्याच्या दृष्टीनें जरूरीचें आहे, याकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. म्हणजे रा. रा. दीक्षितांच्या लेखणींतून जीं नाटकें उतरलीं आहेत त्यांतील दोषांचा बोजा परिस्थितिवर किती व सांप्रदायानें लाथाडलेल्या रा. दीक्षितांसारख्या लेखकांवर किती याचा निर्णय करणें सोपें जाईल. तरी जशी पेशवाईसंबंधें अनुकंपाबुद्धि वाचकवर्गाच्या मनांत आहे तशीच ती पेशवाई नाटक वाचतांना व पाहतांना पेशवाईच्या कर्त्यासंबंधें असावी अशी विनंती करून नाटकाचा पडदा उघडतों.

---

* असा एक प्रवेश होता तो पहिल्याच आवृत्तींत गाळला.—पुस्तककर्ता.

मुंबई,
हायकोर्ट.

**सीताराम दिनकर जोगळेकर.**

रा. कृ. ह. दीक्षित यांनीं लिहिलेलीं इतर नाटकें व पुस्तकें.

## विक्रीस तयार.

**महामाया**:—सुप्रसिद्ध जर्मन कवि शिलर यांच्या ' मेरी स्टयुअर्ट ' या नाटकाचें सुरस रूपांतर, गुरुवर्य महाजनी इत्यादि विद्वानांचे व ' केसरी ' वगैरे वृत्तपत्रांचे उत्तमोत्तम अभिप्राय. किं. १२ आणे. **देवयानी अर्थात् विद्यासाधन**:—कच-देवयानी या सुंदर पौराणिक कथानकावर हें गद्य नाटक लिहिलें असून महाराष्ट्रांत सर्वत्र नांवाजलें आहे. किं. १२ आणे. **राजा सत्वधीर**:—हरिश्चंद्र राजाच्या कथेवरील या नाटकांत सनातन धर्मीय चातुर्वर्ण्यव्यवस्था अनुल्लंघनीय आहे असें दाखविलें आहे. या नाटकावर वृत्तपत्रकें व मासिकें यांत बरीच चर्चा झाली आहे. किं. १२ आणे. **श्रीरुक्मिणीहरण**:—याहि नाटकावर विद्वानांचे उत्तम अभिप्राय आहेत. किं० १२ आणे. **संगीत याक्षिणीची कांडी**:—( सचित्र ) श्रीशिवाजी बाजीप्रभूच्या प्रसंगावरील नाट्यकलाप्रवर्तक मंडळीचें हातखंडा नाटक किं० १ रु **संगीत औदार्याचा डंका**:—( सचित्र ) श्रीवामनअवतारावरील सुरस व उद्बोधक नाटक. यांत नौकरशाहीवर रूपक केलें आहे व तें हुबेहूब साधलें आहे. किं० १ रु, **संगीत सुदर्शन**:—( सचित्र ) या सामाजिक नाटकानें सर्व महाराष्ट्रांत खळबळ उडवून दिलेली आहे. किं. १२ आणे. **सुभे कल्याण**:—श्रीशिवछत्रपतिकालीन छोटी कादंबरी. हिचें हिंदींत भाषांतर झालें आहे. दुसरी सचित्र आवृत्ति छापत आहे. किं. ५ आणे. **जोडाक्षरविरहित वाचनपाठ**:—( सचित्र ) यानें नुक्तीच अक्षरओळख झालेलीं मुलें सहज वाचूं लागतात. किं. ४ आणे. सर्वांस ट. ह. नि. आपल्या नजिकच्या बुकसेलरास लिहा.

श्रीराम.

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आज तीन वर्षांनंतर ही दुसरी आवृत्ति महाराष्ट्राला सादर करण्याचा सुप्रसंग आला ही श्रीरामरायाचीच कृपा होय. रंगभूमीवर हें नाटक होऊं नये याबद्दल खुद्द पुणें शहरांत–दिवंगत पेशवाईच्या हतभागी राजधानींत–आटोकाट प्रयत्न करण्यांत आला, पण त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. असा प्रयत्न कां करण्यांत यावा हें एक गूढच आहे! "सुदर्शन" नाटकाचे वेळींही पुण्यामध्यें असेंच काहूर उसळलें होतें; असेच प्रसंग अनेकांना आपले अनेक हेतु साधून घेण्यास बरे पडतात; व ते हे प्रसंग जितके चिडीस पडतील तितके पाडण्याचा अविश्रांत प्रयत्न करतात. तसें या वेळींही झालेंच. श्रीरामरायानें अखेर यश आम्हांला दिलें. आमचें काम झालें. कलहप्रिय मित्रांचें आम्ही अभीष्ट चिंतितों. पण त्यांची कींव करितों.

आज चार वर्षें महाराष्ट्राच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पेशवाईचे प्रयोग रंगभूमीवर गाजले आहेत. त्याचा परिणाम पुष्कळच चांगला झाला असें दिसून आलें. मुख्य गोष्ट ही झाली कीं,'पेशवाई कशी बुडाली' याबद्दल माहिती घेण्याची जिज्ञासूंना उत्सुकता झाली. रावबाजीच्या वेळचा इतिहास इतका नजीकचा असतांहि ग्रांटडफ् वगैरे सारख्यांच्या लेखांनीं तो पुष्कळच चुकीचा असावा व तो आम्हीं खरा मानावा असें आतांपर्यंत चाललें आहे. पण या चार वर्षांत इतिहाससंशोधकांचें लक्ष या हतभागी कालाकडे गेलें असून, नवीन माहितीचा प्रकाश पडेल अशा प्रकारचे कांहीं कागदपत्रही प्रसिद्ध होऊं लागले आहेत.

मागील वर्षी इतिहास–संशोधक–मंडळाच्या वार्षिक संमेलनास जाण्याचा प्रसंग आला होता. तेथें कै० पांडोबा पटवर्धन, रा० विनायक लक्ष्मण भावे, रा० गोविंद विनायक आपटे वगैरे मंडळींची या बाबतींत काय मतें आहेत तें कळून आलें. कै० पांडोबा दुर्दैवानें आमच्यांतून गेल्यामुळें त्यांचे आक्षेप काय होते, व त्यांबद्दल

माझें म्हणणें काय आहे, हें आतां नमूद करण्याचें कांहीं प्रयोजन उरलें नाहीं; याबद्दल दुःख वाटतें. *कै० पांडोबांची माझ्या या कृतीबद्दल सहानुभूति होती. त्यांनींच "शनवारच्या वाड्यावरील भगवा झेंडा स्वहस्तें उतरून त्या ठिकाणीं इंग्रजांचें निशाण केवळ आपण पंचवीस स्वारांच्या मदतीवर चढविलें" अशा मजकुराचें, बाळाजीपंत नातूचें स्वदस्तुरचें पत्र माझ्या निदर्शनास आणून दिलें. हें पत्र बाळाजीपंत नातूनें कोणा वॉरन साहेबास, त्याच्यावर जेव्हां कुंपनीची खप्पा मर्जी झाली, तेव्हां लिहिलें आहे. हें भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या शके १८३८ च्या इतिवृत्तांत छापून प्रसिद्ध झालें आहे.

रा. भावे यांची कुरकुर एवढीच कीं, आपल्याच लोकांची घाण आपण कशाला दाखवावी. पेशवाई बुडाल्यानंतर शंभर वर्षांनीं असलीं जुनीं पुराणीं मतें भावे यांजसारख्या सुविद्य संशोधकांनीं सोडूं नयेत हें आश्चर्य होय. रावबाजीच्या पातकी कृत्यांवर सरपोस ओढावा अशी भावे यांच्या मनाची तळमळ दिसते. नुकत्याच त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या, मराठी दफ्तर रुमाल दुसरा, यामध्यें आपली ही तळमळ शांत करून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. रावबाजी सद्गुणाचा पुतळा होता असें महाराष्ट्रानें मानावें असें भावे यांना वाटतें. पण इतिहास तसें करूं देत नाहीं त्याला काय करावें! पेशवाई रावबाजीच्या हातून बुडाली आणि ती बुडत असतां त्यानें मर्दपणाच्या ऐवजीं आपला नादानपणाच दाखविला, हें सत्य खोडून काढण्याइतके विश्वसनीय पुरावे जोंवर उपलब्ध होत नाहींत, तोंवर आहे हीच माहिती खरी आहे, असेंच कोणीही धरून चालणार. अर्थात् याबद्दल भावे यांचा तसाच आमचाहि नाइलाज आहे. पुढें पाटीमागें अधिकारी इतिहासज्ञांनीं बाजीरावाच्यावरील पळपुटेपणाचा, नादानपणाचा, अनीतीच्या वर्तनाचा आणि विशेषतः पेशवाई बुडविल्याचा, आरोप जर काढून घेतला तर आम्हीही बाजीरावाचें मोठ्या आनंदानें वर्णन करूं; एवढें आश्वासन तूर्त आम्ही रा. भावे यांस देऊन ठेवितों.

तिसरे आक्षेपक रा. आपटे यांची कुरकुर लक्ष्मीच्या पात्राबद्दल दिसून आली. रा. आपटे यांचा रंगभूमीशीं संबंध बरींच वर्षें असतांही, काल्पनिक पात्रांची वासलाद कशी लावावी, हें त्यांना समजूं नये हें नवल होय. लक्ष्मीमुळें गंगाधर-

शास्त्र्यांच्या घराण्याची विटंबना न होतां उलट तें जास्त उज्ज्वल दिसतें, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. शास्त्रीबुवांच्या घराण्याचा अभिमान आपटे यांना आहे खरा. पण अलीकडे शास्त्रीबुवांच्या पुण्यांतील रहिवासावर प्रतिकूल कल्पना होणारी माहिती प्रसिद्ध होऊं लागली आहे. तिच्यामुळें खुद्द शास्त्रीबुवांचेंच आधींच थोडें काळें असलेलें तोंड जास्त काळें होण्याचा प्रसंग आला आहे. त्यांतून त्यांची मुक्तता कशी करावी याची विवंचना पाहिजे तर रा. आपटे यांनीं करावी. बिचारी लक्ष्मी पेशवाईच्या आधींच दुरावली आहे; तिच्याबद्दल उगीच काथ्याकूट कशाला !

असो. वस्तुत: पेशवाई हें नाटक १९१८ सालीं महाराष्ट्राला जें सादर केलें तें मूळचें १८८८ सालांतील होय. १८८८ सालापर्यंत जी उपलब्ध माहिती माझे वडिलांस मिळाली तीवर त्यांनीं त्या नाटकाची उभारणी केली आहे. सध्यांच्या रंगभूमीला शोभेल एवढाच फेरफार मीं त्यांत केला आहे. १९१८सालापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग यामध्यें मीं केला असता तर माझ्या वडिलांचें असें त्यांत कांहींच राहिलें नसतें. कारण भाषासुद्धां अलीकडच्या फर्मासीची आली असती. आणि आज जी कांहीं जुनी माहिती व जुनी भाषा यांहीं करून जी अपूर्व गोडी या नाटकास आली आहे तीहि अनुभवावयास लाभली नसती.

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, हें ऐतिहासिक नाटक आहे. त्यांतील पात्रांचा व लेखकाचा कोणत्याहि प्रकारचा द्वेष असणें शक्य नाहीं. ऐतिहासिक पात्रें इतिहासांत जशीं रंगतील तशीच तीं कादंबरीकार अगर नाटककार रंगविणार. उगीच त्यांच्यावर बोटें मोडण्यांत काय हांशील ?

महाराष्ट्रानें पेशवाई नाटकाचा स्वीकार फारच उत्सुकतेनें केला. याला कारण नाटकांतील प्रतिपाद्य विषय तर आहेच. पण नाट्यकला प्रसारक संगीत मंडळीच्याही प्रयत्नाचें तें श्रेय आहे. पेशवाईच्या कालांत जे पोषाख, जीं हत्यारें होतीं, तीं आणि प्रसंगाला योग्य असे देखावे दाखवून व त्याला बिनचूक नेपथ्याची जोड देऊन कंपनीचे मालक रा॰ गणपतराव, गोविंदराव लेले व त्यांचे सहकारी नट यांनीं पेशवाई अगदीं हातखंडा केली. याचें फल कंपनीच्या उत्कर्षाच्या रूपानें त्यांना मिळालें ही संतोषाची गोष्ट होय.

ही प्रस्तावना पूर्ण करतांना आणखी एक गोष्ट नमूद करणें अगत्याचें आहे. माझीं नाटकें प्रसिद्ध करण्याचें चित्रशाळेच्या मनांत असूनही कांहीं एका विशिष्ट कारणींनें तो योग जुळून येत नव्हता, पण श्रीराम कृपेनें सर्व कारणें दूर होऊन, हा योग आला, याबद्दल व पेशवाईच्या निमित्तानें महाराष्ट्राला विशेष निकट परिचय करून दिल्याबद्दल मी त्या श्रीराम प्रभूचे आभार मानून त्याच्याच चरणीं लीन होतों.

शहापूर–बेळगांव
१८४४, विजयादशमी.

कृष्णाजी हरि दीक्षित.

७८
१९२२

ना २५०

॥ श्रीराम ॥

# पेशवाई.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

**स्थळ:**—पर्वति देवस्थान; पूजन व दीपोत्सव; श्रीमंत प्रंतप्रधान दुसरे बाजीराव पेशवे, विठ्ठलराव विंचूरकर, आबा पुरंदरे, बापू गोखले, गोविंदराव काळे, गहेनाजी, अन्याबा रहातेकर वगैरे मंडळी जमली आहेत.

[ **मंगलार्तिपूर्वक ईशस्तवन झाल्यावर** ]

**रावबाजी**:—काय अन्याबा, अनुष्ठान यथास्थित झालं ना ?

**अन्याबा**:—होय सरकार, अगदीं बरोब्बर झालं. आतां प्रसाद ग्रहण करावा. ( पुजाऱ्यास ) सिद्धेश्वर भटजी, प्रसाद द्या म्हटलं.

( भटजी प्रसाद बाजीरावाच्या पदरांत टाकतो, तों पदर सुटून प्रसादाचा नारळ, फुलें खालीं पडतात. सर्व चपापतात; बाजीराव रंजिस होऊन चालता होतो. इतर मंडळीही जातात. )

( पर्वतीवरील गच्चीचा भाग. )

**बाजीराव**:—( सचिंत प्रवेश करून ) असा अपशकून कां बरं व्हावा ? ईश्वराच्या मनांत काय आहे कुणास ठाऊक ? त्या गंगाधर शास्त्र्याला मारला, क्षेत्राच्या ठिकाणीं ब्रह्महत्या केली, तीच मला बाधा करूं लागली, हेंच खरं. त्रिंबकजी, माझ्याकरतां तूं ब्राह्मणावर हत्यार चालवलंस, माझ्याकरतां तूं खुनी झालास आणि आतां ठाण्याच्या तुरुंगांत माझ्याकरतां खितपत पडलास ! एवढ्या मोठ्या दौलतीचा मालक मी—

**ठाकुरदासबुवा**:--( प्रवेश करून ) होय तूं.--पण ही मालकी तुला कशी मिळाली ?

**बाजीराव**:—( घाबरून ) तूं-तूं-तूं-कोऽऽण-- ? इथं कसाऽऽऽआलास ?

**ठाकुरदासबुवा**:—ज्या गादीवरील पुरुषांचं नांव ऐकलं, कीं दिल्लीच्या पादशहाला थंडी भरे आणि निजामशाही डळमळूं लागे, त्या गादीला स्पर्श करून तिचा उपमर्द केलास.--भ्याडा, बोल, ही गादी मिळवायलाही दोन ब्रह्महत्या केल्यास कीं नाहीं ? बोल.

**बाजीराव**:--कोणीं ? मीं ?

**ठाकुरदासबुवा**:—होय तूं., सवाईमाधवरावाला जारणमारण कुणीं केलं ? त्याच्या बापाला, नारायणरावाला कुणीं ठार केलं ? ब्राह्मणाच्या रक्तानं माखलेली ही गादी सत्कृत्याच्या पुण्योदकानं स्वच्छ करायची, कीं दुष्कृत्यांनीं ती जास्तीच भेसूर करायची ? अरे कुलघातका, या गादीकरतां तुझ्या प्रतापी पूर्वजांनीं, आपल्या जीवाची तमा धरली नाहीं. शिवछत्रपतीच्या धोरणाबरहुकूम गोब्राह्मणप्रतिपालन केलं आणि हिंदुपदपादशाहीचा दरारा रुमशामपर्यंत गाजवला; त्याच या गादी-करितां शिंद्याला दीड कोट रुपये देऊं केलेस ?

**बाजीराव**:—( घाबरून ) मला वाटलं दिल्ली अटकेचा खजिना जवेरखान्यांत तुडुंब भरला असेल.

**ठाकुरदासबुवा**:—असं तुला वाटलं; पण उलटे लक्षावधि रुपयांचे कर्जरोखे तुला दिसले ते ! अरे कुलकलंका, या गादीची नौबत अष्टौप्रहर साऱ्या भारतवर्षांत झडावी म्हणून तुझ्या पूर्वजांना, त्या प्रतापसिंह बाजीरावाला, त्या धुरंधर माधव-रावाला, सावकारांच्या पुढं डोकीं घांसावीं लागलीं आणि तूं काय केलंस तर त्यांच्या पुण्याईनं गजबजलेल्या या पुण्य नगरीपासून शिंद्याचे दीड कोट रुपये वसूल करण्या-करितां सरजेराव घाडग्यांला पोळ सोडलास आं ! ?

**बाजीराव**:--( भेदरून उभा रहातो. )

**ठाकुरदासबुवा**:—बाळोजी कुंजराच्या सांगीनं विठोजी होळकराला हत्ती-च्या पायीं नाहक दिलास आणि तुझ्या दुष्कृत्याचं प्रायश्चित्त या पुण्य नगरीला भोगावं लागलं ! यशवंतराव होळकरानं पुणं जाळलं तेव्हां कुठं पळालास ?

**बाजीराव**:--सुवर्णदुर्गास—

**ठाकुरदासबुवा**:—सुवर्णदुर्गास ? ! वसईला तुझी नी इंग्रजांची दोस्ती—

**बाजीराव**:—ती दोस्ती कसली—त्यानं माझे हातपाय मात्र बांधले जाऊन मी इंग्रजांचं खेळणं झालों. ते रास्ते आणि त्यांचा कारभारी तो बाळाजी यांचा हा उपकार फळाला आला—

**ठाकुरदासबुवा**:—पुणं दृष्टीला पडलं म्हणून या वल्गना ! रास्त्यांचे उपकार चांगले फेडलेस—त्यांचा सरंजाम जप्त केलास—आणि ज्या पटवर्धनांना तुझ्या पूर्वजांनीं पुत्राप्रमाणं वाढविलं त्यांचं मूळच उखडण्याचा प्रयत्न केलास. अरे त्या बाळाजीनं तुझ्याकरितां हाडाचीं काडं केलीं त्याला तूं आतां विसरलास ? इंग्रजांमुळं तुला ही गादी मिळाली; त्यांनांही तूं पाण्यांत पहातोस—? स्त्रीक्षोभ, देवताक्षोभ आणि लोकक्षोभ यांनीं रावणासारखा उलथला; तुझी काय कथा ? साध्वी स्त्रिया म्हणजे तुला परसांतली भाजी झाली आहे. अनाचारांचा विलक्षण वणवा तुझ्या गादीभोंवतीं पेटला आहे; ज्या गादीच्या स्थापनेकरतां तुझ्या पूर्वजांनीं न्यायनीतीनं वागून भीम पराक्रम केले, ती गादी अशी नाहक बुडवूं नकोस, अझून डोळे उघड ! अरे हा अनाचार अखेरीस तुझी मान मुरगळीलच, पण या हिंदुपदपादशाहीला खग्रास ग्रहण लावील ! अझून तरी सावध होतोस का ?

**बाजीराव**:—अनाचार ? माझ्या राज्यांत अनाचार ? बरं, समजा, कीं अनाचार असलाच, तरी आठा—चौ—रोजांत अशी कांहीं अन्नशांति होत आहे कीं, त्यांत लक्षावधि पातकं खाक होऊन जातील. असंख्य देवस्थानांना नंदादीप चालू आहेत. दानधर्म तर सारखा करतोंच आहें. मग अनाचाराची बाधा कशी होईल ? आतां तुह्मी म्हणतां, कीं सरदारांचे सरंजाम खालसा केले, नोकर उद्धट झाले तर त्यांच्या काय पायां पडावं—? मी किती क्षमाशील आहें हें तुम्हांला मीं इतकं बोलूं दिलं यावरूनच समजा.

**ठाकुरदासबुवा**:—अरे पाप्या, माझ्या एका केंसालाही स्पर्श करण्याची तुझी छाती नाहीं.—आज ज्या दीडशें कुलस्त्रियांनीं तूं बावनखणी भरली आहेस, त्यांना तूं या घटकेला सोडून देतोस कां ? अरे त्यांत कित्येक अशा पतिव्रता आहेत, कीं त्यांच्या अश्रूंच्या एकेक थेंबाबरोबर या स्वराज्याच्या वज्रमय कोटाचा एकेक अजस्र चिरा आपोआप निखळतो आहे. मग सोडतोस का त्यांना—?

**बाजीराव**:—कुणाला ? त्यांनां मीं आणल्याही नाहींत नी त्या मला ठाऊकही नाहींत—

**ठाकुरदासबुवा**:—अस्सं ! अरे मूर्खा, त्या स्त्रियांचे आप्तजन तुला धूळ चारण्याला योग्य संधीची केवळ मार्गप्रतीक्षा करीत आहेत. हाय हाय ! काय करावं ? 'नाविष्णुः पृथ्वीपतिः' या शास्त्रवचनाची आडकाठी नसती तर मींच काय पण या स्वराज्यांतल्या कोणीही पुरुषानं तुझ्या नरडीचा घोट घेतला असता. हिंदुपद्पादशाहीचं दुर्दैव कीं तिच्या कुंकवाची मालकी तुझ्यासारख्या कमअस्सलाकडे आली ! अरे ज्या बाजीरावाचं नांव घेऊन तूं मिरवतोस, त्याच्या दिव्य तेजाची आठवण कर. अझून शुद्धीवर ये आणि तुझा आणि तुझ्याबरोबर या स्वराज्याचा विनाश होऊं देऊं नकोस. बाजीराव, अरे हीं पेशव्यांची गादी, हिंदुपदपातशाहीच्या वजीराची गादी,—इच्याकडे पहाण्याची तुझी योग्यता नाहीं—पण उपाय काय ? भवितव्यताच अशी ! ही स्वराज्याची वैभवशाली इमारत शाबूद राखण्याकरितां तूं एक आपलं वर्तन तरी सुधार; नाहींतर आपण होऊन पाठीमागं सरक. फुकट तूंही मरूं नकोस आणि स्वराज्यही नष्ट करूं नकोस. अरे, ही स्वराज्याची उभारणी व्हावयाला अनेक शूर पुरुष खपले आहेत—तें लक्षांत आण—तसं न करशील तर भावी पिढीचे शिव्याशाप तुला रौरव नरकांत अक्षय अक्षय कुजवतील—हें विसरूं नकोस. ( जातो. )

**बाजीराव**:—( तो गेल्यावर स्वगत ) कोण बरं हा असावा ? हा त्या बाळाजीचा गुरु रामदासबुवा असावा काय ? का खुद्द बाळाजीच ? अलीकडे तर या बुवाबैराग्यांचं बंड फारच माजलंय ! कोणी कां असेना. अशी कावळ्याच्या शापानं गुरं मरतील तर आणखी काय पाहिजे ? ( विचार ) गंगाधर शास्त्र्याचा खून केला, हा खरोखरच मोठा अविचार झाला—पण पश्चात् बुद्धि काय कामाची ? त्रिंबकजी, तूं मात्र माझ्याकरितां सगळ्यांच्या शिव्याशापाचा धनी झालास ! ( विचार ) गंहेनाजीला एवढं यश मिळालं, कीं ओंकारेश्वराची मी पूजा बांधीन. एकदां त्रिंबकजी मोकळा होऊं दे, कीं मग घेतों एकेकाचा चांगला समाचार. ( विचार ) पण या टोपीवाल्यांचा ससेमिरा कसा सुटणार ?

( इतक्यांत चांगुणा दासीसह वाराणसीबाई येतात. बाजीरावाची सहज दृष्टभेट होते तों तो चपापून मागें वळतों व हलक्या पावलानें वाराणसीबाईकडे येतो.

बाजीराव खिन्नवदन असा उगा राहिला असतां वाराणसीबाई डोळयांत आंसवें आणून पाय धरतात. )

**बाजीराव**:—( डोळयांत आंसवं आणून ) ऊठ, ऊठ, अशी कष्टी कां होतेस ?

**वाराणसीबाई**:—इकडची स्थिति पहावत नाहीं म्हणून.

**बाजीराव**:—ऊठ-( तिला उठवितात ) अग, इतकी तूं वेडी कशी ?

**वाराणसीबाई**:—इतके दिवस कडक अनुष्ठान करून अखेर प्रसादाचा नारळ लाभूं नये-पदरांतला खालीं पडावा ? ! महाराज, ही गोष्ट माझ्या मनाला कशी लागून राहिली आहे ! तें ऐकल्यापासून माझ्या डोळ्याचं पाणी म्हणून खळेना-( चांगुणा रडण्याचें मीष करते )-चांगुणा, तूं कां रडतेस ? जा, तूं खालीं सदरेला जा, नी दिवाणजींना देवघरांत यायला सांग. ( ती जात नाहीं ) चांगुणा, जातीसना ?

**चांगुणा**:—नग बाइसाब, मला अक्षी पाऊलच उचलंना. [ खालीं बसून ] देवा, नारायणा, काय बा वंगाळ दीस आणलंस हे. माझं हे मावाप असं दुःखा-मंदी पाहून मस्नी कसं अग्दीं भडभडून येतंया. इडा पिडा टळो नी माझं महाराज बळीचं राज्य करुत- पदरांत पडलेला परसाद खाली पडावा-काय देवा तुझ्य घरचा हा अन्याव !

**वाराणसीबाई**:—पाहिलंत, अशी ही आमच्यासाठीं कष्टी होते नी सारा वाडा म्हणतो, कीं ही फितुर आहे;-इकडं तरी हें खरं वाटतं कां ?

**चां**... —भगवानाला डोळे ! मी माझ्या मिठाला जागतुय का न्हाय त्यों ...ली ती का अ... ...या देवालाच ठाव.

तें वाढविलं, तें का असे खून क... आंगावर शहारे आल्यासारखे करते. )

राज्य संपुष्टांतच आलं म्हणायचं. ...ग फार लागतो होय ? चल तर,

**...जीराव**:—झालं-शेवटीं तुझं पालेपद काय ...

...ग कमावणारे पुष्कळ झाले तर गमावणारा कोणी तरी पाहि... ...याची नाहीं. ...आली तर बसूं कुठं तरी स्नानसंध्या करीत.

**वाराणसीबाई**:—पण हें गमावतांना कांहीं विचार तरी करा. मारतां मारतां ...ऱ्याला स्वर्गाचीं दारं उघडीं आहेत. महाराज, अपेशसुद्धां मानाचं व्या. पंढ-

**बाजीराव**:—कां ? अशी जिवाला कां कंटाळलीस ?

**वाराणसीबाई**:–खरंच सागूं का महाराज–मला या पापाची–या नरकाची घाण आतां सोसेना. इतकी जीव तोडतोडून सांगतें, आपण कांहीं ऐकत नाहीं. आपल्या वाईट नादानं दौलत बुडत चालली बरं–राजहंस कावळा होत चालला, हें पहाण्या-पेक्षां मेलेलं काय वाईट ? आपण मेलं नी जग बुडालं !

**बाजीराव**:—हें तुझं दररोजचंच पालुपद आहे. त्रस्त झालेल्या जीवाला थोडीशी करमणूक म्हणून चार माणसं जवळ केलीं–तीं तेवढीं तुम्हांला पहावत नाहींत. बरं–पुरे आतां ही कर्मकटकट ! ( जाऊं लागतो. )

**वाराणसीबाई**:—आपल्या कल्याणाकरितां ही वाराणसी या जीवांत जीव आहे तोंवर खरं तेंच बोलत रहाणार ! पेशव्यांचं नांव केवढं ? दरारा केवढा ?—इभ्रत केवढी! तो पेशवा कवडीमोल माणसाच्या हातचं बाहुलं व्हावा ? स्वराज्या-करितां दिल्ली अटकेपर्यंत झेंडे नाचविणारा पेशवा, अन्यावा राहतेकरानं कांखोटीस मारावा ? ज्याच्या शब्दाबरोबर शिंदे होळकरांच्या फौजा छातीवर अजस्र मारा घेत घेत शत्रूला दाही दिशा पिटाळून लावीत–तोच पेशवा, त्याच शिंदे होळकरां-च्या भीतीनं पुणं सोडून पळून जातो,नी टोपीवाल्यांच्या हातीं पायीं पडून पुनः पुण्यांत परत येतो ! महाराज, आपण पेशवे, शिवछत्रपतींच्या गादीचे आधारस्तंभ, स्वरा-ज्याचा भगवा झेंडा, आपणच असे डगमगलांत तर या स्वराज्याचा वाली कोण ? शिंदे, होळकर, दूर करून आपण या टोपीवाल्यांना जवळ केलंत--हे का आपल्या जातीचे, का गोताचे ? नानांची नी पाटीलबोवांची शिकवण ती हीच का ? त्यांनीं इंग्रजाला घेतला का घरांत ? ( बाजीराव बोलत नाहीं. ) कां ? महाराज, आतां कां बरं बोलत नाहीं ?

**बाजीराव**:—( सुस्कारा टाकून ) होय, झालंय [illegible] बुद्धि काय कामा-

**वाराणसीबाई**:—बरं, इतक्या थरा[illegible]च्या शिव्याशापाचा धनी झालास ताहेत ? टोपीवाल्याशीं दोस्ती [illegible] मिळालं, कीं ओंकारेश्वराची मी पूजा बांधीन. होळकर रुसले, तरी ते [illegible]ळा होऊं दे, कीं मग घेतों एकेकाचा चांगला समाचार. नाही, न[illegible]रें ) पण या टोपीवाल्यांचा ससेमिरा कसा सुटणार ?

( इतक्यांत चांगुणा दासीसह वाराणसीबाई येतात. बाजीरावाची सहज दृष्ट-भेट होते तों तो चपापून मागें वळतों व हलक्या पावलानें वाराणसीबाईकडे येतो.

' फक्कड पांखरं ' पहाण्यासाठीं मी ' नको ' ' नको ' म्हणत असतांना बुधवारां-तून विश्रामबागेंत जातात ! महाराज, कुलीन स्त्रियांचा हा छल, ही विटंबना—

**बाजीराव**:—पुरे-पुरे, ही तुझी नेहमींचीच रड आहे. तुमच्यापासून आम्हांला कांहीं सूख नाहीं तर नाहीं—आम्ही आमची परस्पर सोय पहावी, तर तेंही तुम्हांला बघवत नाहीं. खासा आहे हा न्याय ?

**वाराणसीबाई**:—हा न्याय, महाराज, परमेश्वराच्या इथला ? आपल्याच पापाचीं फळं आपणाला भोगावीं लागताहेत. सासूबाईंनीं भाऊजींचा खून केला सता तर त्यांचं पिशाच्च कशाला आमच्या मागं हात धुवून लागलं असतं—! र्योधनाचीं पातकं भानुमतीला भोगावीं लागलीं, तसं बडवलंय माझ्या नशीबीं. ांहीं तरी देवदेवक करून, नीतीनं वागून पिशाच्चाला गाडावं म्हटलं, तर पुनः ाधर शास्त्र्याचं नवं भूत तयार झालंच. माझ्यापासनं आपणांला सूख नाहीं, ला मी काय करूं ? हीं आपलीं कर्मं आपणांला नडतात ना ? पंढरपूरला तांना शास्त्री तो बरोबर कशाला पाहिजे होता ? नको—नको, म्हणून मीं जीव तोडून सांगितलं, पण त्या फक्कड पांखरांना उचलण्यासाठीं शास्त्री तोडायचा ा ना ?

**बाजीराव**:—हें राजकारण तुला नाहीं समजायचं. गायकवाड हे आमचे र-त्यांचा वकील आमच्या दरबारीं येतो तो टोपीवाल्यांच्या जामिनगतीवर ? मखोरांना अशीच शिक्षा पाहिजे होती.

**वाराणसीबाई**:—पंतप्रधान पेशवे खून करतात ? गायकवाडांना शिक्षा करायला फौजफांटा नव्हता काय ? थोरले मामंजींनीं डभोईस सेनापतींना शिक्षा दिली ती का अशी ? श्री शिवछत्रपतींनीं स्वराज्य कमावलं नी पंतप्रधान पेशव्यांनीं तें वाढविलं, तें का असे खून करून ? महाराज, राजा खून करूं लागला तर त्याचं राज्य संपुष्टांतच आलं म्हणायचं.

**बाजीराव**:—झालं-शेवटीं तुझं पालुपद काय तर आम्ही राज्य गमावणार! आ कमावणारे पुष्कळ झाले तर गमावणारा कोणी तरी पाहिजे ना ? तशीच वेळ आली तर बसूं कुठं तरी स्नानसंध्या करीत.

**वाराणसीबाई**:—पण हें गमावतांना कांहीं विचार तरी करा. मारतां मारतां मेल्याला स्वर्गाचीं दारं उघडीं आहेत. महाराज, अपेशसुद्धां मानाचं घ्या. पंढ-

रपुरास लिमयाच्या वाड्यांत शास्त्र्यांना मारायचा बेत चालला होता. तेव्हां त्रिंबकजीसुद्धां हेंच म्हणत होता. पण त्याला आपण सगळ्यांनीं भरीं घालून उद्धवाच्य पुढं, प्रक्षाळपूजेच्या आधीं, भर रस्त्यावर, शास्त्र्याचे तुकडे तुकडे करायला लावलं. मी अगदीं गयावया येऊन अगदीं पाय धरले, पण मला झिडकारून खाजगीवाल्यांच्या वाड्याकडं चालतं व्हावयाचं झालं! खुनानं करपलेले हात देवाचा प्रसाद घेतांना असेच लटपटायचे! त्या खुनापासून दौलतीचे तुकडे होण्याची पाळी आली. मला वाटतं सगळे सरदार, मानमानकरी बोलावून हें पंतप्रधान त्यांचं त्यांच्या हवालीं करून आपण खरोखरच कुठं तरी देवाची सेवा कर राहूं या—

**बाजीराव**:—आणखी—?

**वाराणसीबाई**:—स्वराज्य गमावल्याचं अपेश तरी आपल्या माथीं न ये अशी खबरदारी घेऊं या. महाराज, ' रावबाजी ' स्वराज्य बुडवे, असं पुढ लोकांनीं ह्मटलेलं मला स्वर्गांतसुद्धां सुखावह होणार नाहीं. एकतर आपण प्रधानाच्या नांवाला शोभेल असं तरी वागा, नाहींतर मराठ्यांची राज्यव्यव मराठ्यांच्या हवालीं करा नी मोकळे व्हा, अपेश घेऊं नका. ( बाजीराव कारून जाऊं लागतो.) कां ? इतकी सारी उरस्फोड व्यर्थ ना ?! ( जातो गेल्यावर) हाय रे दैवा! इतकं तोडून बोललें तरी कांहीं उपयोग नाहीं ! (जा

———

## प्रवेश दुसरा.

**स्थल**:—पर्वतीच्या वाड्याच्या आंतील महालांत बाजीराव अन्याबा रहाते करासह सचिंत प्रवेश करितो.

**बाजीराव**:—( स्वगत ) जो उठेल तो उपदेश करितो. मी ह्मणजे या सगळ्यांना अगदीं पोरासारखा वाटतो ! अरे, आहे तरी काय हें ? इतकी खटप करून पेशवा झालों तो काय यांच्या कर्मकटकटी ऐकायला ! ' जाऊं दे की ह्मणतांना त्याचंच हें प्रायश्चित्त ! [ विचार ] आज त्या गंगाधर शास्त्र्याच्या ची पहिलीच भेट होणार—कितीपण या वेळीं माझं मन अधीर झालंय हें ?

नाचूं लागली. ( नारायणरावाचें पिशाच्च दिसतें अशी बाजीरावास कल्पना होते. ) तें पहा-( बाजीराव किंचाळतो, ती त्याला ढकलून पळून जाते आणि पर्वताच्या तटावरून खालीं उडी घेते. )

**बाजीराव**:—अरे अन्याबा, धांव रे—तटाखालीं उडी घेतलीन् बघ तिनं !

**अन्याबा**:—मरूं दे शिंची—

—पडदा—

---

## प्रवेश तिसरा

**स्थळ**:—ठाण्याच्या किल्ल्याच्या बाहेरील खाडीकडचा रस्ता.

( गेहनाजी कानफाट्याच्या वेषांत किनरी वाजवीत व गाणें गात प्रवेश करतो. )

**गेहनाजी**:— —गाणें—

**दिधल्यावरतीं तुज देवानें उणें कुणाला बोलूं नको ॥**
**मायबापावर रुसूं नको, दूर एकला बसूं नको ॥**
**लंड, गुंड, हिरसे तट्टूं यांची संगत धरूं नको ॥**

( स्वगत ) बेत केल्याप्रमाणं इथपर्यंत तर सर्व कांहीं जुळायचं तसं जुळलं ! पेशवे सरकारच्या आज्ञेप्रमाणं त्रिंबकजीला या ठाण्यांतून बाहेर काढायची इतर व्यवस्था अगदीं जय्यत करून ठेविली आहे. आतां फक्त तो तेवढा या किल्ल्याबाहेर निघाला पाहिजे. हो, सायंकाळचा पहारा बदलायची वेळ झालीच. त्या बाईनं आपल्या भावाला आणि त्यानं आपल्या जरूर त्या सोबत्याला भारून ठेवलं असेलच. चला, जय भवानी; देवीचं नांव घेऊन युक्तिप्रयुक्तीनं आपला कार्यभाग उरकून घेतला पाहिजे. ( किनरीवर वरील गाणें म्हणत असतां ठाण्याच्या किल्ल्याच्या आंतील भाग दृश्य होतो. ) [ उघड ] भिक्षा घाला वो माय.

**संत्री शिपाई**:—ये तूं कौन है ? क्या ये किसीका मकान है ? ये तो किल्ला-कैदखाना है—

**गोसावी**:—हम् तो गोसावी, बुवा बैरागी ! हमकूं मकान क्या, किल्ला क्या, और कैदखाना क्या, सब सरीखे है ! बुवाजीकूं थोडी भिक्षा डालो भाई !

**संत्री**:—ए बुवाजी, तुम क्या दिवाना है ? अरे इदर क्या हमारा मकान है ? ए बैरागी, हमारी औरत भी इदर नाहीं, और कोइ लडका भी नही.

**गोसावी**:—जमादारसाब, मेरेकुं आपकी औरत और लडका कोइ भी नही होना. मैं तो कानफाट्या नाथपंथी गोसावी, मेरेकूं थोडी भिक्षा डालो जी.

**संत्री**:—अरे, हम तो इदर पकाता नही–और खाना भी खाता नही–चलो यहांसे–माफ करो भाई, तखलीप मत देव.

**गोसावी**:—जमादारसाब, आटा नही तो नही, एक शिवराई तो देव. भगवान तेरा भला करेगा. ( किनरीच्या सुरांत ) ये आठ रोजमें तुमकू बहोत लाभ है, तुमारी बहोत बढती होती है. ( किनरींत तसेंच वाजवितो )

**संत्री**—( खूष होऊन ) वा:—वा:—! बहोत खाशी–! तुमारी किनरी तो बहोत उमदी है—क्यौं हमारी बातमे एक गाना गाता क्या इसपर ?

**गोसावी**:—आपकी बोली कोनसी जमादारसाब ?

**संत्री**:—मराठी—

**गोसावी**:—मराठी—! बहोत अच्छा—! मला फटके वगैरे पुष्कळ येतात, म्हणूं का—?

**संत्री**:—थांबा–( हांका मारतो ) सटवाजी अरे सटवाजी, कोन आहे र तिकड; राम्या, जा लेका सटवाजीला हाक मार, माझा पहारा आटपला. आट वाजले, लेका लौकर ये म्हनावं. ( पाहून ) अरे पन हा आलाच. राम्या नक्रो जाऊंस. सटवाजीराव, ही घ्या बंदुक आमची थोडा वेळ. आतां या बोवाचं थोडंसं गानं ऐकूं या. देवडीवरच्या लोकांलाबी बोलावूंया. अर ए रानबा, ए यंक्या, अहो मादबा, या या लेकाच्यांनो हकडं सम्दं–! बोवाजी नामी गानं म्हनत्याती ऐका तरी मर्दांनो. ( सगळे येतात ) अरेच्या ! अर मर्दांनो बसाया कांहीं नगच काय र ! जा जा कांबळं घेऊन ये जा. यंक्या, तुला सांगतुया—बगतुस कुटं भेकरासारखा—! बैटक कुटं टाकावी बरं–? ( व्यंक्या कांबळी घेऊन येतो त्यास ) आं— हां— अशी त्या खिडकीखालीं टाका. ( कांबळी टाकून सगळे गोसाव्या-भोंवतीं बसतात. ) काय बुवा, असं एखादं गानं म्हनाल कीं ज्याचं नांव तें.

**गोसावी**:—पहा—जसं येईल तसं म्हणतों. ( किनरी लावून सलाम करून)

— फटका —

अष्टौ प्रहर येउं दे वाचें नाम देवाचें शिव हर हर हर ।
दे टाकुनि हे छंद व्यावुगे फंद विषयिंची काय मजा ।।
हरिनामाची लावि ध्वजा ।। असार हा संसार त्यजा ।।
तमोरजाला देच रजा ।। क्षमा, शांति मनीं धरीत जा ।।
सत्वगुणाची करी पुजा ।। भगवीं वस्त्रें करी पोटभर ।।
भिक्षा मागे घर, घर, घर ।। अष्टौ० ।। १ ।।
येऊन परोपकारें शरिर झिजवावें जैसा मैलागिरी चंदन ।।
कर सज्जन-चरणीं वंदन ।। सहा शत्रूंचें करीं कंदन ।।
गृहवैभव—वाजी—स्यंदन ।। अशाश्वत ह्या हो धुंद न ।।
एक हरिचरणीं फिर गर, गर, गर ।। अष्टौ० ।। २ ।।

( सर्व माना डोलावतात )

**संत्रीः**—फारच छान— फारच नामी बुवा— रानबा; काडा चंची-बुवाल्ली थोडी पान तंबाकु तरी द्या. ( पान तंबाखूच्या तयारीस लागतात. )

**त्रिंबकजीः**—(खिडकीच्या तोंडाशीं येऊन स्वगत) इतके दिवस झाले, मला या टोपीवाल्यांनीं इथं आणून टाकला. बाबासाहेबांच्याकडची कांहींच वार्ता कशी नाहीं. बाबासाहेब, माझ्यावांचून सुपारीचं खांडसुद्धां तुह्मी तोंडांत टाकायचे नाहींत ते इतके निष्ठूर कसे झालां ? तुमच्याकरितां मीं कित्येक साध्वी स्त्रियांचे शाप घेतले आणि शेवटीं ब्रह्महत्येचंहि पातक करण्यास मागं पुढं पाहिलं नाहीं. बाबासाहेब, मीं हें सारं तुमच्याकरितां केलं— कोणी कांहीं म्हणोत पण मीं स्वामिसेवा एकनिष्ठेनं बजाविली आणि देवानं दिवस दाखविले तर या स्वामिसेवेंतच माझा देह मी समर्पण करीन. ( विचार ) या खिडकीखालीं मघांपासून गाणं चाललं आहे; आवाज तरी ओळखीचा दिसतो. काय आहे पाहूं या तरी.

**शिपाईः**—म्हना—आनकी एकादा फक्कडसा—

**गोसांईः**—ऐका तर मगः—

—फटका—

चल उठ घडी ही साधायाची व्यर्थचि बाबा दवडुं नको ।।

सखा तुझा हा परम प्रीतिचा झुरतो मनीं हें पाहुं नको ॥धृ०॥
नेतां ऋषीनें झाला कष्टी दशरथ जैसा रामाला ।
सवत्सधेनु नेतां रायें वसिष्ठ जैसा गांहिवरला ॥
अक्रुर आला क्रूर जहाला रामकृष्ण जें नेलें ।
वक्षस्थळ तें पिटुनि गोकुळीं आकांत किती झाले ॥
मृगशावका व्याध वधीतां हरिणी जैशी लोळे ।
लाल शरीरें तुजला हरितां मन हें त्याचें पोळें ॥
चातक पक्षी मृग जणुं लक्षी तेंवि तुझ्या दर्शना ।
उत्कंठित हा राव जाहला पाहुं नको या क्षणा ॥ चल उठ०॥१॥

**त्रिंबकजी**:—( स्वगत ) यांत तर इंग्रजांनीं मला धरल्याचा मजकूर आहे.

**संत्री**:—फारच नामी म्हटलं बुवा.

**म्हाद्बा**:—काय वो गोसाइबुवा, याचा अरुथ काय ?

**गोसावी**:—अहो या पुराणांतल्या गोष्टी. विश्वामित्रानं रामाला नेलं—अक्रूरानं रामकृष्णाला नेलं—

**गणुजी**.—हांग अक्षी त्येंच बगा. लई ग्वाड—लई ग्वाड गानं तुमचं जनु साखरवानी हां, चालूं या बुवा.

**गोसावी**:—

—फटका—

चिंचस्थानीं पेंच दीधला भिऊं नको गा अंतरीं ॥
प्रभूरायाची मर्जी तुजवर बहाल समज गा पुरी ॥
पण खचित मजला कळुं दे आतां कोण कुठें तूं वरी ॥
त्र्यंबकराया सोंगडी याचा हांक दे सत्वरीं ॥

**त्रिंबकजी**:—( स्वगत ) अरे ! हा तर माझंच नांव बोलला—

**गोसावी**:—हर हर शंभू म्हणतों आम्ही तूंही म्हण लौकरी ॥ ( किनरी थांबवून ) मग ही संसाररूप नौका तरून जायाला काय केलं पाहिजे तर—( इतक्यांत एक साहेब आणि दोन शिपाई गस्ती कंदील घेतलेले असे येतात.)

**साहेब**:—जमादार, ये तमाम लोक किसूवास्ते यहां जमे हुवे है.

**संत्री शिपाई**:—गाना सुननेके वास्ते हुजूर—मगर गाना तो खुदाई है.

**साहेब**:--अच्छा, हमूबी सुनेंगे- गोऑन--

**संत्री शिपाई**:—बुवाजी, साहेबांची गानं ऐकायची इच्छा आहे.

**गोसावी**:—अच्छा साब—

**वेडिबागडीं घरचीं नांदवा हर्दम ख्याली पाहूं नको ॥**
**दिधल्यावरतीं तुज देवानँ उर्णं कुणाला बोलुं नको ॥**

**साहेब**:—इसका माने क्या ?

**संत्री शिपाई**:—हुजूर, ये ऐसा कहता हैं के, अगरचे शादीकी औरत बदशकलभी हो तोभी उसके साथ रहना चाहिये लेकिन् खुबसुरत औरत जिसके फेल बद हो उससे मोहबत् कभी करना न चाहिऐ.

**साहेब**:—हां-ये फकीर है, इसकू गाने दो. लेकिन खबरदार रहेना क्योंके बाजीराव साब पेशवेका बडा बदमाश लडका उप्पर कैद है.

**संत्री शिपाई**:--हां हुजूर-[ गस्तवाले जातात ] चालुं द्या बुवा.

**म्हादबा**:—गेली एकदांची पिडा. आतां हा साहेब एक पारभरानं येनार—

**संत्री शिपाई**:—यंक्या जा लेका; चिलीम भरून आन-मारूं या एकक झुरका. ( चिलीम आणल्यावर ) घ्या मादबा घ्या.

**म्हादबा**:—आदुगर बुवास्नी द्या. ( बुवा विस्तव चाळण्याचें निमित्त करून त्यांत कांहीं टाकतो. मग हवालदार खेरीज सारे घेतात. पहारेवालाही घेतो. )

**सगळे**:—हां चालं द्या बुवा.

**गोसावी**:—हां-ऐका-ऐका.

**—फटका—**

**तरी उतरुनि दीड हांक तूं जातां दक्षिण आंगा ॥**
**देखशील मग थोर उंचशा तेथें तरुवर रांगा ॥**
**झाडाखालीं हैदरअल्ली सलाम त्याचा पहिला ॥**
**घोड्यावरती जीन घालुनी सज्ज तुला तो ठेला ॥**

**म्हादबा**:—लई ग्वाड-लई ग्वाड- (हात नाचवीत नाचवीत झिंगून उठतो.)

( पहिला संत्री शिपाई व गोसावी यांखेरीज सारे पडतात. )

**गोसावी**:--जमादार, आतां सारं ठीक झालं—

**आतां जांगणें व्यर्थ कशाला वेळ चालला वांया रे ॥**

गवाक्षद्वारीं येतां दुसऱ्या दोरी लागल पायां रे ॥

( पाहाऱ्यावरच्या शिपायाची बंदूक पडते ) जमादार, आतां रडायला गाणं बिणं हवं कशाला ? तो पहा त्रिंबकजी आला. तुह्मी जा त्याच्याबरोबर तरीवर. घ्या ती आपली बंदुक. तुमची आमची आतां सिंहगडास भेट.

**त्रिंबकजी**:—( गहेनाजीस भेटून ) गहेनाजी, मला पुष्कळ बोलायचं आहे रे. ( टिपें गाळतो. )

**गहेनाजी**:—वेड्या रडूं नकोस. स्वराज्याची इतिश्री होणारशीं दुश्चिन्हं होऊं लागलीं. नादान मालकाचे आह्मी नौकर आहोंत. स्वराज्याचीच जिथं धडगत नाहीं तिथं तुझी आमची काय कथा ? जा जा—जमादाराबरोबर तरीवर जा—तिथं सारी व्यवस्था आहे. मी जातों दुसऱ्या वाटेनं.जा—जा—ही वेळ रेंगाळण्याची नव्हे. ( ते जातात—पडद्यांत बंदुकीचे बार. ) तरीकडच्या पहारेवाल्यानं गोळी झाडली वाटतं. अरे ही किनरी—अंः ! आतां ही कशाला पाहिजे ? ! ( आदळतो ) हां हां ही बरी आहे. [ पहारेवाल्याची बंदूक घेतो- ] अरे बापरे ! हे गस्तीवाले आले वाटतं—! आतां घ्या म्हणावं लेकांना—( पळून जातो, पूर्वोक्त गस्तीवाले येतात. )

**साहेब**:—( रागानें पाय आपटून ) I will shoot them all. सब बदमाष गाफील होगये—ये सटवाजी—ये मादबा—अरे ए पागल तुम ऐसे कैफी कैसे बन गये. ( चिलीम पाहून ) हां ये चिलीमने तुमकूं दिवाना करे. ( सर्वांना हालवतो—कोणी पडतात—कोणी झिंगतात. ) वो बैरागी बदमाष है, ऐसा मेरे ख्याल मे आयाथा. लेकीन वो जमादार कहां है ? वोभी फरारा हो गया ! My God चावडीपर लुटारुने आपना काम किया. It's the worst stain on my service. How should I show my face to Elphinston and the Governor ( त्वेषानें साऱ्यांना मारतो ते पडत पडत पळून जातात. ) अब शेख महंमद, तुम चार घोडे सवार जलदी ले आव. और बहादुरसिंग तुम दर्वाजे पर खडे रहो और किसीको अंदर मत जाने दो. My God; my God—

( पडदा )

अंक पहिला समाप्त.

———

# पेशवाई.

## अंक दुसरा.

### प्रवेश पहिला.

**स्थळ**:--पुणें, बेटावरील इंग्रजांची छावणी; एल्फिन्स्टन साहेबाचा बंगला.
( एल्फिन्स्टन विचारांत बसला आहे असा पडदा उघडतो. )

**एल्फिन्स्टन**:—[ स्वगत ] अखेर त्रिंबकजी निसटला आं ! गायकवाडी प्रकरणामुळं त्रिंबकजीला अडकवितां आला, नाहींपक्षीं तो हातींच लागता ना-! बाजीरावाच्या पदरीं जीं चार तरवारबहाद्दर एकनिष्ठ माणसं आहेत त्यांतला हा त्रिंबकजी आयता हातीं आलेला असा सुटला, हें बरं नाहीं झालं. आणखी आतां नवीन संकटं कोणकोणतीं येतील याची कांहीं कल्पना करवत नाहीं. ( विचार ) ' त्रिंबकजीला भल्या गोष्टीनं आमच्या स्वाधीन करा-तोंपर्यंत आपला आमचा व्यवहार बंद राहील, ' असा स्पष्टोक्त निरोप पाठवून तर चुकलों. पण पेशव्यांच्या सत्तेचा व्यापकपणा पाहिला कीं, दर्यामें खसखस अशी आमची स्थिति होणार आहे. पेशव्यांशीं हमरी तुमरी करून खरोखरच आमचा निभाव लागणार नाहीं. पेशव्याचं दुर्वर्तन, कारभारांतली ढिलाई आणि चंचलपणा यांचाच उपयोग या वेळीं आम्हांला होणार. ( पहारेवाला येतो, त्यास ) कोन—?

**पहारेवाला**:—बाळाजीपंडत.

**एल्फिन्स्टन**:—अच्छा है, आने दो--( स्वगत ) हा बाळाजी नातु चांगला माणूस मिळाला आहे. वसईच्या तहाला बाजीराव वाळिदला यानंच आणि पेशव्याची हरएक बातमी तात्काळ देणारा हाच. एखादा युरोपिअनही इतकी मनापासून कामगिरी करणार नाहीं. ( बाळाजी येतो, त्यास ) ओहो ! बाळाजी पंडत,

गुड मॉर्निंग, गुड मार्निंग, आय मीन–नमस्कार, नमस्कार–या, या, बसा; बसा त्या खुर्चीवर. काय विशेष बातमी ?

**बाळाजी**:—आपणावर एकाएकीं तुटून पडण्याची पेशव्यांची खलबतं चालू आहेत. परवांच गुप्त दरबार भरला—

**एल्फिन्स्टन**:—परवां ? आणि त्याची बातमी आज ? !

**बाळाजी**:—बाबासाहेबांनीं त्रिंबकजीच्या मदतीकरितां माणसं पाठविलीं; त्रिंबकजीकडची कांहीं तरी बातमी पाहिजेच ना ? त्यासाठीं रामा हुजऱ्याला त्यांच्याबरोबर दिला पाठवून.

**एल्फिन्स्टन**:—पंडत, तुमचे आम्हांवर खरोखर मोठे उपकार आहेत. कंपनी सरकार तुम्हांला विसरणार नाहीं.

**बाळाजी**:—रामा हुजऱ्या गेला–तेव्हां दरबारची बातमी कशी मिळेल या काळजींत होतों. पण काय म्हणतात ना–परमेश्वराला काळजी ! ते गणेशपंत सहस्त्रबुद्धे, पटवर्धनाचे कारभारी, ते होते त्या गुप्त दरबारांत–त्यांची भेट घेऊन बातमी काढावी लागली !

**एल्फिन्स्टन**:—पटवर्धन थिथरले आहेत हें बाबासाहेबाला माहीत नाहीं ? असं असून त्यांचा कारभारी गुप्त दरबारांत–

**बाळाजी**:—हीच तर सध्यांच्या पेशवाईंतली गम्मत आहे ! खरं सांगूं का ? बापू गोखले, नारोपंत आपटे, मोर दीक्षित, गणपतराव पानसे, आबा पुरंधरे, विठ्ठलपंत विंचूरकर व आणखी कांहीं थोडेसे, यांशिवाय झाडून सारे सरदार थिथरले आहेत.

**एल्फिन्स्टन**:—ही मंडळी आमच्यावर एकदम उठली तर मग आमची मोठी पंचाईत होणार–

**बाळाजी**:—पण हा नातु आहे ना–? तुह्मी असे घाबरतां कां ? पेशव्यांचा सारा जोर पानशांच्या तोफखान्यावर. तोच आधीं मुका पाडतों–मग पाहूं या बापूंच्या घोडेस्वारांची तुमच्या फैरीपुढं काय डाळ शिजते ती ?

**एल्फिन्स्टन**:—पण तोफखाना तुम्ही मुका कसा पाडणार ?

**बाळाजी**:—दारुंत बाजरी भरून—भिवा शिपायाला बाबासाहेबांनीं काल छड्याखालीं फोडून काढला. एवढंच कारण धरून त्याला पानशांच्या दारूखान्या-

वर नेमावा अशी बाबासाहेबांला साहेबांनीं ताकीद द्यावी. तेवढं जमलं, कीं पेशवाई साहेबांच्या हातांत. आहा-! तो सोन्याचा दिवस केव्हां उगवेल ? शनिवारच्या वाड्यावरला भगवा झेंडा काढून त्या ठिकाणीं कुंपनी सरकारचं निशाण न चढवीन तर मी ब्राम्हणाचा बच्चाच नव्हे.

**एल्फिन्स्टन**:--आमच्याकरितां तुम्ही इतके झटतां-

**बाळाजी**:--छेः छेः ! तुमच्याकरितां नव्हे, माझ्याकरितां-. आतांशा तर मला पुण्यांत रहाणंसुद्धां गोड वाटत नाहीं. बेटावर केव्हां जाईन असं होतं—! अहो, ज्या राज्यांत बायकांची किंमत नाहीं—भल्याची दुलाई नाहीं—न्यायाचं नांव नाहीं—तें राज्य एकदम रसातळाला गेलंलं बरं—! ( पहारेवाला प्रवेश करितो. )

**एल्फिन्स्टन**:--कोन-?

**पहारेवाला**:—पेशवे सरकार-!

**बाळाजी**:--पेशवे सरकार ? मग मी होतों बाजूला-भिवा शिपाई दारुखान्यावर गेलाच पाहिजे-एवढं करा. ( जातो. )

( एल्फिन्स्टन बाहेर जाऊन पेशव्यांना घेऊन येतो. पेशव्यांबरोबर गहेनाजी असतो. पेशव्यांना कोचावर बसवून एल्फिन्स्टन जवळच खुर्चीवर बसतो. गहेनाजी पेशव्यांच्यामागें त्यांचा शरीररक्षक म्हणून उभा रहातो. )

**बाजीराव**:—( हुश हुश करून ) आज उष्मा फार होतोय नाहीं बरं ?

**एल्फिन्स्टन**:--कोन-जॉन्सन ? ( वारा घालण्यास सांगतो आणि आपण स्वतः गुलाबपाणी घालूं लागतो. )

**बाजीराव**:—नको, नको. नको, फार नको-

**एल्फिन्स्टन**:—आहो-आपण आमच्या कंपनी सरकारचे परम दोस्त. आपला मात्र खरा स्नेह पाहिजे.

**बाजीराव**:—उभयतांचाही पाहिजे.

**एल्फिन्स्टन**:— आमच्या सरकारची तर कसूर नाहीं.

**बाजीराव**:— आमची तरी कुठं आहे ? आम्ही तर तुम्हांला अगदीं आपले समजतों.

**एल्फिन्स्टन**:— वाः ! तें का मला माहीत नाहीं-? परंतु आपले कामगार

लोकांची तक्रार–त्याला काय करावं ? आपल्यासारख्या साधू पुरुषाला देवयात्रा, तीर्थाटन, स्नानसंध्या यांखेरीज कांहीं त्रास असूं नये. पण हे निमकहराम कामगार आहेत ना ? परवां त्यांनीं आपणाला कांहीं तरी सांगून त्या भित्रा शिपायाला उगीच बेदम मारविला. तो आला तक्रार घेऊन माझ्याकडं. आपल्यासारख्या साधूच्या हातून असा अन्याय होऊं नये.

**बाजीराव**:—झालं खरं–काय करावं–?

**एल्फिन्स्टन**:—हात्तिच्या, त्यांत तें काय कठीण ? ! त्याला कुठल्या तरी चांगल्या जागीं नेमला म्हणजे झालं. तो आहे शिपाई गडी, तेव्हां तो खाजगींत नसला म्हणजे झालं. मला वाटतं तुम्ही त्याला बापूंच्या किंवा दीक्षितांच्या नाहीं तर पानशांच्याकडे द्या. शिपाई माणूस शिपायांतच चांगला.

**बाजीराव**:--तुम्ही सांगाल तिकडे पाठवूं—तुमच्या मर्जीबाहेर कांहीं मी नाहीं.

**एल्फिन्स्टन**:--तें मी तुम्हांला विचार करून सांगेन--पण त्यांत तुमच्या कामगारांचा मला राग येतो–परवां त्यांनीं गाढवावरून त्रिंबकजीला रुपये पाठविले. तुम्ही म्हणतां त्रिंबकजी पळाला यांत आपलं आंग नाहीं.–पण तुमचे कामगार फार मसलती–

**बाजीराव**:–गाढवावरून ? आणि रुपये पाठविले ? आणि तेसुद्धां त्रिंबकजीला ? सांगा नांव तरी सांगा–चांगलं पारिपत्य करतों, गुलामाचं.

**एल्फिन्स्टन**:--ऐवज तरी थोडा थोडका का ? दीड दीड हजाराचे सात तोडे. वरून कोळसे आणि खालीं रुपये ! वसईकर बाळाजीपंतानं पाठविला होता, हा ऐवज. तो सहज आमच्या हातीं लागला. अशी चोराचोरी तुमच्या राज्यांत चालली आहे. आतां आपला ऐवज आपण घेऊन चला–पण ही अंदाधुंदी मात्र बरी नव्हे.

**बाजीराव**:—लुच्चे हो लुच्चे लोक सगळे. तो ऐवज आपणांकडेच असूं द्या. मी तर या लोकांना अगदीं कंटाळलों बुवा.

**एल्फिन्स्टन**:—म्हणूनच म्हणतों कीं कारभार आमच्या हवालीं करा. पेंढार मोडतों–त्रिंबकजीला पकडतों–तुम्हांला घर बसल्या दहा आणे अगदीं बिन बोभाट

देतों. कशाला करता ही दगदग ? आम्ही खरोखर सहा आण्यांवर अगदीं खूष आहोंत.

**बाजीराव**:—मीही त्याच विचारांत आहें–तुम्हांला सहा आणे पाहिजेत ना ? मोठ्या आनंदानें देतों–तुम्ही इथली छावणी मुंबईला न्या. आम्ही तुम्हांला सहा आणे आपण होऊन पोंचते करतों. आमच्याकडून कसूर झाल्यास तुम्ही म्हणतां तसं करूं.

**एलिफन्स्टन**:—ही बदसल्ला कोणीं दिली तुम्हांला ? मला वाटतं गोविंदराव काळ्यानं–होय ना ? आतांशा तुमचे गुप्त दरबार चालले आहेत–ते याचसाठीं वाटतं ! आम्हांला इथून घालवून देऊन हे बारभाई तुमच्या राशीला लागतील. या लुच्चा लोकांना पेशवाईचे तुकडे तुकडे करायचे आहेत. तुम्ही मालक भोळे, म्हणून या हरामखोरांचा हा खेळ चालला आहे. आणखी कोण कोण काय काय सांगत होते—?

**बाजीराव**:—( स्वगत ) या लेकाला या बातम्या लागतात कशा ? काय कर्णपिशाच्च साधन केलंय समजत नाहीं. आतां कशाला चोरा ? ! सांगून टाकावं सारं याला. हा कांहीं तितका वाईट नाहीं.

**एलिफन्स्टन**:—माझ्यापाशीं सांगायला का तुम्हांला चोरी वाटते ? मग तुमची आमची दोस्ती कसली ?

**बाजीराव**:—छेः ! छेः ! चोरी कसची. परवां दरबारांत ( इतक्यांत गहेनाजी बाजीरावांच्या धोतराचा पदर जरा ओढतो. बाजीराव मागें पहातात–पण डोळे मोठे करतात. तो पदर सोडतो. )

**एलिफन्स्टन**:—मला वाटतं बापू असतील–आमचे वकील खरशेटजी–गोविंदराव काळे, पुरंदरे, वगैरे असतील. सहा आणे देण्याचं बापूंच्या मनांत नसेल, मोठा मर्द–त्याला पाहिलं कीं, मला मोठं समाधान वाटतं–!

**बाजीराव**:—खरोखरच तो तसा आहे. त्याचा आपल्या तरवारीवर विश्वास. तो म्हणाला, मला दोन लढाया करायला सांगा; पण पै देण्याची गोष्ट कांहीं बोलूं नका.

**एलिफन्स्टन**:—अस्सं–! आणि काळे काय म्हणाले ?

( गहेनाजी पदर ओढून बाजीरावास दाबतो. )

**बाजीराव:**—काळे फार कांहीं म्हणाले नाहींत.-कारभार आपण करूं आणि इंग्रजांस सहा आणे मुंबईस पोंचते करूं.

**एल्फिन्स्टन:**—मग यावर खरशेटजीनं कांहीं शकल काढली कीं नाहीं ?

**बाजीराव:**—ते कांहीं बोलले नाहींत-बोलले कांहो गहेनाजी ?

**गहेनाजी:**—काय कीं, महाराज-मी तेव्हां नव्हतों तिथं-

**एल्फिन्स्टन:**—( स्वगत ) चाकराच्या शतांशही मालकाला अक्कल नाहीं. ( उघड ) खरशेटजी उगीच बसायचा नाहीं कांहीं तरी बोललाच असेल-

**बाजीराव:**—' काळयाच्या म्हणण्याप्रमाणें चला-आपण लवकरच या साहेबाची बदली करवितों,.' असं म्हणाला-( इतक्यांत गहेनाजी उपरण्याचा शेवट ओढतो. ) काय हो हें गहेनाजी ?

**गहेनाजी:**—झुरळ सरकार-! ( ' झुरळ ' ' झुरळ ' म्हणत बाजीराव घाबरून उठतो-गहेनाजी बाजीरावाचें उपरणें घेऊन बाहेर जातो. )

**—पडदा—**

---

( जंगल रस्त्यावर )

**गहेनाजी:**—( स्वगत ) झुरळाला भिणारा हा आमचा मालक ! हिंदुपदपादशाहीचा हा आधारस्तंभ, असा भ्याड आणि नादान असावा ?! कोण दैवदुर्विलास हा ! साहेब जसजसा हारभऱ्याच्या झाडावर चढवूं लागला, तसतसा हा रावबाजी सर्व गुप्त मसलत खुशाल बोलून गेला. काय म्हणावं याला-? आतां आधीं ही बातमी खरशेटजीला आणि गोविंदराव काळयांना कळविलीच पाहिजे. पण ती कशी कळवावी ? हाहा-! हें माझ्याजवळ जायफळ आहे-हें करील माझी कामगिरी-( अंगरख्याचा बंद तोडून तो जायफळाभोंवतीं गुंडाळतो आणि खुणेनें एका स्वारास बोलावून त्याचे हातीं तें देऊन ) आधीं खरशेटजी मोदीला हें दाखीव आणि मग गोविंदराव काळ्यांना नेऊन दे. जा, दौड कर. ( तो जातो. साहेबाचा पहारेवाला येऊन चिट्ठी देतो व जातो. ) काय ?! नारोपंतांना पाठवून द्या ! कांहीं तरी निमित्तानं मला दूर करण्याची ही साहेबाची युक्ति या आमच्या



बाजीरावः—बोलले का हो गहेनाजी ? • [ पृष्ठ २२. ]

भोळ्या सांबाला कशी समजणार ? बातमी फुटायला नको होती ती फुटली—आतां आधीं झालेली हकीकत आपण बापूंना कळवूं या. हा मालक असा मिळाल्यावर सेवकांनीं दुर्दैव म्हणून आपल्या नाशिबाला बोट लावण्यावांचून गत्यंतर नाहीं. मुत्सद्दी म्हणून नांवाजलेल्या पेशव्यांच्या गादीला हा असला भळ वारस मिळाला—महाराष्ट्रा, तुझी सद्दी संपली हेंच खरं—! तुझ्या प्रतापाचा दरारा स्मशानापर्यंत गाजला पण आज तो मातीमोल होऊन गेला. असल्या मूर्ख मालकानं तुझा गळा कापला—महाराष्ट्रा ! नशीब फुटलं म्हणून तूं रड—आतां तुझ्या हातीं मुक्तकंठानं रडण्यावांचून कांहींच राहिलं नाहीं: हाय हाय ! नाना गेले—महादजी गेले—तसा थेरड्या, तूंहि गेला असतास—तर हें काळजाचं पाणी पाणी करणारे धिंडवडे पहाण्याचं तरी तुझ्या नाशिबीं आलं नसतं—! ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळः**—जंगल रस्ता—एक तारीवर ईश्वरनाम-स्मरण करीत लक्ष्मी जोगिणीचा वेष घेतलेली अशी प्रवेश करते.

**लक्ष्मीः**—( स्वगत ) आहा ! किती मनोहर ही सायंकाळची वेळ—! पण या वेळींच नेहमीं दिसणारा तो अस्ताचलावर गेलेला निस्तेज सूर्य पाहिला की काळीज कसं अग्दीं धस्स होतं; नी मीं संतापाच्या आवेशांत कशाला शाप दिला असं वाटतं—! गुरुमहाराज म्हणतात,स्वराज्याचा सूर्य आतां अस्ताचलावर चढलाय तो लवकर अस्तंगत व्हायला साध्वी स्त्रियांचे शाप कारण होत. ( सुस्कारा टाकून ) हाय हाय ! स्वराज्याला शाप साध्वी स्त्रियांचे ! कां, तर त्याचं रक्षण—त्याच्या अब्रूचं रक्षण—स्वराज्य करीत नाहीं म्हणून—! स्त्रियांच्या शापानं रावणी राज्य चुटकीसरशीं जमीनदोस्त झालं,—स्त्रियांच्या शापानं कंसाचं राज्य, दुर्योधनाचं कौरव साम्राज्य लयाला गेलं,—स्त्रियांच्या शापानं मोंगलाई ढांसळली आणि स्त्रियांच्याच शापानं पेशवाई डळमळूं लागली—! अशा या स्त्रियांच्या वाटेला तरी हें धुरंधर लोक जातात कां ? ! राजाचं प्रायश्चित्त रयतेला. औरंगजेबाचा मूर्खपणा मोंगल लोकांना

भोंवला-तसाच या रावबाजीचा पापी खेळ या महाराष्ट्राला भोंवून त्याच्या स्वातं-त्र्याचा खेळखंडोबा होण्याला कारण होणार खास ! ( विचार ) आहा ! असं केलं तर ? ! हा रावबाजीच पेशवाई पदावरून ढकलला तर ? ! तर काय ? पापाचं योग्य प्रायश्चित्त रावबाजीचं रावबाजीला मिळेल आणि स्वराज्य अगदीं सुरक्षित राहील. आहा ! युक्ति पर युक्ति ! आतां आधीं ही गोष्ट गुरुमहाराजांना विचारतें आणि या रावबाजीला पदभ्रष्ट करण्याची खटपट करतें. ( जाते. )

**अन्याबा रहातेकरः**--( तिच्या पाठोपाठ प्रवेश करून ) दिसते अगदीं लक्ष्मीसारखी-! पण त्या तेवढ्या उंच अशा तटावरून उडी घेतल्यावर लक्ष्मी आधीं जिवंत रहाते कशाला ? ! बाबासाहेब म्हणतात, कांहींहि कर नी लक्ष्मीला घेऊन ये-आतां यांच्या या चोखाळपणाला काय करावं ! शे दीडशे बायका आज साऱ्या वाड्याभर चमकताहेत, त्या दिल्या सोडून आणि यांनीं लावलेत लक्ष्मीकडे डोळे ! (विचार) आणि खरंच, विचार केला तर बाबासाहेबांची लक्ष्मी आतां आहे कुठं ! ती केव्हांच बेटावर जाऊन पोंचली.-अशा स्थितींत पेशवाईच्या या जळत्या घराचा जो म्हणून पळता वांसा हातीं लागेल तो लांबवायला कमी •कां करा ! हे कोण आले ? ! दिसतात कोणी तरी हरदास, नाहींतर पुराणिक-बातमी काढणारे मोठे वस्ताद—! थोडा हवा खाण्याकरितां म्हणून बाहेर आलों तर आहेतच हे पाठीमागें ! ( शास्त्री प्रवेश करतो. ) का ? कुठले ? वाड्यांतच कां बसला नाहीं--?

**शास्त्रीः**—आं-! जेहेत्ते तिथं शास्त्र्यांची ही गर्दी झालेली. तेव्हां अस्मा-दिकांची दाद सत्वर लागायची नाहीं; तस्मात् चरणांच्या दर्शनार्थ इकडे आलों.

**अन्याबाः**—काय काय विद्या येतात ? सामुद्रिक, ज्योतिष, कांहीं• येतं का—?

**शास्त्रीः**—अस्मद्गुरुवर्यांच्या प्रसादेंकरून सर्व शास्त्रं अल्पस्वल्प अवगत आहेत. महाराजांना सध्यां शनि वाईट आहे-

**अन्याबाः**—काय म्हणता ? ! फारच अनिष्ट आहे का-!

**शास्त्रीः**—आतां काय कथन करावं-अहो कारभारी साहेब-राज्यपदभ्रष्टता तर आहेच आहे-पण—

**अन्याबा**:—समजलों, समजलों-मग काय म्हणता शनीचा जप करवावा ?

**शास्त्री**:—नुसता जपच काय ? अभिषेकही पाहिजे आणि भरपूर अन्न-शांतीहि पाहिजे.

**अन्याबा**:—हो- हो-तें सर्व कांहीं करूं-! पण माझा शिरस्ता तुम्हांला माहीत आहे ना ? मिळकतींतला निम्मा हिस्सा माझा—

**शास्त्री**:—अस्मादिकांना तर तें आधींच ज्ञात आहे—

**अन्याबा**:—मग तर व्हा पुढं- शास्त्रीमंडळींत बसलेले असा-(शास्त्री जातो.) सध्यां या भिक्षुकांची पोळी मात्र खाशी पिकली आहे. जेवायला सव्वा हात पान-साठ साठ भाज्या आणि कोशिंबिऱ्या आणि इच्छेस येईल तें पक्वान्न—! बेट्यांच्या उदरीं शनि आला आहे-! हा शनि या भिक्षुकांकडून रावबाजीला तोंडांत टाकल्याशिवाय रहात नाहीं. ( तमासेवाले येतात. ) कां ? कोणत्या गांवचे—?

**तमासेवाले**:—आमी वय-? पंडरपुराकडचं—

**अन्याबा**:-सगळा संच बरा आहे ना—?

**तमासेवाले**:--अगदीं फरमास हाय पगा-

**अन्याबा**:--आणि ( नाकपुडीला.बोट लावून ) हें कोण आहे ?

**तमासेवाले**:—वाः वाः ! सरकार-तें माणूस तर फारच नामी हाय पगा-आज रातची हजरी हायच कीं-शिरस्ता काय मला ठाव नाय—?

**अन्याबा**:—अगदीं कल्गीतुऱ्याच्या लावण्या आहेत ना-?

**तमासेवाले**:--अक्षी बजरबट्टूच्या वगा सरकार! डफावर एकदां थाप पडली कीं, जनु मोराचा नाच होतोय पगा-

**अन्याबा**:--स्वारी खूष झाली पाहिजे-मग इनामाची काळजी नको. शिरस्ता आहेच तुला माहीत ?

**तमासेवाले**:—भागीचा ना—? वाः ! त्यो तर आदुगरच दकल हाय सरकार.

**अन्याबा**:—जातर देवडीवर उभा रहा-आलोंच तिकडे मी—( तमासगीर जातात. )

**अन्याबा**:—( स्वगत ) थोरले बाजीराव नी हे धाकटे रावबाजी-! हुबेहुब

नक्कल–! हे जर पेशवाईची नक्कल न करतील तरच आश्चर्य! तें कांहीं कां असं ना, आपण मात्र वाटेल तसा हात मारून घेतला पाहिजे–रावबाजीची आज नाहीं उद्यां उलटी अंबारी होणार, हें भविष्य वर्तवायला कांहीं कोणी ज्योतिषशास्त्र चाळायला नको. त्या वेळीं अन्याबा, तुझा योगक्षेम डळमळतां उपयोगी नाहीं, एवढ्याकरितां तरी तूं सांपडलेल्या या संधीचा आपलं घर भरण्याकडे उपयोग करून घे. ( विचार ) आणि हेंही खरंच–कीं या रावबाजीला मीं नाहीं लुबाडलं तर दुसरे कोणीं का स्वस्थ बसणार आहेत ? मग कानांत तुळशीपत्र घालून उगीच साधूचा आव आणण्यांत काय फायदा? रावबाजीच्या निमित्तानं आज कनक आणि कांता यांची चांगली चंगळ चालली आहे–हें असंच अक्षय चालो–म्हणजे यासाठीं तरी रावबाजी आणि त्याची पेशवाई, चिरंजीव होवो–अशी माझी त्या परमेश्वराला प्रार्थना असणारच. रावबाजीच्या दुराचारामुळं अनेकांच्या शापाग्नींत तो भाजून निघत असेल तर माझ्या या शुभाशीर्वादाच्या जलसिंचनानं त्याला आराम पडून तितकंच त्याचं आयुष्य वाढो म्हणजे झालं. ( पाहून ) चला, चला, रात्र बरीच झालेली दिसते–चौघडाही ऐकूं येत नाहीं. अन्याबा जवळ नाहीं हें पाहून रावबाजी आणि रावबाजीच्या अष्टनायका चिंतामग्न झाल्या असतील; तर चला आधीं त्यांचा उद्धार करूं या. ( जातो. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळः**—सिंहगडाच्या पायथ्याच्या जंगलांतलें देवालय.

( ठाकुरदासबुवा ध्यानस्थ, असा पडदा उघडतो. )

**ठाकुरदासबुवाः**—( ध्यान विसर्जन करून स्वगत ) कालाची गति अप्रतिबद्ध आहे, हें अगदीं अक्षरशः खरं आहे. भविष्यकालाचा ठाव लागत नाहीं आणि मानवी महत्त्वाकांक्षाही परिमित नाहीं, यामुळं या जगामध्यें नाना उलाढाली होत आहेत. ( पडद्यांत एकतारीवरील लक्ष्मीबें गाणें ऐकूं येतें. ) काय योगायोग

पहा-! पर्वतीच्या तटावरून जीव जाण्यासाठीं उडी घेणारी लक्ष्मी आतां आपल्या जीविताला या एकतारीच्या नादांत रमवीत आहे. खरोखर--

—पद—

**सदैव शुभ हेतू ईशाचा ॥ जगतिं दिसे तो साचा ॥ ध्रु० ॥**
**सत्व पहाण्या व्यसनीं घाली ॥ निश्चल राहूं जरि त्या कालीं ॥**
**वाली हो प्रभू दीनाचा ॥ १ ॥**

पण हें प्राकृतांना समजेल तेव्हां ना-! ( ध्यानस्थ )

**लक्ष्मी**:—( एकतारीवर परमेश्वर-चिंतन करीत प्रवेश करिते ) आहा ! सद्गुरुमूर्ति तर ध्यानस्थ आहे. नेहमीं आत्मचिंतनांत दंग-या अशा थोर विभूतीला या जगाच्या बऱ्या वाईट व्यापाराचा झपाटा बसणार तरी कसा—? ( पायांवर मस्तक ठेवते. ) गुरुमहाराज—

**ठाकुरदासबुवा**:—बेटा,—आज तुझी वृत्ति थोडी उत्तेजित कां बरं दिसते—?

**लक्ष्मी**:—कांहीं विशेष नाहीं महाराज,- एक युक्ति सुचली आहे, ती आपल्या कानावर घालावी आणि आज्ञा मिळेल तर तसं वर्तन करावं म्हणतें; यामुळं मन थोडंसं खळबळलं आहे झालं-दुसरं कांहीं नाहीं.

**ठाकुरदासबुवा**:—कसची बरं युक्ति सुचली आहे-?

**लक्ष्मी**:—ही पेशवाई— हें स्वराज्य-राखण्याची !

**ठाकुरदासबुवा**:—म्हणजे—! पेशवाई बुडणार हें खचितच कीं काय-?

**लक्ष्मी**:—स्त्रीक्षोभानं ही पेशवाई केव्हांच भडकली आहे—देवताक्षोभानं ही केव्हांच निःसत्व झाली आहे आणि लोकक्षोभानं इचा पायाच उखडला आहे. पेशवाई बुडायला आणखी तें काय पाहिजे ? शिवाय महाराज, आपणही असं म्हणतांना मीं पुष्कळदां ऐकलं आहे, पेशवाई बुडणार- बुडणार हें खचित—

**ठाकुरदासबुवा**:—असं असतांही- इतकी खात्री असतांही, ती बचावतां येईल अशी तुला युक्ति सुचली म्हणतेस ? !

**लक्ष्मी**:—होय महाराज. पाहिजे तर इला त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा म्हणा— पण इचे थोडेसे वळसे—नव्हे एकच वळसा दिला आणि तो पचला तर पेशवाई खात्रीनं बुडत नाहीं—

**ठाकुरदासबुवा**:—वा: ! इतकी का अजब युक्ति आहे- मग सांग बरं—आज या पेशवाईच्या बचावासाठीं कित्येक महात्मे झटताहेत, त्यांनां तुझी युक्ति पटली तर खरोखर मोठी बहार होणार आहे- बोल, बोल— कोणती बरं युक्ति ? बोल—

**लक्ष्मी**:—महाराज, पेशवाईच्या प्रचंड वृक्षाला अनेक कारणांनीं अनेक प्रकारची कीड लागली आहे. पण ही कीड कां लागली ? ही कीड थोरले बाजीरावांच्या वेळीं कुठं होती-? थोरल्या रावसाहेबांच्या अमदानींत ही कीड कां लागली नाहीं-? आणि आत्तांच या रावबाजीच्या राज्यारोहणाबरोबरच ही कां दिसूं लागली-? मला तर असं वाटतं पेशवाईला सध्यां जो त्रिदोष झाला आहे, याचं कारण हा रावबाजीच.

**ठाकुरदासबुवा**:—बरं मग—?

**लक्ष्मी**:—मग हा रावबाजीच पेशवाईवरून दूर केला तर- ? तर मला वाटतं पेशवाईचं आयुष्य खात्रीनं वाढेल.

**ठाकुरदासबुवा**:—पण रावबाजीला पेशवाईवरून दूर कसा करणार ?

**लक्ष्मी**:—पण ही युक्ति आधीं योग्य आहे का ? ही युक्ति महाराजांना पसंत असेल- तर पेशवाईच्या राशीला लागलेला हा रावबाजी दूर कसा करायचा याचा विचार आणि त्याप्रमाणं खटपट महाराजांच्याच विचारानं करतां येईल. महाराज, हीं युक्ति आपणांला पसंत आहे का ?

**ठाकुरदासबुवा**:—युक्ति कांहीं वाईट नाहीं. रोगाचं निदान बरोबर आहे, औषध-योजनाही बरोबर आहे. पण सध्यां रोगाचा जोर इतका आहे कीं औषध देणार कसं आणि तें पचणार तरी कसं ?

**लक्ष्मी**:—तें आपल्या कृपाप्रसादाच्या जोरावर सध्यां होणार नाहीं कां ?

**ठाकुरदासबुवा**:—म्हणजे हीं आमच्या परीक्षेची वेळ आणणार तूं- रावबाजीला पेशवाईपदावरून ढकलून देऊन पेशवाई राखायला तयार झालेली तूं याच्या आधींच कां शुद्धीवर आली नाहींस ? रावबाजी आणि हें स्वराज्य नष्ट होऊं दे असे शाप देणारी तूंच ना- ! अग तूंच काय पण आणखी कित्येक साध्वी स्त्रियांचे शाप रावबाजीला आणि रावबाजीच्या निमित्तानं या स्वराज्याला

ग्रासायला तयार आहेत. स्वराज्यांत कारभाराची ढिलाई पडली-लोक बेदील झाले-शिस्तीचं नांव नाहीं-टोपीवाल्यांची छावणी बेटावर आली म्हणजे त्यांनीं अगदीं काळजालाच हात घातला आहे. खुद्द मालक बेघरी-सरदार लोकांत फितुरी-एक ना दोन-अनेक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कारणांनीं हें स्वराज्याचं मंदीर अगदीं खिळखिळं झालं आहे. अशा बिकट स्थितींत तुझी ही युक्ति साधणार कशी-? समज कीं तुझ्या प्रयत्नाला यश आलंच आणि रावबाजी पदभ्रष्ट झालाच-पण रावबाजीमुळं ज्या शापांनीं स्वराज्याला घेरलं आहे ते साध्वी स्त्रियांचे शाप आपलं कार्य बजावल्याशिवाय रहातील काय—? मला तर वाटतं कीं स्वराज्यासाठीं तरी स्त्रियांनीं रावबाजीला शाप द्यायला नको होते.—

**लक्ष्मी:**—हो-तेंही खरंच-

**ठाकुरदासबुवा:**-पण ते शाप तर स्वराज्याच्या जीविताला अगदीं खिळले आहेत—एक युक्ति आहे---स्त्रिया मनावर घेतील तर हें होणार आहे

**लक्ष्मी:**—काय बरं तें ?

**ठाकुरदासबुवा:**-तुम्ही तुमचे शाप परत घ्या—

**लक्ष्मी:**--पण तें आतां अशक्य आहे--

**ठाकुरदासबुवा:**-तें कां बरं--?

**लक्ष्मी:**-सूड घेण्याची वृत्ति अंतःकरणांत नेहमींच जागृत ठेवल्यामुळं आमचंही सात्विक बल नष्ट झालं आहे--छेः आमचे शाप परत घेण्याची आमच्या अंगीं शक्ति नाहीं.

**ठाकुरदासबुवा:**--मग एकंदरींत स्वराज्यांतल्या स्त्रियांच्याच शापानं स्वराज्य पंचत्वास पावणार म्हणायचं--रावबाजीकरितां स्वराज्यावर तुम्हीं आग पाखडायास नको होती. आतां कांहीं केलं तरी स्वराज्य तगेल असं नाहीं मला वाटत.

**लक्ष्मी:**—पण मी प्रयत्न करून पहावा म्हणत्यें.

**ठाकुरदासबुवा:**—पण ऐन वेळीं तुझी सुडाची इच्छा बळावेल. रावबाजी आणि स्वराज्य यांची सांगड तोडतां तोडतां चुकून स्वराज्यावरही तुझे घाव बस-

णार नाहींत कशावरून ? तुझी सात्विक वृत्ति नष्ट झाली असल्याचं तूंच कबूल करतेस. तिच्या अभावीं तुझी वृत्ति पवित्र आणि निश्चल कशी रहाणार–? मला तरी असं वाटतं, कीं तूं या नसत्या उपद्व्यापांत पडूं नकोस–भवितव्यतेनंच काय होतं तें होऊं दे.

**लक्ष्मीः**—महाराज, उघड्या डोळ्यांनीं प्राण गेलेला कुणाला तरी पहावला आहे काय ? हा रावबाजी स्वराज्य बुडविणार असं आपण नेहेमीं म्हणतां–हें या लक्ष्मीला आतां ऐकवत नाहीं. अहो, रावबाजी स्वराज्य बुडविणार म्हणजे कुणाचं ? हें स्वराज्य रावबाजीचं काय ? हें स्वराज्य कुणाचं ? हें मराठ्यांचं राज्य आहे–हें महाराष्ट्राचं राज्य आहे–हें शिवछत्रपतींनीं लावलेलं रोपडं खुडण्याचा–तोडण्याचा, या रावबाजीला काय अधिकार–? पुण्याच्या शनिवार वाड्यांत बसून आज ताई पेठीण तर उद्यां बया दातारीण यांच्याबरोबर शृंगारचेष्टा करायला का या रावबाजीला पेशवाईपद दिलं—? एकट्या रावबाजीला कांहीं स्वराज्य आंदण दिलेलं नाहीं. या स्वराज्याच्या पायीं मराठ्यांच्या रक्ताचा सडा पडला आहे–या स्वराज्याकरितां सारा सह्याद्री झुंजला आहे–या स्वराज्याकरितां मराठ्यांच्या वीरमातांनीं आपले वीरपुत्र बळी दिले आहेत–या स्वराज्याप्रीत्यर्थ अनंत वीरपत्नींचा कुंकुमतिलक पुसला जाऊन त्यांचा केशकलाप मोकळा झाला आहे ! महाराज, हें स्वराज्य-हें मराठ्यांचं स्वराज्य–रावबाजीमुळं जात आहे ना ? मराठ्यांचं स्वराज्य म्हणजे मराठ्यांचं स्वातंत्र्य. एकट्या रावबाजीचे चोज पुरविण्याकरितां महाराष्ट्राच्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला येणं बरं नाहीं. महाराष्ट्राला याची जाणीव नसली तरी आपल्यासारख्या सत्पुरुषांना हें पूर्ण माहीत आहे. नाहीं–ही लक्ष्मी मराठ्यांचं स्वराज्य--मराठ्यांचं स्वातंत्र्य--आपला जीवमान आहे तोंपर्यंत जाऊं देणार नाहीं. तेवढ्यासाठीं सारा मराठा हालवीन - ! आहा! महाराष्ट्रा, तूं आपलं स्वातंत्र्य गमावणार काय? रावबाजीकरितां तूं परतंत्र होणार -? महाराज, या लक्ष्मीला आपला आशीर्वाद द्या. स्वराज्याकरितां मी माझ्या जीवाचा घडा करीन पण स्वराज्य गेलेलं कधींही पहाणार नाहीं. ( जाते. )

**बापू गोखलेः**—( प्रवेश करून ) हो अगदीं खरं–! हा बापू जिवंत आहे तोंपर्यंत स्वराज्य केव्हांही जाणार नाहीं.

**ठाकुरदासबुवा**:—तथास्तु-तथास्तु-!

**लक्ष्मी**:—( पुन: प्रवेश करून ) म्हणजे ! बापूंच्या मरणोत्तर स्वराज्य नष्ट होणार ? महाराज, हा असा आशीर्वाद कां बरं-?( बापू गोखले वंदन करीत असतां त्यांच्या लक्षांत येऊं नये अशा तऱ्हेनें ठाकुरदासबुवा लक्ष्मीला जाण्याविषयीं संकेत करितात. ती जाते. )

**ठाकुरदासबुवा**:—उठा, बापू उठा- आज तुम्ही बरेच काळजींत दिसतां-?

**बापू**:—( उठून पण न बसतां ) महाराज, आपण सर्वज्ञ आहां- काय कारण तें का मीं सांगितलं पाहिजे. स्वराज्यासाठीं आत्मार्पण झालं तरी हरकत नाहीं-पण—

**ठाकुरदासबुवा**:—पण काय ? बापू पण काय- ?

**बापू**:—आत्मार्पण करून तरी कार्य झालं पाहिजे-कार्यावांचून जीवाची सांडवण करून काय करायचं ? गोविंदराव काळे- खरशेटजी मोदी- हे दोन हिरे फुकट फुकट गेले. महाराजांच्या कानीं हें आलं असेलच.

**ठाकुरदासबुवा**:—रावबाजीनं आपण होऊन सारी गुप्त मसलत आलपिन्स्टनला सांगितली-त्याचाच हा परिणाम.

**बापू**:—बाबासाहेबांच्या या असल्या स्वभावाला काळे आणि मोदी उगीचच्या उगीच बळी पडले. तरी पण काळे अगदीं अखेरपर्यंत कांहीं बोलत नव्हते. बाबासाहेब डोळयांत पाणी आणून अगदीं काकळुतीला आले तेव्हांच त्यांनीं आपली मसलत सांगितली आणि—

**ठाकुरदासबुवा**:—ती रावबाजीनं साहेबाला सांगितली- आपल्या हातानं आपल्या घराला अग्नि लावणारा असा मालक तुमच्या नशिबीं आला आहे-बापू, त्याला आतां तुम्ही काय करणार- ?

**बापू**:—( सुस्कारा टाकतात. )

**ठाकुरदासबुवा**:—पडक्या भिंतीला तुम्ही पाठ देऊन उभे आहांत. कदाचित् ही भिंत तुम्हांवरच ढांसळली तर- ?

**बापू**:—स्वामीकार्यार्थ देह केव्हां तरी पडणारच आहे—

**ठाकुरदासबुवा**:—पण तो कसा- ? गोविंदराव काळ्याप्रमाणं- ? स्वरा

ज्याची कांहीं एक कामगिरी न करतां ? मूर्ख मालकाच्या पोरकट चाळ्यावर का तुमच्यासारख्या शूरांचं जीवित अवलंबून राह्याचं ?

**बापूः**—स्वामी बरा कीं वाईट हें पहाणं–विचक्षणा करणं मला तर वाटतं अधोगतीला नेईल.

**ठाकुरदासबुवाः**—स्वराज्याला अधोगति मिळण्यापेक्षां तुम्हांला अधोगती मिळणं वाईट काय– ?

**बापूः**—स्वराज्याला अधोगती-- ? हा बापू जीवंत आहे तोंपर्यंत या स्वराज्याकडे वांकड्या नजरेनं पहाण्याची कुणाची छाती आहे-- ? हा पहा माझा छावा-- स्वराज्याच्या शत्रूचं ताजं ताजं रक्त प्राशन करायला अगदीं अधीर झाला आहे. महाराज, मला हा बाबासाहेबांचा दीर्घसूत्रीपणाच मुळीं मनास येत नाहीं.

**ठाकुरदासबुवाः**—बापू- बाबासाहेबाला तुम्ही समजतां तरी कोण ? अहो तें एक बाहुलं आहे.

**बापूः**—कांहीं असलं तरी ते आमचे प्रभू आहेत--

**ठाकुरदासबुवाः**—आणि हा तुमचा प्रभूच तुमच्या मसलती फोडतो आहे ना ? असला प्रभू--असला अवसान-घातकी प्रभू—

**बापूः**—बाबासाहेबांना दोष देऊन पातकाचा धनी हा बापू तरी होणार नाहीं !

**ठाकुरदासबुवाः**—आपल्या प्रभूला दोष द्या, असं नाहीं मीं म्हणत. तुमच्या उत्तमोत्तम मसलती त्याच्या तोंडांत रहात नाहींत, तेव्हां त्याला त्या तरी समजूं देऊं नका. आतां ह्या मसलती तरी किती दिवस चालणार ?

**बापूः**—गुरुमहाराज, नुसत्या मसलतीखालींच दिवसगत होत आहे. त्यामुळं शत्रूला आपली तयारी करायला आयती सवड मिळत आहे. आज नाहीं उद्यां आमची नी त्याची टिपरी ही झडणारच. मग ती आत्तांच झडलेली काय वाईट ?

**ठाकुरदासबुवाः**--स्वराज्याचा पाया वाकबगार मुत्सद्यांच्या मसलतींनींच भक्कम झालेला आहे.

**बापूः**—कोणत्याही सिंहासनाच्या पायांत रक्तमांसाचा मसालेदार चुनाच

घातलेला असतो. नुसत्या मुत्सद्यांच्या मसलतीनं काय होणार–? महाराज, स्वराज्याचा इतिहास तरी हेंच सांगतो. शिवछत्रपतींनीं स्वराज्याचं तोरण बांधलं तेव्हां त्यांनीं आधीं रणभूला मानवी रक्ताचाच अभिषेक केला. उगीच नाहीं स्वराज्याची कमाई झाली ! बरं, त्यांच्या पश्चात् तरी काय झालं ? स्वराज्य-रक्षण आणि वृद्धि करायला मानवी रक्ताचाच सडा घालावा लागला आहे. आणि या मानवी रक्ताचीच तहान लागलेली ही स्वराज्यदेवी, मानवी रक्त भरपूर मिळाल्याशिवाय, आतां सुस्थिर तरी कशी होणार ? या देवीची ही रक्ताची तहान कोरड्या मसलतींच्या अळणी पाण्यावर का भागणार आहे ?

**ठाकुरदासबुवा:**—बापू, तुम्ही मूर्तिमंत पराक्रम आहां. समरांगणावर तुम्ही घे घे म्हणून शत्रूवर हत्यार चालवूं लागतां त्या वेळीं खरोखरच युद्धदेवता विजयाची माळ तुमच्याच गळ्यांत टाकते. पराक्रमी पुरुषाला हेंच पारितोषिक योग्य. पण बापू, कालाकडेही थोडंसं पाहिलं पाहिजे. मला वाटतं सध्यांचा काळ केवळ पराक्रमाचा नाहीं. हातीं तागडी घेऊन आलेले हे टोपीवाले साऱ्या भरतखंडांत पसरले ते का केवळ पराक्रमाच्या जोरावर ?

**बापू:**—आम्हीं होऊन जर त्यांना आपल्या घरांत घेतलं–तर त्यांनीं तरी हात-पाय पसरायला कां कसूर करावं ? होळकराच्या भीतीनं पुणं सोडून बाबासाहेब पळाले ते वसईस टोपीवाल्यांच्या पाठीं पडले.

**ठाकुरदासबुवा:**—आणि या बाबासाहेबांच्या वडिलांनीं तरी काय केलं–? हे वसईस गेले तर ते मुंबईस गेले. एकंदरींत काय कीं, या टोपीवाल्यांना तुम्हीच तुमच्या घरांत घेतलंत ! बापू, थोडा विचार करा. घरांत घेण्याचा अधिकार म्हणा-अधिक प्रसंग म्हणा-गाजविला या दिवट्या पितापुत्रांनीं आणि आतां त्यांना घराबाहेर हांकलून द्यायला यांच्या आंगीं तर शक्ति राहिली नाहींच–पण यांच्या आश्रितांची सुद्धां एकवाक्यता नाहीं. ही वस्तुस्थिति तुम्हांला अनुभवाला येते ना–? अशी स्थिति टोपीवाल्यांमध्यें आहे काय ? थोडंसं कालाच्या गतीकडे पहा म्हणजे तुम्हांला तुमचं स्वराज्य नष्ट होणार हें सहज समजून येईल.

**बापू:**—हाय ! हाय ! महाराज ! स्वराज्य नष्ट होणार–स्वातंत्र्य नाहींसं होणार ! शिवछत्रपतींच्या पवित्र हस्तांनीं रुजलेला हा रोपडा अखेरीस पूर्ण वाढीला न येतां अकालींच वठणार ना–?

३

**ठाकुरदासबुवा**:—बापू, असे कष्टी होऊं नका. होणार तें होणारच. पण तें कां होणार, याचा विचार मनाला पटवून घ्या; म्हणजे कर्तव्यकर्म करतांनाही तुम्ही चालू काळाविषयीं बेसावध राहिलां असं होणार नाहीं. बापू, अनादि कालापासून चालत आलेली आपली संस्कृति आतां या पश्चिमेकडून आलेल्या नव्या संस्कृतीपुढं कांहीं काल तरी दिपून जाणार. एखादा टोपीवाला इकडे येतो आणि इकडील एखाद्या राजा-महाराजाची कामगिरी बजावून मागतो काय ? तर आपल्या लोकांसाठीं–आपल्या कुंपनीसाठीं–व्यापाराच्या सवलती. यांतलं इंगित तुमच्या लक्षांत कधीं तरी आलं काय बापू ?

**बापू**:—महाराज, ही सारी आमच्याच लोकांची घोडचूक आहे.

**ठाकुरदासबुवा**:—आतां मात्र अगदीं बरोबर बोललांत. टोपीवाल्यांनीं तुमच्यावर गोळ्या झाडायला इकडच्याच लोकांचीं पलटणं उभीं केलीं ना–? या इतक्या पलटणांना आपण आपल्या स्वराज्याची इमारत ढांसळतों आहोंत हें समजतं काय ? शिवाजीच्या वेळचे मावळे या पलटणवाल्यांपेक्षां शहाणे होते का ? मावळे लढले ते स्वराज्याकरितां आणि त्यांच्याच जातीगोताची ही टोपीवाल्यांची सेना स्वराज्य मोडण्याकरितां–स्वराज्यसूर्याला ग्रहण लावण्याकरितां–धडपडत आहे. यांत टोपीवाल्यांच्या संस्कृतीचा कांहीं विशेष आहे हें नाहीं का तुम्हांला दिसून येत ?

**बापू**:—आमचेच लोक आमच्या येथली खडान्‌खडा बातमी बेटावर पोंचवितात.–या फितुरीनं तर अगदीं भंडावून—( इतक्यांत पडद्यांत गलबला होतो. )

**गहेनाजी**:—( बाळाजीला धक्के देत पुढं आणतां आणतां ) हरामखोर–पाजी, घरबुडव्या, चल– चल– हो पुढं. लपून ऐकतोस ? टोपीवाल्यांकरितां आपल्या लोकांशीं बेमान होतोस ?-- अरे राक्षसा, टोपीवाल्यांकरितां इतका धडपडतोस तें कां– ? महाराज, हा पहा मात्रागमनी– बाहेरच्या बाजूस उभा राहून आपलं सारं बोलणं ऐकत होता. जणुं काय टोपीवाल्यांच्याच घराण्यांत जन्मास आलाय-- !

**बाळाजी**:—गहेनाजी, या बाळाजीच्या वंसाला धक्का लावणं म्हणजे कोणता अनर्थ ओढवून घेणं आहे,–हें तुझ्या लक्षांत आहे का ? एकदां ही बातमी बेटावर गेली, तर—



**ठाकरदासबुवा:**—बापू, सोडा याला. [ पृष्ठ ३५. ]

**बापू**:—( आवेशानें ) तर काय रे हरामखोरा, थांब, तुझी आधीं जीभच छाटतों. पाहतों तुझा बाप अलिफन्स्टन काय करतो तें. दुष्टा, केवळ स्वार्था-साठीं फितुर झालास ? कांहीं जातीची-- कांहीं जनाची-- कांहीं मनाची तरी-- ! अगदीं बेशरम झालास ? तुम्ही फितुर म्हणजे नांदत्या घराला लागलेल्या घुशी. छेः ! तुझी गय करून मुळीं उपयोग नाहीं. चल--घे--घे—देवाचं नांव.

( बापू बाळाजीची जीभ कापणार इतक्यांत )—

**बाळाजी**:—मरतों— मरतों-- गुरुमहाराज-- तुम्ही तरी वांचवा मला. बापू, मी तुम्हाला शरण आहें-- शरण आलेल्याला मरण कोणी तरी शूर पुरुष देईल का ?

**ठाकुरदासबुवा**:—बापू, सोडा याला. पेशवाई बाळाजीच्या फितुरीनं बुडाली असा साऱ्या महाराष्ट्राचा शाप याला अक्षय्य नरकांत कुजविणार आहे. तुमच्या हातानं मरून याला स्वर्गसुख कां देतां ? फितुर अधमांना शूरांच्या हातचं मरण केव्हांही उपयोगाचं नाहीं. तुरुंगांतल्या घोर भयंकर अंधारकोठ-ड्यांत जन्मभर खितपत पडून तेथल्या डांसा—चिलटांच्या संगतींत त्यांचं पातकी शरीर सडत सडत जाणं हेंच योग्य ! त्यांचा कपाळमोक्षच करायचा असेल तर तो मांगाच्या हातीं म्हणजे त्याला यमदरबारचीं नरकाचीं दारं आपोआप खुलीं होतील. हे फितुरी लोक, केवळ स्वार्थाकरितां स्वराज्यावर तिलांजली देतील—स्वबांधवांचे गळे चराचरां कांपतील--स्वातंत्र्याच्या सुखसाम्राज्यांतून स्वतःच्या ज्ञातिबांधवांना हुसकून देऊन त्यांच्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला ठोकतील. हे हरामखोर म्हणजे मानवी राक्षस—यांना साधंसीधं मरण उपयोगाचं नाहीं. बापू, जाऊं द्या त्याला. कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन, किडे पडून, सडून, कुजून मरण्या-करतां याला जीवंत राहूं द्या. चल बाळाजी,—चल, आधीं येथून चालता हो. ( तो जातो. ) हरहर ! अशा या फितुरीनं हें स्वराज्य घेरलं—पोंखरलं—! जगन्नियंत्या, तूंच, तूंच धांव आणि याचा संभाळ कर.

( पडदा )

## अंक दुसरा समाप्त.

# पेशवाई.

## अंक तिसरा.

### प्रवेश पहिला.

**स्थळः**—पुणें—पानशांचा वाडा. ( पडद्यांत त्रिसुपर्ण चाललें आहे, असा पडदा उघडतो. )

( पळीपंचपात्री घेऊन तुंदिलशास्त्री आणि बाळंभट सोंवळ्यानें प्रवेश करतात. )

**बाळंभट**—तुंदिलशास्त्री, बोलावूं का यजमानांना संकल्प सोडायला ?

**तुंदिलशास्त्रीः**—थांबा-इतक्यांत नको—

**बाळंभटः**—वाः ! शांतिः शांतिः सुद्धां झालं- पात्रंसुद्धां तुम्हीं प्रोक्षण केलींत- आतां तो खोळंबा कोणासाठीं—? कोणी यायचंय का अजून—? श्रीमंतांची स्वारी तर अगदीं तिष्ठत राहिली आहे. इतकीं दंपत्यं बसलीं आहेत-बिचाऱ्या बायकांच्या माना खालीं वांकवांकून अगदीं मोडून पडण्याच्या बेतांत आल्या आहेत. काय हो तुंदिलशास्त्री, हा दांपत्य-भोजनाचा थाट तर मोठा टोलेजंग झाला बुवा ! पण या प्रकाराला गणपतरावांनीं कसा रुकार दिला ?

**तुंदिलशास्त्रीः**—काय करतील संमति न देऊन ? पानशांचा सरंजाम जप्त करावा असं जेहत्ते बाबासाहेबांना वाटलं- तेव्हां त्यांना खूष करण्यासाठीं ही मेजवानी आहे. पण या मेजवानीला सर्व सरदार सहकुटुंब आले पाहिजेत—नवराबायकोंनीं एकाच पात्रांत भोजन केलं पाहिजे, अशी श्रीमंतांची इच्छा, म्हणून आजचा हा बेत झाला आहे. " राजा कालस्य कारणम्, " काय करायचं बाळंभटजी ?

**बाळंभट**:—काय करायचं—! एवढे तेजस्वी सरदार-पण सारे आले कीं नाहीं आपल्या कुटुंबांना घेऊन ? पानशांनाही कांहीं ( नाकाला बोट लावून ) नजराणा करावा लागेलच ! ?

**तुंदिलशास्त्री**:—त्यानिमित्त तर सरंजामावर संकट आलं आहे. पाहूं या काय होतंय तें. सध्यां सगळा ब्रम्हघोंटाळा माजला आहे. एवढं खरं ! तरी पण श्रीमंत आतांशा परम चिंतातुर आहेत.

**बाळंभट**:—तरी पण परस्त्री-हरणाची इच्छा कांहीं नष्ट होत नाहीं. पण काय हो तुंदिलशास्त्री श्रीमंत इतके चिंतातुर कां बरं ?

**तुंदिलशास्त्री**:—अहो, परवां जेहेत्ते श्रीमंतांना एक मोठं अनिष्ट स्वप्न पडलं ! रामेश्वराच्या देवळांत परवां जी एवढी मोठी उदकशांती झाली ती त्याच-साठीं- तुम्हांला तें स्वप्न समजलं असेलच ?

**बाळंभट**:—कांहींसं कळलं—बरोब्बर नाहीं कळलं- कोण सांगणार आम्हांला ? !

**तुंदिलशास्त्री**:—आणि खरं म्हणाल तर तें कुणाला सांगण्यासारखंही नाहीं. श्रीमंतांना असं वाटलं, कीं आपण निघालों आहोंत दसऱ्याच्या स्वारीला. हत्तीच्या अंबाऱ्यांत, मोठमोठे मानकरी, सर्वांत अघाडी जरीपटक्याचा हत्ती-तासे, वाजंत्री, नगारे, नौबदी, भालदार-पण कसे ? तर हातांत लोहदंड घेतलेले ! असा हा स्वारीचा थाट निघाला कोणत्या दिशेकडे ? तर दक्षिण दिशेकडे ! थेट ओंकारेश्वराचे देवालयांत स्वारी गेली. बाबासाहेब देवाला वंदन करतात तों पागोटें खालीं पडलं- ! गहेनाजी तें डोक्याला घालणार तों श्रीमंतांच्या डोईला कोणी शेण थापलं- ! त्याच्यावर श्रीमंतांनीं स्वतः शेला गुंडाळला. नंतर स्वारी पुढं चालली तों अपरंपार पाणीच पाणी-! पण कसं ? तर गढूळ ! त्यामध्यें सारा सरंजाम गटंगळ्या खाऊं लागला-! मेणे, पालख्या, घोडे हत्ती, माणसं वाहून गेलीं. जरीपटक्याचा हत्तीसुद्धां वाहून गेला.श्रीमंतांच्या दांड्याला पाणी लागलं-हत्ती ठेचाळला-महात उलथून पडला--अंबारीच्या दांड्याला पाणी लागलं--अंबारीच्या दांड्या मोडल्या,श्रीमंत पाण्यांत पडून धारेस लागले,तों एका दाढीवाल्या गोऱ्या बुवानं त्यांना कडेला आणलं. तिथं एक मोठा थोरला घाट, पाणी निवळ शंख आणि नदी कोणती

म्हणाल ? तर भागीरथी !–गर्द झाडी-स्नानसंध्या करीत बसलेले ब्राह्मण–पाणी भरणाऱ्या सुंदर सुंदर बायका–सर्वत्र वेदघोष–हें पाहून तेथल्या एका देवळांत श्रीमंत जप करीत बसले ! कां बाळंभटजी, हें स्वप्न काय बरं सूचित करतं ?

**बाळंभटः**—खरोखर स्वप्न मोठं अनिष्ट आहे-- ( इतक्यांत बाजीराव आणि बापू गोखले प्रवेश करतात-हें पाहून चपापतात. बाळंभट जातो. )

**बाजीरावः**—काय, आमच्या स्वप्नाच्या गोष्टी चालल्या आहेत वाटतं ? हो पण बापू, आणखी कोणी यावयाचं आहे ना तुमच्याकडलं ?

**बापूः**—आमच्याकडलं-? आणखी कोण हो तुंदिलशास्त्री ?

**तुंदिलशास्त्रीः**–कोण म्हणजे जेहेत्ते यमुना वहिनी हो. आज दांपत्य नव्हे का ?

**बापूः**—( हंसून ) शास्त्रीबुवा, ती तुमची वहिनी ही पहा बरोबरच आहे. ( शालजोडीच्या आंतून सोन्याच्या पट्यांतून तरवार काढितो. सर्व घाबरतात. )

**तुंदिलशास्त्रीः**—नाहीं. बापू- ! तो नियम तुम्हांकडे लागू नाहीं. चला आंत. गणपतराव पात्रं प्रोक्षण करून संकल्प सोडायला अगदीं खोळंबले आहेत. ( एको विष्णुर्महतभूतं हा मंत्र म्हणूं लागतो. )

**बापूः**—शास्त्रीबुवा–जा तुम्ही आंत—आणि गणपतरावांना म्हणावं पाणी सोडा आणि बसूं देत मंडळी भोजनाला. आम्ही उभयतां अंमळ पाठीमागून येतों. ( शास्त्री जातो. ) सरकार, माझं वर्तन विलक्षण वाटत असेल नाहीं— ? कदाचित मजवर खप्पा मर्जीही झाली असेल— ! पण महाराज, ही असली घरबुडवी मसलत आपणास देतो तरी कोण–आणि आपण या मसलतीला बळी तरी पडतां कसे- ? पानशांनीं आपणाला मेजवानीला बोलावलं नी आपण सगळे सरदार सहकुटुंब एका पंक्तीस भोजनाला बसलेले पाहण्याचा हट्ट धरला–ही अशी कुबुद्धि आपणांला कां होते–- ?

**बाजीरावः**— कुबुद्धि ? बापू,- कुबुद्धि, कोणाला-? आणि तुम्ही हा दोष कोणाला देतां-? शुद्धीवर आहांत ना-?

**बापूः**—स्वराज्याचं तारुं सांप्रत इतक्या तुफान दर्यांत हेलकावे खात आहे कीं हा बापू गैरसावध राहून चालणारच नाहीं. महाराज, आपण आमचे प्रभू, या पेशवाईच्या सेवेंत- हिच्याच अन्नावर, हें शरीर वाढलं. माझे पूर्वज हिच्याच सेवेंत

खपले-मीहि याच पायाकरितां झटत आहें आणि झटेन; कर्तव्याची जाणीव या बापूला तरी द्यायला नको. ज्या सरदारांच्या तेजस्वीपणानं स्वराज्य राखलं-त्यांच्या बायकांची अब्रू चव्हाट्यावर आणून आपण काय साधूं पाहतां-? तेजोभंग झालेले सरदार, स्वराज्याच्या सांप्रतच्या पडत्या काळांत आपल्या उपयोगी कसे पडतील-? स्वराज्याला बळकटी आणण्याकरितां ज्यांनीं आपले थोर पुरुष बळी दिले, त्यांचे सरंजाम जप्त करण्याचा आपला सपाटा चालला आहे-महाराज, हें आपलं कृत्य स्वराज्यमंदिराचे चौकोनी चिरे सुरुंग लावून पाडण्यासारखं नाहीं काय ?

**बाजीराव**:—बापू- सरदार बेदिल झाले तर- ?

**बापू**:—सरदारांच्या बायका मागितल्या तरी त्यांनीं बेदील होऊं नये काय-? सध्यां स्वराज्याची स्थिति काय आहे ? स्वराज्याला त्रिदोष झाला आहे-फितुरीचा भोंगा स्वराज्यमंदिराला लागून तें अगदीं भेंडासारखं झालं आहे. टोपीवाला तर हें स्वराज्य तोंडांत टाकायला अगदीं आ करून बसला आहे. केव्हां गोळी झडेल व केव्हां त्याचीं नि आमचीं तुरुपं समोरासमोर येतील याचा नेम नाहीं. शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड, मोहिते, वगैरे मराठामंडळ-ज्यांनीं या स्वराज्याची इमारत बांधतांना कसदार मालमसाला मुबलक पुरविला- ते समरभूमीचे निधडे रणनोवरे-ते सिंव्हाचे छावे- ते काळाचेही काळ- आतां कुठं आहेत-? वेटावर- पुण्याच्या छातीवर-टोपीवाला,-आणि आपण कोणत्या फिकिरींत तर सरदारांच्या बायका कशा भ्रष्ट होतील ? महाराज, याशिवाय आपणांला दुसऱ्या कांहीं मसलती नाहींतच काय ? !

**बाजीराव**:—बापू. माझ्या हेतूचा विपर्यास होतो-सर्वांचा दिल खुला व्हावा-दिलसफाई व्हावी-म्हणून हा माझा प्रयत्न आहे.

**बापू**:—महाराज, हा आपला दास आहे. याला जास्त बोलायचं माहित नाहीं. माझ्या जिभेपेक्षां माझ्या तरवारीवरच माझा भरंवसा जास्त.—तरी पण मला बोलल्यावांचून राहवत नाहीं. महाराज, पानशांचा सरंजाम जप्त करायचा मनसुबा आपण कां बरं केला-? गणपतरावांचा काय बरं अपराध पाहिला-? त्यांच्या तोफखान्याच्या जोरावर हैदर, टिपू हादरले हाच का त्यांचा अपराध-? इतर कांहीं हरामखोरांच्या बायकांप्रमाणं गणपतरावांची बायको वाड्यांत आली नाहीं-याबद्दलच ना त्याला हें प्रायश्चित्त-?

**बाजीराव**:—बापू हा कांहीं तरी तुमचा गैरसमज झाला आहे. मी सर्व कांहीं सद्धेतूनं करतों-पण त्याचा असा विपर्यास होतो. काय करावं-माझीच साडेसाती झालं.

**बापू**:—आपल्या प्रभूबद्दल या बापूचा गैरसमज केंव्हांही होणार नाहीं. स्वराज्यावर इतकीं संकटं सध्यां कोसळलीं आहेत कीं या वेळीं उघड्या डोळ्यांनीं शुद्ध अंतःकरणानं—आणि पूर्ण विचारानं वागल्याशिवाय या बापूला गत्यंतरच नाहीं. सरस्वति वैनी वाड्यांत आल्या नाहींत म्हणून सरंजाम जप्त करणार होता आपण-पण सरकार, हा सरंजाम पानशांना कसा मिळाला हें आहे का माहित आपणाला-? हा पहा त्या पराक्रमाचा अवशेष! ( पडदा वर होतो आणि एकाखालीं एक अशा अनेक विधवा उभ्या असल्याचा देखावा दिसतो. )

**बाजीराव**:—बापू, काय बरं हें ?

**बापू**:—सरकार, हीं सुंदर सुंदर रत्नं आपल्यासाठीं, या स्वराज्याकरितां-वैधव्यपंकांत आजन्म खचून गेलीं आहेत. पानशांच्या घराण्यांतले जे थोर पुरुष स्वराज्याकरितां धारातीर्थीं पडले-त्यांचं हें जीवंत स्मारक. हें पाहूनही पानशांचा सरंजाम जप्त करण्याचा सरकारचा हेतु कायम आहे काय ? स्वराज्याकरितां आपल्या पतींना स्वार्थत्यागपूर्वक बळी दिलेल्या देवतांनों, हा या बापूचा साष्टांग प्रणिपात स्वीकारा. तुमचं प्रत्यक्ष दर्शन झालं असतांही तुमच्या तोंडचा घांस काढून घेण्याची दुष्ट बुद्धि राहील, असा कोणीही पुरुष स्वराज्याच्या पेशवाईला विटाळणार नाहीं. महाराज, या आमच्या देवता, या आमच्या पूज्य वस्तू-या आमचा पंचप्राण ! ! आमचा ठेवा याच-आमच्या तेजाच्या खाणी ह्याच-यांच्याकडे अनुदारपणानं कोणी पाहील तर तें आम्हांला कदापीही खपणार नाहीं. महाराज, घ्या-घ्या-या देवतांचं दर्शन घ्या आणि त्याचा मोबदला म्हणून यांचा सरंजाम जप्त करा ! आपण प्रभु आहांत-वाटेल तें करा. आपला हात कोण धरणार-?

**बाजीराव**:—बापू, या देवतांना नमन करून मी यांची माफी मागतों. यांचा सरंजाम मी केंव्हांही जप्त करणार नाहीं. (पडद्यांत हर हर महादेव होतो.)

**बापू**:—चला सरकार, जेवावयाला चला ( जातात. )

———

## प्रवेश दुसरा.

स्थळः—पुणें कुंभारवेस, बेटाकडला रस्ता.

( विठ्ठलपंत विंचूरकर आणि गहेनाजी प्रवेश करतात. )

**विंचूरकरः**—( बरोबरच्या शिपायांस ) समजलांत तुम्ही ? ज्यांना वेताळ पेठेकडची कामगिरी आहे–त्यांनीं तिकडे जावें. रामजी, तुम्ही कोतवालीवर जाऊन सर्व चौक्यांवर सारखी पैरवी ठेवायला कोतवालाला सांगा. भगवानसिंग, तुम् लकडी पुलका नाकेपर ठेरो. जा, तुम्ही सारे आपआपल्या जागीं हुषारीनं असा. (ते जातात) गहेनाजी, आपण खुद्द इथंच या इमामभाईच्या डोल्यापाशीं बेटाकडला रस्ता रोखून राहूं या. ( हळू ) पोटसाहेबाचा जमादार आपणांला इथंच भेटतो म्हणालाहे नाहीं ? ( विचार ) मोठा कठीण प्रसंग आला आहे. कुठला वसईचा तह झाला आणि कुठं ही फिरंग्यांची छावणी बेटावर आली, असं झालंय बुवा. एकाएकीं टोपीवाल्यांनीं चौर्गार्द ठाणीं बसविलीं ! सर्व वाटा बंद.–वेढा–पुण्यास वेढा बसला ! अरे आहे काय हें ? पुणं म्हणजे काय कोंबडं कीं बदक ? इतकं कस्पटापेक्षांही कस्पट होऊन राहण्याची पाळी यावी ना ? सकाळींच आमचा नाईक रंभाजी आला आणि सांगूं लागला कीं, टोपीवाल्यांचीं तुरुपं चतरसिंगीच्याही बाजूला उतरलीं.गांवांत तर काय कंड्यावर कंड्या उठत आहेत. कोणी म्हणतात मुंबईहून ५०,००० गोरी फौज पुण्यावर चाल करून येत आहे. बाबासाहेब तरी या साहेबाचा इतका मुलाजा कां राखतात समजत नाहीं.

**गहेनाजीः**—श्रीमंतांच्या ठिकाणीं थोडी तरी माणुसकी असती तर हा प्रसंग खचित येता ना ? अहो, त्यांच्या ठायीं घटकेंत सतरा बेत. इंग्रज म्हणे त्रिंबकजी आणि त्याचा साथी नाना काळू यांना धरून द्या म्हणतो.

**विंचूरकरः**—तें कां बुवा- ?

**गहेनाजीः**—पण हे म्हणणार कोण ? बाबासाहेबांनीं तर उभयतांना धरून देणारास दोन लाखांचं बक्षीस जाहीर केलं असून शिवाय जानतलक एक हजार रुपयांचा एक गांवही जहागीर देऊं म्हटलं आहे. कांहीं तरी समेट करावा म्हणून माणकेश्वर बेटावर सारखे हेलपाटे घालीत आहेत.

**विंचूरकर**:—या प्रसंगीं नाना पाहिजे होते. ज्या राज्याकडे कोणाची पाहण्याची प्राज्ञा नव्हती, त्यावर असा हा विलक्षण प्रसंग यावा काय ? साहेबाच्या ओंजळीनं पाणी प्यावयाचं ! नशीब—नशीब—!

**गहेनाजी**:—एक मालक बरोबर नाहीं त्याचा हा परिणाम—! पण आलाच हा शेख हुसेन—!

**शेख हुसेन**:—( प्रवेश करून लष्करी सलाम करितो. ) माफ करो, माफ करो—तखलीफ बहोत हुवा क्या—

**विंचूरकर**:—छेः—छेः—बिलकूल नाहीं. आम्हीही आतांच आलों.

**गहेनाजी**:—मुंबईहून ५०,००० फौज येते म्हणतात तें काय ?

**शेख हुसेन**:—ओ तो खाली आवाई है—भाई, तुम् मत डरो. हमारा छे नंबर का पलटण है पहिली फैर हम् लोक तुमारा शिरके उपर करता है. और तुमारा थोडा जोर होता है तो हम् तुमारे बाजूकू आता है—

**गहेनाजी**:—तुमारा जर्नेल—?

**शेख हुसेन**:—कोन—पोट्साब—! ए भाई तुम क्या दिवाना है—? ओ साबलोक कबीभी फितुर नही होगा. तुम उसके उपर कबीभी बिश्वास मत करो—और बातभी मत करो. उसके पलटणमे फितुरीका तुमारा इरादा है—वैसा उसकू इतनाभी तल्लास नहि लगना देखो—नही तो हम् जबाबदार नही.

**विंचूरकर**:—नाहीं, ती खबरदारी आम्ही घेऊं—पण तुमच्या सुभेदार मेजरची समजावणी झाली ना—?

**शेख हुसेन**:—दस हजार रुपया होना—!उसका एकच बात. ओ तो आजकल सब पलटणका राजा है. ओ कबीभी दो बात नही करता है. दस हजार रुपया, इनका एकच बोली.

**विंचूरकर**:—लागले.-आमचेकडे लागले. मात्र त्यांपैकीं पांच हजार आगाऊ आणि बाकीचे पहिल्या लढाईनंतर—ही अट आहे ना कबूल ?

**शेख हुसेन**:— बेशक—पहिला जंग खलास होनादेव और पिछेसे पांच हजार रुपया देव. चलो ठराव हुवा ना—मेरेकू जाने देव—लाईटऔटका बिगुल होनेका वख्त आया—जाता है हम्—! ( जातो. )

**विंचूरकरः**—गहेनाजी ऐकलंत ना तो काय म्हणाला तें–? इंग्रज केव्हांही फितूर होणार नाहीं ? आणि आह्मी–? फितुरी तर आमच्या पांचवीला पुजलेली. उगीच का या मूठभर टोपीनं आम्हांला टोपी घातली आहे? जातों मी आतां–तुम्ही या बाजूच्या चौक्या पाहून या आप्पा बळवंताच्या गेटावर. मी श्रीमंतांच्या कानावर ही गोष्ट घालून तेथेंच तुमची वाट पहात राहतों. ( जातो. )

**गहेनाजीः**—( स्वगत ) इंग्रज केव्हांही फितूर होणार नाहीं. अक्षरशः खरं आहे. कुठले सातासमुद्राच्या पलीकडले येतात व्यापाराकरितां आणि डाव टाकतात कोणता तर राजे होण्याचा ! पलटणी उभ्या करतात आमच्याच लोकांच्या–आमच्याच लोकांच्या दुहीचा फायदा घेतात आणि आमच्याच गृहकलहाच्या धांदलींत आमच्या डोईवर चढूं लागले आहेत, नव्हे बरेच चढलेही आहेत. नानां-च्या वेळीं मालेटसाहेब पुण्यास आला तो कसा आणि आज हा आल्फिन्स्टन इथं कारभार करतोय कसा–! हा सगळा काळाचा प्रताप, हें केव्हांही खरं असलं तरी पण आमच्यांतले सद्गुण नष्ट झाल्याचा हा परिणाम, असा शेरा इतिहास केव्हां-ही मारल्याशिवाय राहणार नाहीं. ( पाहून ) हे कोण–! बुरखेवाले दिसतात. हा तर रस्ता बेटाकडचा. तेव्हां पुण्यांतली बातमी काढून हे थोर पुरुष आतां बेटाकडे चाललेत वाटतं. खरोखरच थोर हे ! केवळ वीतभर खळगीसाठीं—किंवा नीच प्रतीचा सूड उगविण्याकरितां आपल्याच लोकांच्या छातीवर निखारे ठेवणारे हे लोक थोर नव्हेत तर कोण ? या दुर्जनांना इहलोकीं तरी योग्य शिक्षा दिसत नाहीं. ( पाहून )–अरे हे तर इकडेच आले. जरा एके बाजूस होऊन हे कोण आहेत, हें पाहूं या तरी ! ( एके बाजूस होतो. बाळाजी आणि चांगुणा बुरखे घेऊन प्रवेश करितात. )

**बाळाजीः**—माहीत नाहीं ? ही गोष्ट तुला माहीत नाहीं ? तूं अशी गैरसावध राहशील तर मग वाड्यांतली खडान्खडा बातमी आम्हांला कशी मिळेल ? तुमच्या आमच्या धीरावर तर टोपीवाल्यानं बळ बांधलं आहे.

**चांगुणाः**—तें खरं. पण आज किनी मस्नी वाड्यामदीं जायाला सव-डच गवसली नाहीं. आज तर बाईसाबांचा नवस फेडायचा होता.

**बाळाजीः**—तरच आज नवा चौघडा वाजत होता बरं का ! बरं तर चंची तरी काढ–थोडी तंबाखू खाऊं या.

**चांगुणा**:—तुमचीच चंची द्या इकडे-मीच करत्यें पट्टी.

**बाळाजी**:—मग काय-या गरीबावर मोठीच कृपा म्हणायची.

**चांगुणा**:—आपली पाहिजे. या पायाच्या पुण्याईनं हे दीस पाह्यले. पैशाची चटक खरंच मोठी द्वाड बगा. साबबी सढळ हाताचा, या पैशापायीं काय काय बातम्या कशा कशा काडल्या, ह्यं योक त्या भगवानासच माहीत !

**बाळाजी**:—तुला नुसता पैशाचा लोभ, पण मला पैशाचा तर आहेच-तसाच सूडाचाही आहे. या रावबाजीच्या हातीं नारळाची आई देईन-याला पुण्यांतून हुसकून देईन-तेव्हांच मला चैन पडेल-एवढ्याकरितां केवढं साहस करतों पण ? पहा कीं या दोन दिवसांतलाच खटाटोप. केवढा व्यूह उभारलाहे पण ! अग गांवांत बातम्यांवर बातम्या उठल्या आहेत त्या का खऱ्या ? अग इतकं सैन्य साऱ्या हिंदुस्थानांत तरी टोपीवाल्यांचं असेल कीं नसेल, याची शंकाच आहे. पण हे तर घाबरले कीं नाहीं ?

**चांगुणा**:—मग चतरशिंगीवर फौजा आल्याती त्या-?

**बाळाजी**:—अग सगळं खोटं. पण या बातम्यांनीं बाजीराव पण कसा टरारला आहे. अग या सर्वांच्या नाकांवर मिऱ्यें वांटीन आणि चांगुणाबाई, तुम्हांला छानदार बगीचा आणि सुंदर वाडा देऊन तिथं जणुं माझी पट्टराणी करुन ठेवनि.

**चांगुणा**:—खरंच का तस चांगल दीस येतील-?

**बाळाजी**:—अग, हा बाळाजी ते दिवस खात्रीनं तुला दाखवील. आजची बातमी तर अशी महत्वाची आहे कीं ती साहेबाला कळल्याबरोबर या बाळाजी-वर पैशाचा केवळ वर्षाव होईल.

**चांगुणा**:—मंग मला न्हाय का सांगायची ती बातमी—

**बाळाजी**:—नको-इथं नको—

**चांगुणा**:—बरं-नग तर नग-पट्टी तर घ्यावी बटकुराची.

**बाळाजी**:—( पट्टी घेऊन ) पण यावर एक गोडसा पाहिजे आहे.

**चांगुणा**:—बातमी मातुर सांगाया नग-गोडसा हवा न्हाई.

**बाळाजी**:—अग वेडे, तुला ती बंगल्यावर समजेलच.

**चांगुणाः**—मंग हथ सांगाया काय होत बरं—

**बाळाजीः**—फारच बुवा हट्टी–! अग त्रिंबकजी पुण्यांत आला आहे. गुप्त खलबतं चाललीं आहेत. चल चल लवकर, आधीं ही बातमी बेटावर कळवूं या, चल. ( जाऊं लागतात. )

**गहेनाजीः**—( प्रवेश करून आवेशानें ) हरामखोरा, थांब-आज भरलीं तुझीं शंभर वर्षं ( चांगुणा ओरडते. ) ए बेमान लंडी–कां उगीच बोंबलतेस ? रांडे, बाईसाहेबांची मोठी विश्वासांतली नव्ह का तूं–? तुझ्या झिंज्याला धरून तुला फरा फरा ओढीत नेतों वाड्यांत आणि बाईसाहेबांदेखत तुझ्या तोंडांत शेण कोंबतों. ( चांगुणा रडूं लागते. )

**बाळाजीः**—अग, रडतेस कां ? ( आपली तलवार उसपून ) ही पहा–ही जोंवर माझ्या हातांत आहे–तोंवर मी याला दाद देत नाहीं. ( हळूच ) तूं बेटाकडे पळूं लाग. टोपीवाल्यांचा नाका कांहीं इथनं फार दूर नाहीं.

( गहेनाजी बाळाजीला वार करून खालीं पाडतो आणि चांगुणा ओरडते तिच्या तोंडाला बोळा घालून तोंड बांधतो. )

**गहेनाजीः**—( बाळाजीच्या छातीवर पाय देऊन ) बोल रे दुष्टा, अधमा, या नीच कृतीनं तूं कोणत्या स्वर्गाची तयारी करून ठेवली आहेस ? अरे, हा राजद्रोह–तुला खरोखर अक्षय्य नरकांत बुडवील.

**बाळाजीः**—गहेनाजी, स्वर्गानरकाची मी मुळींच फिकीर करीत नाहीं. बाबासाहेबानं माझ्या जीवश्च कंठश्च स्नेह्याच्या साध्वी स्त्रीला भ्रष्ट केलं, तेव्हांपासून माझं मन या स्वराज्याविषयीं पार विटलं आहे—

**गहेनाजीः**—बाबासाहेबाकरितां तूं स्वराज्याचं नुकसान करतोस ? खरोखर तुझीं मुलंबाळंसुद्धां तुझ्या या आत्मघातकीपणाबद्दल तुला शिव्याशाप देतील.

**बाळाजीः**—त्याची मी मुळींच पर्वा करीत नाहीं.

**गहेनाजीः**—अरे, पण तुझ्या या कृतीनं साऱ्या मराठ्यांचं कायमचं नुकसान होत आहे !

**बाळाजीः**—ही तुझी चूक आहे. स्वराज्यांतल्यापेक्षां इंग्रजींतच आम्हांला खरं सुख मिळेल. इंग्रजांसारखे न्यायी मला तरी कोणी दिसत नाहींत. खरं सांगूं

का ? आम्ही स्वराज्याला खरोखर नालायक आहोंत. बेटावरला कारभार पहा— तुमच्या इथला पहा—जमीनअस्मानाचं अंतर ! हें तुमचं स्वराज्य जाऊन त्या ठिकाणीं इंग्रजी येणारच. ती यावी म्हणूनच मी झटणार, त्याशिवाय आम्हांला मनुष्यपण म्हणजे काय हें कळणार नाहीं.

**गहेनाजीः**—बाळाजी, मरणाच्या दारीं बसला आहेस तरी तुझी वल्गना कांहीं बंद होत नाहीं ना ?

**बाळाजीः**—गहेनाजी, माझ्या जीवाला धक्का लावण्याची गोष्ट सोडून दे. माझा कैवार घेणारा इतका प्रबल आहे कीं, तो तुमच्या सर्वांच्या बायका एका क्षणार्धांत रंडक्या करील—

**गहेनाजीः**—अरे हरामखोरा–( त्याला मारूं पाहतो तों मोकळी झालेली चांगुणा आरडाओरडा करते. त्यामुळें कांहीं गोरे पळत येतात. गहेनाजी निघून जातो. )

**१ गोराः**—कोन्, पंडत ? क्या हुवा ?

**बाळाजीः**—मला बंगल्यावर घेऊन चला म्हणजे सगळं कांहीं सांगतों.

( नेतात. पडदा. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळः**—पुणें–पर्वतीखालील हिराबागेकडचा भाग. एक दवंडीवाला पुढील दवंडी पिटीत येतो.

" ऐका हो ऐका ! जो कोनी तिरींबकजी डेंगळे आन् त्येंचा साथीदार नाना काळू, येस्नीं धरून देईल त्येला दोन लाख रुपये विणाम मिळेल. आन जानतलक एक हजाराचा एक गांव जहागीर बी देन्यांत येईल, असा पेशवेसरकारचा हुकूम हाय हो ! " ( ही दवंडी दवंडीवाला माणूस पाहून " धरून देईल " आणि

"धरून न येईल" अशी पिटीत असतो ). ( एके बाजूनें जोगीण लक्ष्मी आणि दुसरे बाजूनें गवळ्याचे वेषांत त्रिंबकजी येतात. )

**लक्ष्मीः**—काय म्हणतोस दोन लाख रुपये बक्षीस ? !

**त्रिंबकजीः**—कोणाला ? धरून देईल त्याला कीं न देईल त्याला !

**दवंडीवालाः**--दुघास्नी बी-!

**लक्ष्मीः**—म्हणजे-!

**दवंडीवालाः**—तसंच हाय त्येंन् ! डेंगळ्यांनीं काय चोरीबिरी क्येली हाय व्हयू ! आमच्याच राज्यांत आमचंच सरकार त्येली पकडन्यापाई दोन लाख रुपयांचं विणाम जाहीर करतात-दीसच फिरलं तिथं काय करायचं-? ( त्रिंबकजी सुस्कारा टाकतो. ) कां बाबा, तुला कशांपाय वंगाळ वाटतंया-! का कोनी फितुर हायस-? या फितुरीनं तर आतांशा भंडावून सोडलंय! हीं झाडं बी फितुर हायत किं काय असं वाटूं लागलंय-सम्दी बातमी बगा बेटावर-! आन् कोन देतं,नी काय होतं काय बी उमगत न्हाय बगा. या पेशवेसरकारच्या नौकरींत ह्ये पांढरे झाले. अत्रो, हा पठ्या पानपतास भाऊगर्दीच्या बखतास व्हता-राक्षसभुवनच्या मैदानांत बी व्हता-मानिक तलावाच्या उट्टावांत हैदरचा बुरखा व्हडला याच पठ्यानं-आन् परवांच्या खरड्याच्या झुंजांत बी मीच वाटेल तसा नाचलों ! पुन् काय भगवान कोपला बगा राव, नाना ग्येल नी हा टोपीवाला बळावला-येतुं बाबा-येतुं बाई, दीसच आस त्येला काय करायचं-! ( दवंडी पिटून जातो. )

**लक्ष्मीः**—ऐकलीत ही दवंडी-! आई जेवायला घालीना आणि बाप भिक्षा मागूं देईना, असंच नव्हे का ?

**त्रिंबकजीः**—काय करावं त्या त्रिंबकजीनं ! बाबासाहेबांकारितां तो इतका झटला-आणि झटतोही आहे. त्याचं हेंच बक्षीस काय ?

**लक्ष्मीः**—स्वामीनिष्ठ माणसं बक्षिसाची इच्छाच करीत नाहींत.

**त्रिंबकजीः**—हो-तेंहि खरंच—!

**लक्ष्मीः**—त्रिंबकजी डेंगळे हा कांहीं सामान्य पुरुष नव्हे-तो का केवळ बाबासाहेबांकडून बक्षीस मिळेल म्हणून झटत असेल ! सध्यांची झटापट पेशवाई आणि टोपीवाले यांच्यामध्यें नसून सद्गुण आणि दुर्गुण यांच्यामध्यें आहे. टोपी-

वाले परकी असले तरी त्यांच्या वांट्यास सद्‌गुणाचा भाग जास्त आहे. आमच्याकडे पहावं तर खुद्द गादीचा मालकच दुर्गुणांची खाण-खरं ना पण हें त्रिंबकजी—?

**त्रिंबकजी**:—( दचकतो ) त्रिंबकजी ? त्रिंबकजी कोण ? कुठं आहे त्रिंबकजी—?

**लक्ष्मी**:—घाबरूं नका-त्रिंबकजी, घाबरूं नका-तुम्ही त्रिंबकजी आहांत. पेशवाईचे एकनिष्ठ सेवक आहांत. टोपीवाल्यांचे हाडवैरी आहांत-पण बाबासाहेबांच्या बेधरी स्वभावाला बळी पडलेले एक बिनमोल रत्न आहांत-घाबरूं नका-! ही लक्ष्मी तुम्हांला केव्हांही दगा देणार नाहीं.

**त्रिंबकजी**:—पण तुह्मी मलाच त्रिंबकजी समजतां कीं काय-? अहो, मी तर एक गरीब गवळी-बाजाराकारितां पुण्याला आलों.—

**लक्ष्मी**:—पुरें-उगीच हा मानभावीपणा नको-या लक्ष्मीच्या भेदक दृष्टीला फसवूं नका. तुह्मी त्रिंबकजी आहांत-स्वराज्यासाठीं तळमळणारे-स्वराज्याकारितां स्वतःच्या देहाची तमा न धरणारे-निधड्या छातीचे त्रिंबकजी तुह्मीच. मी तुह्मांला पुरतं ओळखलं आहे-उगीच आड वाटेला कां पळतां-? बोला त्रिंबकजी, गंगाधरशास्त्र्याची, तुह्मीं ठार केलेल्या गायकवाडाच्या ब्राम्हण वकिलाची—पंढरपूर क्षेत्राच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर उद्धवाच्या पुढं तुकडे तुकडे केलेल्या त्या बिचाऱ्या गंगाधरशास्त्र्याची मुलगी ही लक्ष्मी-त्रिंबकजी, तुह्मी ओळखतां काय ?

**त्रिंबकजी**:—( घाबरून ) कोण-ती-लक्ष्मी ! ती तूंच काय ?

**लक्ष्मी**:—होय-! जिच्या या दुष्ट स्वरूपाकारितां गंगाधरशास्त्री-प्रत्यक्ष माझा पिता-बळी पडला-ती ही स्वरूपसुंदर विवशी ही लक्ष्मी ! त्रिंबकजी, ही आतां तुमच्यापुढं उभी आहे.

**त्रिंबकजी**:—कशासाठीं-? सूड घेण्याकारितां काय ?

**लक्ष्मी**:—सूड ! ? कोणाचा सूड घेऊं ? ! त्रिंबकजी, तुमच्या तलवारीनं माझा देवतुल्य पिता कापला गेला, ह्मणून तुमचा सूड घेऊं, कीं—

**त्रिंबकजी**:—बाबासाहेबांचा—?

**लक्ष्मी:**—ज्याच्या सांगीनं तुह्मी तें अघोर कृत्य केलंत त्या दिवव्या बाबासाहेबाचा सूड—

**त्रिंबकजी**:—लक्ष्मी-नको-नको-सूड घ्यावयाचाच तर माझा घे-माझा! बाबासाहेबांचा घेऊं नको. बाबासाहेबांना एवढी तखलीफ पडली-एवढं जर दुःख झालं-तर लक्ष्मी, या त्रिंबकजीचं काळीज तुटल्यासारखं होतं. लक्ष्मी, तुझा सर्वस्वी अपराधी मी आहें. बाबासाहेबांनीं सांगितलं म्हणून मीं तें भयंकर कृत्य केलं हें जरी खरं असलं, तरी पण मी " नाहीं करीत " असा हट्ट धरला असता तर-? तर काय ? लक्ष्मी, माझ्या बाबासाहेबाचं मन मोडल्याचं दुःख मला अनुभवावं लागतं-! ह्मणूनच ह्मणतों लक्ष्मी, तुला सूडच घ्यावयाचा असेल, तर माझा घे ! हां- ही घे तलवार आणि तुझ्या दृष्टीनं अधमाधम अशा या अपराध्याचे कर एक घाव नी दोन तुकडे.

**लक्ष्मी:**—( हंसून ) त्रिंबकजी, करा, आपली तलवार म्यान करा. तुमच्या पाठोपाठ आज इतके दिवस पायपीट करणारी ही लक्ष्मी, क्षुद्र सूडाच्या राक्षसी विकारानं भारावलेली नाहीं. उच्च धोरणामागं लागलेल्या स्त्रियांच्या अंतःकरणांत क्षुद्र स्वार्थी विकाराला थाराच मिळत नाहीं.

**त्रिंबकजी**:—मग लक्ष्मी, हे भूदेवी, तुझा या पामराला काय आदेश आहे ? तुझ्यासाठीं कोणतं दिव्य करूं ? बोल.

**लक्ष्मी:**—माझ्याकरतां कांहींएक करूं नका. त्रिंबकजी, त्याचप्रमाणं बाबासाहेबांकरितांही कांहीं करूं नका ! कांहीं करावयाचं असेल तर स्वराज्याकरितां करा. तुम्ही स्वराज्याकरितां अटोकाट मेहनत करा-छातीचा कोट करा- ही स्वराज्यगंगा कोणत्या ना कोणत्या दुष्कृत्यानं गुप्त होण्याचीं लक्षणं दिसूं लागलीं आहेत-कांहीं करा आणि तिचा प्रवाह नष्ट न होईल असा भीष्मप्रयत्न करा. तुमच्या मुलांबाळांना पारतंत्र्यांत ढकलूं नका-जा-जा-तें पहा कोणी तरी तिकडून येतं आहे-असे जा-मात्र जें करायचं तें स्वराज्याकरितां करा ! जा-जा-
( दोघेही जातात. )

---

# प्रवेश चवथा.

**स्थळः**—( पुणें हिराबाग ) अन्याबा रहातेकर प्रवेश करतो.

**अन्याबाः**—( स्वगत ) वैनीसाहेबांनीं आणि मला बोलावलं ? आणि कुठं तर या शृंगारपूर्ण हिराबागेंत ! काय या अन्याबाच्या भाग्याची चढती ओह समजत नाहीं. बाबासाहेबांच्या नांवावर कनक आणि कांता यांची मनसुराद चंगळ चालली आहे. केवळ इच्छाभोजन–! मला वाटतं आमच्या या सर्व सुखाच्या मंदिरावर आज वैनीसाहेब आपणहून कळस चढविणार ! ! असं व्हावं ही केव्हांपासून इच्छा होती–पण काय म्हणतात ना ? साखरेचा खाणार त्याला देव देणार ! आलंच कीं नाहीं आज आपणहून निमंत्रण–! ( वाराणसीबाई प्रवेश करितात. ) आहा–! आलीच ही सौंदर्याची पुतळी; अन्याबा धीर धर–उगीच घाई करून आलेली संधी दवडूं नकोस—!

**वाराणसीः**—( चांगुणेस ) चांगुणा, जा, हो पुढं आणि अन्याबाला मी आल्याची वर्दी दे. ( वाराणसी एके बाजूस होते. )

**चांगुणाः**—बाईसाहेब, मला वाटतं मी या फक्कड बामनाची थोडीशी मजा करावी–परवानगी असेल तर करतें—

**वाराणसीः**—काय वाटेल तें कर–पण उगीच वेळ खाऊं नकोस. मला लगेंच तुळशीबागेंत जायचं आहे—

**चांगुणाः**—( पुढें होऊन अन्याबास ) अहो कारभारीसाहेब, बाईसाहेब आल्याती म्हटलं–पाहिलंच न्हाईं का अजून—?

**अन्याबाः**—( स्वगत ) पण ही कशाला बरोबर-? ( उघड ) चांगुणा, अष्टौप्रहर वैनीसाहेबांच्यापाशीं तूं असलंच पाहिजे काग ?

**चांगुणाः**—अहो, मी असलें बरोबर म्हणून कांहीं हरकत नाहीं. कारभारी-साहेब, या चांगुणेकडबी नाहींच का अक्षी पाह्यचं– ! बाईसाहेबांच्या अदुगर या चांगुनाबिगर दुसरं कोण तुम्हांला दिसनार–?

**अन्याबाः**—( स्वगत ) हीसुद्धां माझ्यावर फिदा आहे बरं का ! अन्याबा-



वाराणसीः—चांगुणा, अग, सोड-सोड-त्यांना. [ पृष्ठ ५१. ]

वर भाळणार नाहीं कोण-? ( उघड ) चांगुणा, खरंच का बाईसाहेबांचा तसला कांहीं हेतु आहे-?

**चांगुणाः**—तसला म्हणजे कसला-?जरा सपष्ट बोला बा (तो कांहीं कानांत सांगतो ) हांग अस्सं म्हंगता व्हय तुमी-! अव त्यापाईंच तर बाईसाहेब हत आल्याती!

**अन्याबाः**—खरं कीं काय-? ! मग घे तर तुला बक्षीस-( आंगठी देतो. ) जा-जा-सांग जा वैनीसाहेबांना-म्हणावं हा अन्याबा वाटेल ती सेवा करायला तयार आहे.

**चांगुणाः**—जातें-पण—

**अन्याबाः**—जा कीं मग, आणखी 'पण' तें काय ? आणखी बक्षीस देऊं का -?

**चांगुणाः**—नग नग बक्षीस नग-एकच इच्छा हाय पगा, कारभारीसाब, तुमचा कान धरून बाईसायबांकडं न्यावं म्हंनतें-एवडी माजी हौस पुरी करा-दुसरी काय बी न्हाय !

**अन्याबाः**—( स्वगत ) यांत कांहीं काळंबेरं असेल काय ? पण प्रेमाच्या राज्यांत हें असले प्रसंग यायचेच-पाहूं या तरी काय होतंय तें ! तसंच कांहीं दिसलं तर पगडी फिरवायला आहेच हा अन्याबा तयार.

**चांगुणाः**—कां—कान धरूं द्यायला मन घेत न्हाई वाटतं ? न्हांयतर न्हाय—अडलाय माजा पायपोस तुमचा निरोप न्यायाला. मी अशी जातें नी सांगतें बाईसाहेबान्नी कीं अन्याबा का मानुस आहे ? त्येच्या सांवलीला बी उभं राहूं नका—

**अन्याबाः**—( जाऊं लागते तिला ) अग नको-नको-हें बघ, हें बघ हात जोडतों. काय म्हणत्येस ? कान धरायचा, धर. कोणता धरतेस ? कोणता वाटेल तो धर. मात्र ओढूं नकोस हां—

**चांगुणाः**—ओढूं कशापाय-! त्ये चांगलं पाह्यजे तितक लांब हायेती कीं-( कान धरून ) चला आतां. ( वाराणसीबाईकडे नेऊन ) बाईसाहेब, ह्ये कारबारी आनल्याती—

**वाराणसीः**—( पुढें येऊन ) चांगुणा, अग सोड-सोड-त्यांना--

**अन्याबा**:—( चांगुणा सोडीत असतां ) नको-नको-असूं दे वैनीसाहेब, आपणासाठीं मी वाटेल तें पतकरीन. ( चांगुणा कान सोडते. )

**वाराणसी**:— अन्याबा, राहा-नीट उभे राहा.

**अन्याबा**:—आपण सांगाल ती आज्ञा वैनीसाहेब, या अन्याबाला शिरसा वंद्य आहे.

**वाराणसी**:—आहात-तसेच तुम्ही स्वामिभक्त आहांत. अन्याबा, वाड्यांत आज कोणा कोणा नव्या माणसांची हजेरी आहे ?

**अन्याबा**:—वैनीसाहेब, हजेरीकरतां पुष्कळ माणसं अगदीं खोळंबलीं आहेत. पण सध्यां बेटावरचा पेंच जास्त पडल्यामुळं बाबासाहेबांना फुरसतच नाहीं. त्यामुळं म्हटलं हा अन्याबा, आज आपल्या सेवेला मिळाला. काय असेल आज्ञा ती खुशाल बोला-अन्याबापाशीं लाज नको-भीड नको-अगदीं मन मोकळ करून काय बोलायचं तें बोला.

**वाराणसी**:—मन मोकळं करून निर्भीडपणं बोलण्याकरितांच मी आलें आहें. अन्याबा, तुम्ही स्वामिभक्त आहांत, अशी तुमची ख्याती आहे.

**अन्याबा**:—स्वामिभक्तीशिवाय या अन्याबाला दुसरं तिसरं कांहींच दिसत नाहीं.

**वाराणसी**:—या स्वामिभक्तीकरितां शें-दीडशें तरी बायकांना तुम्हीं वाड्यामध्यें आणलं असेल ?

**अन्याबा**:—आतां त्यांची गणती कोणी केली आहे, वैनीसाहेब ? असंख्य म्हणा पाहिजे तर.

**वाराणसी**:—म्हणजे असंख्य पुरुषांच्या बायका वाड्यांत आल्या.

**अन्याबा**:—अहो, आल्या कसल्या-त्यांनींच आणून पोंचत्या केल्या— अगदीं आपल्या हातीं पोंचत्या केल्या.

**वाराणसी**:—अगदीं सुखानं ना ?

**अन्याबा**:—हो, अगदीं सुखाकरितां-बाबासाहेबांचा कोप होऊन दुःख होऊं नये म्हणून-!

**वाराणसी**:—म्हणजे हें त्यांनीं खुषीनं केलं असेल का ?

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय
८०२
नाटक



**अन्याबा:**—त्यांच्या खुषीला कोण विचारतो ? आमचा हेतु सफल झाला म्हणजे झालं !

**वाराणसी:**—पण यामध्यें ते चिडले तर ?

**अन्याबा:**—उं: ! काय करणार चिडून ?

**वाराणसी:**—तुमच्या मालकाच्या सत्तेचा बागुलबुवा हुसकून देणारा कोणी पंचाक्षरी यांना मिळाला तर हे चिडलेले लोक तुम्हांला चिरून हिरवेच खाणार नाहींत काय ?

**अन्याबा:**—पण बाबासाहेबांच्या सत्तेला चेपणार कोण ?

**वाराणसी:**—तो जगन्नियंता-तो विश्वंभर—.

**अन्याबा:**—त्याकरितां तर ओंकारेश्वरावर महारुद्राची संतत धार ठेवली आहे. आणि त्याच्या जोरावर या भिकार लोकांच्या सुंदर सुंदर बायका बाबा-साहेबांच्या चरणसेवेला येत आहेत. जोंपर्यंत ओंकारेश्वरावरची धार खळली नाहीं, तोंपर्यंत कोणालाही कांहींही करतां येणार नाहीं.

**वाराणसी:**—अन्याबा, तुमच्या मालकांना सध्यां फुरसत कां बरं नाहीं ?

**अन्याबा:**—अहो बेटावरल्या दुष्ट टोपीवाल्याचा ससेमिरा उगीच लागलाय—कांहीं ना कांहीं दररोज आहेच.

**वाराणसी:**—मग तो कांहीं पेशव्यांच्या सत्तेला जुमानीत नाहीं म्हणायचा ! त्यानं जोर धरून या सत्तेच्या बागुलबुवाच्या भ्रमाचा भोपळा फोडला तर अन्याबा, तुमच्या मालकाची गत काय होईल ?

**अन्याबा:**—काय होणार ? कुठं तरी स्नानसंध्या करीत बसतील. आणि खरं सांगूं का वैनीसाहेब, बाबासाहेबांसारख्या देवमाणसाला या राज्याच्या नसत्य उलाढाली पाहिजेत कशाला ?

**वाराणसी:**—अन्याबा, ऐक तर आतां-अत्तांच्या आत्तां हें पुणं सोडून तूं चालता हो !

**अन्याबा:**—कां ?

**वाराणसी:**—मी सांगतें म्हणून-पेशव्यांच्या राशीला तूं शनि लागला आहेस. पेशवाई डळमळूं लागली. तूं स्वार्थाकरितां आपल्या मालकाला वेळोवेळीं

भर देऊन जीं अनन्वित कृत्यं करतो आहेस, त्यांच्या झंझावातानं हा स्वराज्याचा कल्पवृक्ष समूळ हालून उपडून पडतो कीं काय असं वाटूं लागलंय. या वेळीं अन्याबा, तूं पेशव्यांच्यापासून दूर होणं जरूर आहे. बऱ्या बोलानं हें पुणं तूं सोडावंस हें चांगलं–!

**अन्याबाः**—तुम्ही मला कोण सांगणार ? मी तुमची आज्ञा ऐकत नाहीं. मी बाबासाहेबांचा खासगी कारभारी–प्रसंगीं तुम्हांलाहि कैद करीन, माहीत आहे ना हें तुम्हांला वैनीसाहेब—.

**वाराणसीः**—अन्याबा, मूर्खा–फुकट मरूं नकोस, जन्माला येऊन अनन्वित कृत्यं केलींस. एवढं मी सांगतें हें ऐक–एवढं तरी एक चांगलं कृत्य कर. जा—चल चालता हो—.

**अन्याबाः**—नाहीं—फुकट कैदी व्हाल—वैनीसाहेब, अन्याबाच्या कोपाला बळी पडूं नका बरं.

**वाराणसीः**—अस्सं—मग कपाळकरंट्या—पापाच्या कवंडळा–मर–मर–! चला ग या इकडे. याला चांगला चोप देऊन, हातपाय बांधून द्या या तळ्यांत फेंकून. हा मेल्याशिवाय पेशवाईचा शनि मार्गी होणार नाहीं. ( दासी येतात. अन्याबाला मारतात, आणि बांधून उचलतात. )

[ पडदा ]

## अंक तिसरा समाप्त.

---

# पेशवाई.

## अंक चवथा.

### प्रवेश पहिला.

**स्थळ:**—पुणें, पर्वतीचा वाडा ( दसऱ्याचा दरबार. )

( बाजीराव, बापू गोखले, मोर दीक्षित, भोंसले, निंबाळकर, जाधवराव, घोरपडे, निपाणकर, भोईटे, रूपरामजी, मोहनगीरबुवा, गणपतराव पानशे, गणेशपंत सहस्त्रबुद्धे, विठ्ठलपंत विंचूरकर, आबा पुरंदरे, गहेनाजी वगैरे सरदार मंडळ जमलें आहे, असा पडदा उघडतो. )

**बाजीराव:**—बापू, संपूर्ण लोक आले आहेत ना ?

**बापू:**—निमंत्रित अशी सर्व लहानथोर मंडळी आली आहे. अक्कलकोटवाले राजे फत्तेसिंग भोंसले, निंबाळकर, जाधवराव, घोरपडे, पटवर्धन, शिंदे, होळकर, गायकवाड यांचे वकील, राजे बहाद्दर, भोईटे, पुरंदरे, विंचूरकर—सर्व आलेले दिसतात. यांखेरीज, नाना, तुम्हांला कसं वाटतं—? कोणी यायचं राहिलं आहे काय ?

**मोर दीक्षित:**—नाहीं—नाहीं—कोणी राहिलं नाहीं—सगळे आले आहेत.

**बाजीराव:**—तर मग बापू, आपला निश्चय सर्वांना कळवा.

**बापू:**—आज्ञा सरकार. ( पेशव्यांस वंदन करून ) समस्त राजे, मांडलिक, सरदार, संस्थानिक, एकांडे, गैरसाळ, बारगीर, शेटसावकार, पंडित, शास्त्री, शूर वीर दौलतीचे खांब हो, सांप्रतच्या स्थितींत आपण इतकेजण एकदिलानं सीमोल्लंघन करावयास आज एकत्र जाहलों ही त्या जगन्नियंत्या परमेशाची अपार कृपाच होय. गुदस्त सालीं याच प्रसंगीं त्रिंबकजी डेंगळे, चिंतोपंत देशमुख, गोविंदराव काळे, खरशेटजी मोदी, सदाशिवराव माणकेश्वर अशी एकापेक्षां एक धुरंधर राज्यकार्यतत्पर मंडळी आपल्या मंडळास शोभवीत

होती. परंतु दैवयोगच असा कीं, ते आजच्या प्रसंगास नाहींत. भगवदिच्छा ह्मणावं दुसरं काय–! अस्तु. ' गतं न शोचे ' या न्यायाला अनुसरूनच पाठीमागील दुःखविमोचन सर्वांनीं केलं पाहिजे. सांप्रत आपल्या या स्वराज्यावर कोण प्रसंग गुदरला आहे, हें आपणां सर्वांस माहीतच आहे. आपणां सर्वांच्या अंतःकरणाला जी एक काळजी लागून राहिली आहे, तिची आठवण मी आपणांस पुनः देऊं काय ? आपण या दौलतीचें अभिमानसर्वस्व, आपण या मराठी स्वराज्याचें आधारस्तंभ, आपण या हिंदुपदपादशाहीचें हृदयस्थान, आपण या स्वराज्याचे पंचप्राण, आपण आतांशा कासावीस कां होत आहांत–कां झाला आहांत–याचं स्मरण मी तुम्हांला देऊं काय–? याचं स्मरण थोडंसं अपमानास्पद वाटलं तरी पण तें या प्रसंगीं करून देणें अत्यंत जरूर आहे. त्याशिवाय वस्तुस्थितीचं खरं स्वरूप पटणार नाहीं. सरदारहो, हे माझे दिलदार दोस्तहो, समरभूचे महाप्रतापी वीरहो, मी ती आठवण तुम्हांला देणार ह्मणजे तुम्हांला टोंचण्याकरितां नसून तुमच्या, आजवर पदोपदीं तेजोभंग झालेल्या, इच्छा नसतांहि दाबून टाकलेल्या वीरश्रीस उत्तेजित करण्याकरितां होय. यांत माझा शुद्ध हेतु आहे. विठ्ठलराव विंचूरकर, वसईच्या तहाच्या कलमांची यादी वाचा पाहूं.

**विंचूरकरः**—( वाचतो ) " इतउत्तर राव पंडित प्रधान यांनीं नामदार ऑनरेबल ईस्त इंदिया कुंपनीसरकारच्या आज्ञेबाहेर कोणाही संस्थानिकाशीं छत्रपतीचे मुख्य पेशवे या नात्यानं पत्रव्यवहार करूं नये. "

**बापूः**—ऐकलंत–? बरं पुढं–?

**विंचूरकरः**—( वाचतो ) " कोणाच्याही दरबारीं वकील धाडूं नयेत व आपल्या दरबारीं इतरांचे घेऊं नयेत. "

**आबा पुरंदरेः**—( आवेशानें ) काय–?

**बापूः**—होय–ते वाचतात–ते अगदीं अक्षरशः सत्य आहे. विठ्ठलरावांना पदरचं वाचायची काय बरं जरूर –? हं–पुढचं कलम कोणचं–?

**विंचूरकरः**—( वाचतो ) " दक्षिणेस तुंगभद्रा आणि उत्तरेस नर्मदा यांच्यामधील मुलुखावर काय तें पेशवे यांचं स्वामित्व. " ( विंचूरकर थांबतात. )

**कांहीं सरदारः**—वाचा–वाचा—

**विंचूरकरः**—"अहमदाबाद, भडोच वगैरेकडला खटला ४॥ लाखांत तोडावा. गायकवाडाकडून ४ लाखांत फेड करून घ्यावी. अहमदनगरची सोडचिठ्ठी द्यावी"—( " पुरें पुरें " " नको–नको " ' नका वाचूं " " नका वाचूं " अशा गलबल्यामुळें विंचूरकर काय करावें या हेतूनें बापूंकडे पाहतात. )

**बापूः**—विठ्ठलराव, पुरें–हीं कलमंच अशीं अपमानास्पद आहेत कीं, कोणत्याही मानी पुरुषाला तीं ऐकवणार नाहींत.

**आबा पुरंदरेः**—सारांश काय कीं, दर कामांत आम्हांला साहेबाची मखलाशी पाहिजे ? कुठं स्वारीशिकारीला निघायचं झालं तर आधीं साहेबाचा परवाना पाहिजे ? वाड्यांत कोणी पाहुणा आला तर त्याची वर्दी आधीं बेटावर गेली पाहिजे ? कोण अपमान हा ? अशीं कलमं लिहून देऊन—

**विंचूरकरः**—( पुरंदरे हे आवेगानें पेशव्यांना दोष देणार हें पाहून तत्परतेनें ) हां–हां—! झाल्या गेल्या गोष्टीवर रण माजाविणं बरं नाहीं. सध्यांची स्थिती ही अशी आहे येथून पुढचं पाऊल कसं टाकावं याचा विचार करा.

**आबा पुरंदरे**—महाराज, क्षमा करा. अपमानाच्या आवेगानं मी भलतंच बोलून जाणार होतों.-- पण या पांढऱ्या केसांनीं या स्वराज्याची दुर्दशा तरी आतां किती पहावी ? वसईच्या तहानं आमचे हातपाय बांधले त्याबरोबर स्वराज्यांतला कसदारपणा कां नाहींसा व्हावा ? हे माझे समरबंधूहो, आपली अशी हिणकस अवस्था व्हायला कारण आपणच बरं–! आपसांत फूट–कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं—! चाकर धन्याला गुरकावूं लागले—आमच्या बायका आम्हांलाच धुडकावूं लागल्या. फार काय सांगूं, तुमच्यांत फितुरी इतकी शिरली आहे, कीं तुम्हीं तुमच्या बायकांशीं एकांतांत काय बोलतां याची खडानूखडा बातमी टोपीवाल्याला घरबसल्या बेटावर मिळते. अशा मात्रागमनी, हरामखोरांना अक्षय्य रौरव नरक तर ठेवलेला आहेच–पण वखत येईल तर या मानवी राक्षसांच्या पाठीवर मिठाचं पाणी मारून जेरबंदानं चामडी लोंबेतों झोडपून काढीन, या घुशींनींच हें आमचं घर पोंखरून काढलं.

**बापूः**—हे हरामखोर कोण आहेत–तें कांहीं आतां गुप्त नाहीं. पण वेळ आली पाहिजे. पण हेंही खूप समजा कीं, विजयश्रीचा कल तुमच्याकडे आहे

असं यांना दिसलं कीं ही दुष्ट जात-हे फितुरी लोक-लगेंच तुमच्या पायांवर लोटांगणं घेऊं लागतील. असं हें चालायचंच-ढेंकणाउंदरांच्या भीतीनं का कोणीं घर सोडलीं आहेत-? सारांश काय कीं, सांप्रत आपली स्वराज्य-नौका परिस्थितीच्या भयंकर वादळांत सांपडली आहे ! अशा वेळीं प्रयत्नाचा नांगर टाकून पाहण्याचा विचार आहे. अर्थात् हा विचार आपणां सर्वांच्या एक-दिलावर अवलंबून आहे. सरदारहो, या बापूला तुमच्या एकदिलाची भिक्षा पाहिजे आहे. एवढी भिक्षा या बापूला घालता ना ? ( पदर पसरतो. )

**सर्व**:—बोला-बोला-काय पाहिजे, तें बोला.

**बापूः**-- बोला ह्मणता खरं- पण ही जोखीम मोठी आहे. हें सतीचं वाण तुह्मांला द्यायचं आहे-ज्याची इच्छा हें दिव्य करायची नसेल-ज्याची छाती हें दिव्य करायला कचरत असेल-त्यानं आधींच सुखानं उठून या दरबारला कायमचा रामराम करावा. रडत राऊत घोड्यावर बसवायची मला मुळींच इच्छा नाहीं. हा पहा मी थांबतों-ज्याला आधींच उठून जायचं असेल त्यानं खुशाल जावं. आमचा कोणच्याही प्रकारचा त्याचेवर राग नाहीं. ( थांबतो ) हें पाहा, श्रीमंतांपुढं कसं बोलावं-दरबारांतनं कसं उठून जावं, ही शंका बिलकूल मनांत आणूं नका, यत्किंचि-तही लाज, भीड, धरूं नका. तुमच्या कोणाच्या बालाग्रास धक्का लागला तर त्याचा जामिनदार मी आहें.

**आबा पुरंदरे**:--थांबा बापू, यापेक्षांही दुसरा एक खुलासा मी करतों. सरदारहो, स्वराज्याचा इतिहास पाहिला तर प्रत्यक्ष काळानंही केव्हां केव्हां तुम-च्यापुढं हात जोडल्याचा दाखला आहे. पण सध्यांची वेळच मोठी बिकट- ! सांप्रत आह्मी काळाला धाकलों आहोंत. असं तुह्मी समजूं नका कीं, केवळ वीर-श्रीनं अंध होऊन आह्मी कांहीं तरी बोलतों आहोंत. सर्व स्थिति आह्मांला पूर्ण अवगत आहे. आह्मीं तिचा सांगोपांग विचार केला आहे. व्याधाच्या जाळ्यांत सांपडलेला पक्ष्यांचा समुदाय ज्याप्रमाणं एका दिलानं-एका मनानं-एका निश्चयानं-उडाला आणि आपल्या स्वातंत्र्यास मिळाला, तो प्रकार लक्षांत आणा. या वेळीं टोपीवाला किती शेर झाला आहे, हें आह्मांला माहीत आहे. आह्मी एकाच घरची चार मंडळी चार चार ठिकाणीं पडलों आहोंत. आह्मी चौघां भावांचीं तोंडं चार

दिशेला झाली.आहेत. स्वराज्याच्या कोंदणांत चमकणारे शिंदे, होळकरादि हिरे आज त्या कोंदणांतून बाहेर पडून जमिनीवर कोठें तरी विखुरलेले दिसताहेत–हेंहि आम्हांला माहीत आहे; सारांश काय कीं, सांप्रतची परिस्थिति पूर्ण जाणूनच त्यावर योग्य इलाज काय तो ठरवूनच बापू आज तुमच्यापुढं उभे आहेत.

**बापू**:--श्रीमंतांच्या गादीचा पुण्यप्रतापच असा कीं, असल्याही विरुद्ध स्थितींत मनासारख्या गोष्टी जुळून आल्या आहेत. अरब, रोहिले, पठाण आणि सिद्दी, तसेच रांगडे, मराठे, हिंदुस्थानी पुरभय्ये, नंगे गोसावी यांच्या अनेक पलटणी उभ्या केल्या आहेत. प्रसंग टोपीवाल्यांच्या कवायती सैन्याबरोबर आहे हें जाणून आमच्याही पल्टणींना कवायतीचं शिक्षण सारखं चालू आहे. एवढ्या कामाकरितां आतांपर्यंत एक कोट नगद खर्च झाली आहे. गणपतराव पानशांनीं रात्रीचा दिवस करून दारुगोळा भरपूर तयार केला आहे.

**गणपतराव पानशे**:—एक लाख फौज तीन वर्षं झुंजली तरी हटूं नये, इतका दारुगोळा, बाणगोटा माझ्यापाशीं तयार आहे.

**मोहनगीरबुवा**—माझ्या नंग्या पल्टणी इतक्या जय्यत तयार आहेत कीं, काळाच्याही थोबाडांत मारतील.

**बापू**:—हुजरातही तशीच तयार आहे. प्रत्येक इमानी सरंजामदार " हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् " अशाच हिमतीनं कंबर कसून उभा आहे. पटवर्धन व रास्ते आम्हांवर रुसले आहेत, तरी पण ते आमचे आहेत, आम्ही त्यांचा रुसवा केव्हांही काढूं. काय, गणेशपंत सहस्रबुद्धे, खरं ना मी म्हणतों हें ? मुख्य मुद्याविषयीं म्हणजे स्वराज्यावरचं संकट दूर करण्यासाठीं तुमची कांहीं मतभिन्नता नाहीं, होय ना ?

**आंबा पुरंदरे**:—बापू, तुम्ही आपल्यावरूनच जगाची पारख करूं नका. इंग्रज सर्वस्वीं मोडून काढावा, असा सल्ला हे पटवर्धनांचे कारभारी तुम्हांला केव्हांही देणार नाहींत. श्रीमंतांनीं पटवर्धनांच्या जहागिरीची मसलत केली, तें शल्य हे केव्हांही विसरणार नाहींत. पटवर्धनांच्या हातचे दर्भ सुटून त्यांच्या हातीं तलवार दिली कोणीं ? ते भिक्षुकाचे सरंजामदार झाले कोणाच्या जोरावर, हें आतां त्यांना आठवणार नाहीं. इंग्रज शूर आहेत–न्यायी आहेत–विशेष

म्हणजे ते अन्यायासहिष्णु आहेत-वास्तविक हें खरंही आहे; म्हणजे का आम्हीं आमच्या स्वराज्याचं पाणी त्यांचे हातावर सोडून 'हरि हरि' म्हणत स्वस्थ बसावयाचं? हे पटवर्धनांचे कारभारी म्हणतील 'हो असंच करायचं.' ते त्याला कारण काय दाखवितील समजलं का? ज्यां शिंदे मस्त झाले-होळकर अमीरशाही करूं लागले, कोल्हापूरकरांनीं बंड केलं—किंवा भागानगरवाले चालून आले तर उपयोगी कोण पडेल, तर हे गणेशपंत म्हणतील, इंग्रज-! सध्यां त्यांचं दैवत पेशवे नसून इंग्रज झाले आहेत. हैदर-टिपूवर मात करणारे पटवर्धन एवढ्या तेवढ्यासाठीं इंग्रजांकडे पाहतात, नव्हे स्वराज्याच्या विरुद्ध त्यांच्याशीं कानगोष्टी करतात—असा हा बांका वखत आहे. बापू, तुमच्या मसलती चालूं देन, पण त्यांमध्यें तुम्हीं पटवर्धनादि निरसलेलीं माणसं घेऊं नका. हं चला आतां उशीर नको—काय निर्वाणीचे दोन शब्द सांगायचे असतील ते सांगा.

बापूः—पुरंदऱ्यांचं म्हणणं अगदीं अक्षरशः खरं आहे. आम्हाला सगळे पाहिजे आहेत. स्वामिभक्तांना आमच्या कार्याचे भागीदार होण्यासाठीं मी तर प्रेमाचं निमंत्रण देतों. वसईचा तह म्हणजे खंडेराव रास्ते आणि बाळाजीपंत नातु यांच्या अदूरदर्शीपणाची म्हणा अगर स्वराज्याविषयींच्या निमकहरामीची म्हणा, शिकस्त होय. शिंदे, होळकर, भोंसले हे सारे आमच्या मसलतीस राजी आहेत. हें पहा होळकरांचं पत्र. (वाचतो.) "गादीचे चाकर आम्ही. जसा हुकूम होईल तसे चालूं. येथें मालकम व हिस्लाप यांचा पेंच भारी आहे, तरी दहा हजार स्वारांची मांड देऊन रामदीन परदेशी पाठविला आहे." मराठे प्रसंगीं आपसांत भांडून एकमेकांचीं नरडीं फोडतील, पण स्वराज्याकरितां आपलीं भांडणं विसरतील, हा आपला पुरातन लौकिक कायम ठेवा. हें पाहा विड्याचं ताट तयार आहे. आजवर तुम्ही ज्यांचं अन्न खाल्लंत-ज्यांच्या नांवावर विकलेत-ज्यांच्या वंशाचा अभिमान बाळगलांत-ज्या गादीला पूज्य मानलीत-तिच्या स्थिरतेकरितां-तुमच्या मोठेपणाकरितां आणि तुमच्या भावी पिढीच्या कल्याणाकरितां-निरंतर स्वातंत्र्यसुखाकरितां-या पवित्र स्वराज्याकरितां उठा-देवाचं नांव घ्या-मारूं किंवा मरूं-पण स्वराज्य अढळ राखूं, अशा निश्चयानं विडा उचला. देह हा केव्हांही पडायचाच आहे. मराठ्यांच्या बच्चांना आणखी जास्त तें काय सांगायला पाहिजे?

**मोर दीक्षितः**—मीच आधीं उचलतों म्हणजे झालं. मी म्हातारा आहें—सगळे संभाळून घ्या म्हणजे झालं. ( उठतो व विडा उचलतो. पागोट्याचा पदर सुटून एकदोन पट्या गळ्यांत येतात. )

**बापूः**—अहो म्हातारे काय नी तरणे काय—समरांगणीं सगळे सारखेच. अहो नाना, पदर सुटला आहे, पागोटं गळ्यांत येईल.

**मोर दीक्षितः**—आतां सगळेंच गळ्यांत आलं आहे—मग त्यांत पागोट्याची विशेष मातब्बरी काय ? ( बसतो. )

**बापूः**—ऐका. नानांचा हात प्रथम ताटाला लागला तर तेच आपले सेनापति भीष्म. उद्यांपासून सगळ्या फौजा यांच्या हुकुमांत चालायच्या. वस्त्रं मात्र आज्ञेप्रमाणं.

**बाजीरावः**—वरं आहे. तुमच्या समस्तांच्या विचाराबाहेर मी नाहीं. खासगीवाले. यांस पोषाक, कंठी, शिरपेंच, कट्यार, द्या वरं.

**बापूः**— कां आतां ? उठा—उचला विडे, ( सगळे विडे उचलतात—कांहींच्या हातून ते पडतात. ते पुनः घेतात. ) आतां ऐका. पेंढाऱ्यांवर जाण्यासाठीं म्हणून बाह्यात्कारी तयारी आहे हें आपणां सर्वांस माहित आहेच. तशीच आवाई अखेरपर्यंत ठेवायची. पुढल्या वद्यांतल्या एकादशीस एकदम सर्वांनीं छापा घालून येथचा शत्रू पार करावा. शिंदे, होळकर, गायकवाड, सेनाखासखेल, आप्पासाहेब भोंसले हे सर्व त्याच दिवशीं उठणार. आम्हीं येथचा आणि त्यांनीं तेथचा शत्रू मोडून अशीरीच्या मुक्कामावर साऱ्या फौजा एकत्र करून चोहोंकडून दामटीत शत्रूला समुद्रापार हांकलून देऊं. धुळपालाही आरमाराची तयारी जय्यत ठेवण्यास कळविलें आहे.

**भालदारः**—( प्रवेश करून ) शिलंगणाला हत्ती तयार आहे.

**बापूः**—आतां शेवटची हात जोडून विनंती इतकीच कीं, प्रसंग मोठा बांका आहे, आजवर राजधानीच्या नजिक मराठ्यांनीं केव्हांही लढाया दिल्या नाहींत. आजवरचे प्रसंग आमच्याप्रमाणंच गैदींपणानं लढणाऱ्या इराणी दुराण्याशीं किंवा हैदर टिपूशीं होते. सध्यांच्या विचित्र वेळेप्रमाणं सर्वच प्रसंग विचित्र आहे. पण स्वामिनिष्ठेच्या बळावर, आत्मविश्वासाच्या चिकाटीवर आणि स्वराज्याच्या

मनःपूर्वक आपलेपणावर तुम्ही या प्रसंगांतून पार व्हा. ' मराठे मेले तरी हटले नाहींत ' एवढं नांव केलंत तरी तुमच्या शूर पूर्वजांना स्वर्गांत आनंद होईल. तर बोला श्रीशिवछत्रपतिमहाराजकी जय. हरहर महादेव.

( नाच वगैरे होऊन दरबार खलास. )

—पडदा—

# प्रवेश दुसरा.

**स्थळ**:—जंगलरस्ता-सिंहगडानजीकचा.

ठाकुरदासबुवा व लक्ष्मी प्रवेश करतात.

**ठाकुरदासबुवा**:—बेटा, अशी कष्टी होऊं नकोस. अग विनाशकालीं विपरीत बुद्धि ही व्हावयाचीच. स्वराज्यसूर्य अस्ताचलावर चढला आहे–त्याला आतां तूं थांबाविणार तरी किती ?

**लक्ष्मी**:—मग एकंदरींत निराशाच का ? मुसलमानांच्या तडाख्यांतून आम्हांला पुरतं सुटून अझूनी शंभरही वर्सं भरलीं नाहींत. पुनः आमच्या कपाळीं पारतंत्र्य बडाविणार का ?

**ठाकुरदासबुवा**:—भवितव्यतेला कोण काय करणार ?

**लक्ष्मी**:—त्या पुण्यप्रद शिवप्रभूच्या आणि त्याच्या अनुयायांच्या प्रयत्नांचं यश पुरतं शंभर वर्संही टिकूं नये का ?

**ठाकुरदासबुवा**:—टिकूं नये असं कोण म्हणेल पण टिकलं नाहीं एवढं मात्र प्रत्ययाला येतं आहे.

**लक्ष्मी**:—याला उपाय नाहींच का कांहीं ? आपण तर म्हणतां स्वराज्यसूर्य अस्ताचलावर चढला. तो अस्तंगत होऊं नये, त्याला तिथंच थोंपवून धरावा अशी कुणाची पुण्याई नाहीं का ?

**ठाकुरदासबुवा**:—अग वेडे, पानिपतास विश्वासरावाच्या मृत्यूबरोबरच ती पुण्याई नष्ट होत गेली, ती आतां कुठली येणार ? स्वराज्याच्या कारभारांत खाजगी द्वेष शिरला ना ? त्याचाच हा परिणाम ! आतां उगीच कष्टी होण्यांत अगर दांत ओंठ खाण्यांत काय फायदा ? आतां भवितव्यतेप्रमाणं काय होईल त्याला निमूटपणं मान वांकविण्यांतच शहाणपणा आहे.

**लक्ष्मी**:—तें सारं खरं-पण प्रयत्न करायला कांहीं प्रत्यवाय आहे काय ? मी तर आज पुनः एकवार प्रयत्न करून पहाणार. गुरुमहाराज, आपली अनुमति मात्र पाहिजे.

**ठाकुरदासबुवा**:—नुसती अनुमतीच का ? अंतःकरणापासून तुला मदतही मिळेल. अग तुझ्या प्रयत्नामुळं माझं भविष्य चुकलं तर का मला वाईट वाटेल ? छेः अशी मुळींच कल्पना करूं नकोस. अग तूं यशस्वी झालीस तर उलट मला आनंदच होईल. कुणाच्या का योगानं होईना, स्वराज्य जर राहिलं तर तें का मला नको आहे-? काल दसऱ्याच्या दरबारांत बापू, आबा वगैरेनीं केलेली मसलत टाकोटाक बेटावर गेली.

**लक्ष्मी**:—स्वराज्याची तिलांजली द्यावयाला उत्सुक झालेला असा थोर हरचा लाल कोण बरं-?

**ठाकुरदासबुवा**:—असा का कोणी एकच आहे ? ! वाटेल तितके आहेत. पण हे सारे घरचं खाऊन लष्करची भाकरी भाजतात आं-! गणेशपंत सहस्रबुद्धे होताच तिथं-निपाणकरही होता-रास्ते होता-हेच काय पण आणखीही कित्येक असे आहेत कीं कांहीं तरी नवी बातमी साहेबाच्या कानावर घातल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाहीं.

**लक्ष्मी**:—हे लोक फितुर आहेत, हें बापू-आबा- विठ्ठलराव वगैरेना माहीत नाहीं का ? यांच्या देखत यांनीं ही मसलत कशाला केली ? दरबारची हकीगत ऐकली तेव्हांच मला हा संशय आला. दुष्मान असा सावध होणं बरं नाहीं.

**ठाकुरदासबुवा**:—केव्हां तरी एकदां सोक्षमोक्ष करून घ्यावयाचा-त्याशिवाय गत्यंतर नाहीं. असा दरबारच्या मंडळींचा निश्चय झाला आहे. तेव्हां ते

आतां या फितुरीला भीक घालीत नाहींत ( पाहून ) अझून कां बरं ही मंडळी आली नाहीं ? जरा मी या खिडीच्या तोंडापर्यंत जाऊन पहातों मंडळी दिसतात कीं नाहीं तें. तोंपर्यंत तूं त्या देवीच्या देवळांत जाऊन बैस. तुझ्या प्रयत्नाची तुला काय शिकस्त करावयाची असेल ती आज करून घे. या स्वराज्याप्रीत्यर्थ आपल्या तळहातावर शीर घेतलेले, समरदेवतेचे कंठमणी आज इथं जमणार आहेत. पहा, तुझ्या इच्छेप्रमाणं ते वळतात का पहा. ( जातो. )

**लक्ष्मी:**—भगवंता, तुझी लीला तुलाच माहीत ! आम्ही पामर केवळ आशेच्या धाग्यावर नाचणार. देवा, स्वराज्याचा हा अंतकालच असला तरी पण याचं आयुष्य-वर्धन करणं तुला कांहीं अशक्य नाहीं. तूं आपल्या इच्छामात्रें-करून काय करणार नाहींस ?

( देवीच्या देवळाचा देखावा. )

या जननीच्या पाठीमागं बसून प्रसंगाला येईल तसं धोरण ठेवावं. ( देवीच्या मागें लपते. ठाकुरदासबुवा आणि त्रिंबकजी डेंगळे प्रवेश करितात. त्रिंबकजी देवीला वंदन करतो. )

**ठाकुरदासबुवा:**—त्रिंबकजी, आज नाहीं उद्यां तुम्ही यावा म्हणतां तो दिवस उजाडणार—पण त्या प्रसंगाला जरूर अशी तुमची तयारी आहे ना ?

**त्रिंबकजी:**—सगळी जय्यत तयारी आहे. असं हें घोंगडं भिजत तरी आतां किती दिवस टाकायचं ?

**ठाकुरदासबुवा:**—आतां हें तुमचं तुमच्या हातीं. वाटेल तेव्हां तुम्हीं लढाईचं शिंग फुंकावं. पण हो- ही पहा मंडळी आलीच. ( बापू गोखले, आबा पुरंदरे, विठ्ठलराव विंचूरकर, गहेनाजी येतात, आणि सर्वजण देवीस वंदन करून बुवाजीस नमन करतात, आणि मग त्रिंबकजीस भेटतात. )

**ठाकुरदासबुवा:**—हा पुंड त्रिंबकजी, हा बंडखोर त्रिंबकजी, हा पहा आज तुम्हांला पकडून दिला; आणा कुठं आहे तें दोन लाखांचं इनाम.

**त्रिंबकजी:**—बापू, आबा, बाबासाहेबांकरितां वाटेल तें करणारा हा त्रिंबकजी बंडखोर ठरला आं-?

**आबा:**—त्रिंबकजी, तुम्ही उगीच कष्टी होऊं नका. कालचक्र सारखं फिरतं

आहे. ज्या वसईस चिमाजी आप्पांनीं फिरंग्यांना पेशव्यांच्या तरवारीचं पाणी दाखविलं-त्याच वसईस फिरंग्यांनीं पेशव्यांना आपल्या लेखणीचा पेंच दाखविला. बापानं गादीकरितां पुतण्या मारविला तर लेकानं गादीकरितां गादीच ओलीस ठेवली. पण करायचं काय ? !

**बापूः**—हें कालच्या दरबारांतच ठरलं आहे.

**गहेनाजीः**—पण तें बेटावर केव्हांच जाहीर झालं—

**विंचूरकरः**—उंः ! आम्हीं थोडकंच तें गुप्त खलबत केलं आहे.

**बापूः**—अहो वाघ्या म्हटलं तरी खातो—वाघोबा म्हटलं तरी खातो. उगीच नसता मुलाजा धरण्यांत आतां अर्थ काय ? आमच्या सरदार मंडळांत लढाई देण्यासंबंधीं एकमत नाहीं, हें मला पूर्ण माहीत आहे.

**त्रिंबकजीः**—फार काय पण पटवर्धनासारखे कांहीं सरदार तर पूर्ण फितुर आहेत.

**विंचूरकरः**—खुद्द माझ्या सैन्यांत फितुरी ! त्या बाळाजीपंतानं आणि त्याच्या हस्तकांनीं तर अगदीं भंडावून सोडलंय.

**ठाकुरदासबुवाः**—मग तुम्ही त्या बाळाजीला कां चांगलं प्रायःश्चित्त देत नाहीं ?

**आबाः**—हें सारं राजकारणासाठीं- ! साहेब रागावेल म्हणून मूग गिळून स्वस्थ बसावं लागतं !

**विंचूरकरः**—असं करतां करतां सर्वस्वाला मुकण्याची मात्र पाळी येऊन ठेपली.

**गहेनाजीः**—एवढा हा मालक चांगला असता तर-

**आबाः**—पण आतां काय त्याचं- ! आतां निर्वाणीचा प्रसंग येऊन ठेपला आहे. आपण पेटलेल्या वणव्यांत केवळ आत्मविश्वासाच्या बळावर उभे आहोंत. अठरापगड मराठे मंडळांत आपल्या हांकेला कोण उभा राहील-आपल्या खांद्याशीं खांदा भिडवून रणांगणांत शत्रूशीं निःशंक कोण भिडेल, याची आपणांस मुळींच कल्पना नाहीं. आपल्या या हाताचा या हातावर विश्वास नाहीं. आपलेच डोळे-आपलेच अवयव आपल्यास फसवायला तयार झाले आहेत. सर्व परिस्थिती अगदीं पूर्ण विरुद्ध आहे—पूर्ण भीतिदायक आणि निराशाजनक आहे. पण

कर्तव्य ह्मणून कांहीं तरी आहे ना ? आमच्या भोंवतालचा आपलेपणाचा सुंदर बगीचा फितुरीच्या विषारी रोगानं करपून गेला आहे; अंतर्बाह्य रुक्षता स्पष्ट दिसत आहे, तरी पण खाल्लेल्या अन्नास जागण्यासाठीं—

**बापू**:—नव्हे-नुसत्या अन्नासाठीं नव्हे-

**आबा**:—होय-केवळ अन्नासाठीं नव्हे तर आमच्या प्राणापेक्षांही प्रिय अशा स्वराज्यासाठीं-आमच्या अमृततुल्य स्वातंत्र्यासाठीं-आमच्या चिंतामणीलाही लाजविणाऱ्या चैतन्यासाठीं, आम्हांला झगडलं हें पाहिजेच. हा झगडा आम्ही न करूं तर आमचीं मुलंबाळं खचित खचित आम्हांला शिव्या शाप देतील. तुमच्या कर्तव्यकर्मासाठीं आणि भावी पिढीच्या मोठेपणासाठीं हें भयंकर दिव्य तुम्हांला केलंच पाहिजे. यासाठीं आम्हीं या देवीच्या आणि या पुण्यपुरुषाच्या चरणाची शपथ घेतली पाहिजे. सारा मुग्ध महाराष्ट्र आमच्या प्रयत्नावर, आमच्या बळावर सारा जीव ठेवून आहे. स्वतःच्या सरंजामासाठीं, जाहागिरीसाठीं, जीवितासाठीं, हांवेस फाजील भरीं पडलेले हे सरदार-दरकदार तुम्हांला मिळोत अगर न मिळोत; तुम्ही त्यांची वाट पाहूं नका. महाराष्ट्राचं खरं अंतःकरण तुम्हां मूठभर मराठ्यांच्या बाजूला आहे. तरी हे आम्ही इथं जमलेले सर्व एका दिलानं या स्वराज्यश्रीचं रक्षण करूं या. एवढ्यासाठीं घ्या-घ्या या देवीच्या चरणाची शपथ. ( सगळे शपथा घेतात. )

**ठाकुरदासबुवा**:—शूर वीर मराठ्यांच्या वीर्यशाली पुत्रांनो, विरुद्ध परिस्थितींतही तुम्हीं हा निश्चय करताहांत-तरी तो परममंगल परमेश्वर तुमच्या प्रयत्नांत तुम्हांला यश देवो. रणदेवता तुमच्यासारख्या रणनोवऱ्यांना सोडून दुसऱ्या कुणाला माळ घालील ? सर्व महाराष्ट्र तुमच्या प्रयत्नाबद्दल तुमचा सदैव ऋणी राहील. हे देवी, महिषासुरमर्दिनी, या स्वराज्य-भक्तांना तुझा प्रसाद दे.

**लक्ष्मी**:—( देवीच्या मागून ) यांच्या पवित्र कार्याला एका पाप्याच्या दुष्कृत्यांची झळ लागत आहे-पेशव्याचीं पापं यांना नडत आहेत—

**ठाकुरदासबुवा**:—मग यांनीं काय करावं असं देवी तुझं म्हणणं आहे ?

**लक्ष्मी**:—त्या पाप्याला-त्या दुष्टाला-आधीं स्वराज्याच्या गादीवरून ढकलून द्यावा. त्याशिवाय यांच्या प्रयत्नाचं यांना खरं यश मिळणार नाहीं.

**ठाकुरदासबुवाः**—ऐकलंत ? सरदारहो ऐकलंत ? आधीं रावबाजीला एकीकडे करा म्हणजे विजयश्री तुमची– ( सर्व स्वस्थ. )

**बापूः**—आम्ही स्वराज्याकरितां धडपडतों आहोंत– पण त्याबरोबर आमच्या स्वामिभक्तीला विसरत नाहीं. आमचा स्वामी आणि स्वराज्य यांत आम्ही फरक पहात नाहीं. स्वामिद्रोह करून हें जीवित सुखी ठेवण्याची आम्हीं केव्हांही इच्छा केली नाहीं. " नाविष्णुः पृथिवीपतिः " हेंच खरं. मालकाशीं बेमान होऊन मिळालेलं यश आम्हांला नको आहे.

**सर्वः**—होय, बापू म्हणतात तेंच बरोबर.

**लक्ष्मीः**—मग जा तर भवितव्यतेप्रमाणं काय व्हायचं असेल ते होईल.

**ठाकुरदासबुवाः**—शाबास, सरदारहो, स्वामिभक्तांचा सदैव जयजयकार होईल. काळजी करूं नका. परमेश्वरावर भार ठेवून आपल्या कार्यास लागा. या–या आतां. ( सर्व वंदन करून जातात. लक्ष्मी पुढें येऊन ' हाय हाय ! काय ही अंधभक्ती ' म्हणून मूर्च्छित पडते. )

---

## प्रवेश तिसरा.

**ठाकुरदासबुवाः**—( जंगलरस्त्यावर प्रवेश करून ) हाच नव्या आणि जुन्या संस्कृतींमधील विलक्षण फरक—! अनंत शतकं ज्ञात जगावरचा पुढारीपणा असलेले आम्ही पूर्वेकडील लोक, पश्चिमेकडून एकामागून एक आलेल्या या लोकांच्या आहारीं जातोंत कसे ? तर त्यांच्या आमच्या संस्कृतींत फरक म्हणून. आमची संस्कृति कोणत्या तरी लोकोत्तर पुरुषाविषयीं अंधश्रद्धामग्न असलेली आणि यूरोपीय संस्कृति सार्वलौकिक आपलेपणानं संघशक्तियुक्त असलेली ! अर्थात् संघशक्ति ही कांहीं काल तरी आतां यशस्वी होणार खास. राजसत्ता ही व्यक्तिक आणि लोकसत्ता ही सार्वलौकिक. आतां ह्या नवयुगाच्या प्रारंभींच

राजसत्ता आणि लोकसत्ता यांची झटापट सुरु झाली आहे. आणि अनेक शतकं कालाबरोबर झगडून झगडून थकली भागलेली राजसत्ता या ताज्या दमाच्या लोकसत्तेला कांहींकाल तरी हार जाणार खास. कालाचा चक्रनेमिक्रम हा सदैव चालला आहेच. तेव्हां पुनः केव्हां तरीं राजसत्ता या लोकसत्तेला पराभूत करणारच. सारांश काय, कीं पेशवाई बुडालीच तर त्याला निमित्त मात्र रावबाजी आणि त्याच्यामुळं भिक्षुक लोक असले तरी खरं कारण या नव्या जुन्या संस्कृतींचा सरसनीरसपणाच आहे, यांत शंका नाहीं. राजसत्तेचीं पाळंमुळं आज इतक्या कालाच्या संस्कारामुळं आमच्या मनोभूमिकेमध्यें इतकीं रुजलीं आहेत कीं, राजाशीं बेमान होणं म्हणजे स्वामिभक्तीला कालिमा लावणं होय,—अशी आमची दृढभावना होऊन बसली आहे. राजाच्या चुकीचा परिणाम लोकांना भोगावा लागतो, इकडे आमचं लक्षच नाहीं. तसं असतं तर स्वराज्याच्या गादीची हेटाळणी करणारा—बेअब्रू करणारा—फार काय पण तिचा अंतही करूं पाहणारा हा रावबाजी या शूर सरदारांच्या शस्त्रांस केव्हांच बळी पडला असता-आणि स्वराज्यावरच्या संकटाचा एक गड्डा आधीं निकालास लागला असता. पण "नाविष्णुः पृथिवीपतिः" हें सूत्र पदोपदीं आड येत आहे. हे विलक्षण घडामोड करणाऱ्या काला तुला अनंत प्रणाम असोत. (जातो.)

---

## प्रवेश चवथा.

स्थळः—पर्वतीची गच्ची.

(बाजीराव, गहेनाजी आणि दोघे हुजरे. दुर्बिणींतून लढाई पहात आहेत असा देखावा.)

**गहेनाजीः**—( दुर्बिणींतून पहातां पहातां) सरकार, दोहींकडल्या तोफांचा आराबा पडला, आपलं पायदळ मुंग्यांच्या हारीप्रमाणं पसरत चाललं. तीं पहा टेकडीकडल्या बाजूस टोपीवाल्यांचीं लालभडक तुरपं—

**बाजीराव**:—वा: फारच मौज दिसते बुवा. गहेनाजी, पहा ते आपले स्वार मैदानांत आले. आणि हो, बापू-मोर दीक्षित, गणपतराव, सारे सरदारही आले हां-( तोफांचे बार ) अरे बापरे ! ( घाबरतो. ) झाली वाटतं सुरू लढाई हां—! केवढा हो धूर हा-! आपल्याच तोफा सुटताहेत बरं का-!

**गहेनाजी**:—हा कडाखा सगळा आपल्या परवांच पुरंदराहून आणलेल्या त्या महांकाळीचा —! हा! हा! पानशांची कोण घाई उडाली आहे.

**बाजीराव**:—गणपतराव मोठा हिमतीचा माणूस. खरा स्वामिभक्त. त्याच्या सरंजामाबद्दल एवढं प्रकरण वाढलं तरीपण त्यान कांहीं एक किल्मिष मनांत धरलं नाहीं.

**गहेनाजी**:—ओहो ! आपल्या तोफांमुळं टोपीवाल्यांच्या तुरुपांची काय गाळण उडाली पहा ! ( तोफांचे आवाज ) हा पहा त्यांचाही तोफखाना सुरू झाला सरकार. ( बाजीराव घाबरतो हें पाहून ) सरकार, असे घाबरू नका. आज फत्ते आपली आहे. ( तोफांचे आवाज. बाजीराव घाबरत असतांनाही गहेनाजी दुर्बिणींतून पहातो. ) अरेरे! डाव्या बाजूचा आमचा तोफखाना बंद कां बरं पडला-? अरेरे! नारायणराव बक्षीच्या पुढचे गोलंदाज तर कपाळावर हात मारून घेऊं लागले ! महाराज- दारूचे बोधचे बोध ओतताहेत—पण कां बरं-? अरेरे ! बत्ती दिली तरी दारू पेटच घेत नाहीं.

**बाजीराव**:—( घाबरून )पानशे कुठं दिसतात काय ?

**गहेनाजी**:—ओहो -! त्या आंब्याच्या झाडाखालीं खालीं मान घालून उभे आहेत. त्यांची जर्दी घोडी जवळच पडली आहे (पाहून) आमच्या तोफा मागं ओढल्या हां— ! ते पहा आपटे—विंचूरकर, पुरंदरे, एकच मांड उठली ! बापूंचे-ही घोडे सुटले पहा— ! महाराज—पहा-पहा-टोपीवाल्यांची धांदल-! त्यांचा तोफखाना तो पहा खडकीकडे भरधांव निघाला—! आलीं पलटणं पुढं आलीं— ! तो पहा पोट साहेब—!

**बाजीराव**:—( घाबरून ) जरीपटका कुठं आहे बरं- ?

**गहेनाजी**:—अगदीं बापूंच्या पाठोपाठ चमकत आहे-! महाराज, बापूंनीं येरवड्याची टेकडी आटोपली हां ! शाबास- शाबास— ! ह्या पहा रुपरा-मजींच्या परदेशी पलटणी एकदम उठल्या—आणि ती पहा पलीकडे सरकार

हजारों तरवार चमकते आहे—ते मोहनगीरबुवांचे नंगे गोसावी बरं--? (पडद्यांत हरहरमहादेव— सेंटजॉन— अशा आरोळ्या आणि अनेक बार.) हातघाई सुरू झाली वाटतं—

**बाजीरावः**--मला मोठी चिंता पडली आहे. गहेनाजी एक एक बार निघाला म्हणजे जीव कसा धस्स होतो. उगीच लढाई हवी कशाला ? मी जाऊन भेटतों अलिफ्न्स्टनाला आणि सांगतों, कीं वृथा रक्तपात करण्याचं कारण काय ? (इतक्यांत एक शिपाई येतो.)

**शिपाईः**—सरकार, बेटावरून एक शिपाई आला आहे.

**बाजीरावः**—जा—जा—लवकर घेऊन ये. साहेबाकडून आला असावा वाटतं-! आलाच हा-( शिपाई येतो त्यास ) कोणाकडून आलास ? काय काम आहे ?

**शिपाईः**—मी बेटावरून साहेबाकडून आलों आहें. साहेब म्हणतात, एवढा फिसाद होण्याचं कारण काय ? तुमचं आमचं कधीं भांडण झालं नाहीं, तेव्हां आपलं सैन्य माघारं बोलवावं. आम्हीसुद्धां आपली फौज मागं घेतों—असं साहेबांचं म्हणणं आहे.

**बाजीरावः**—बरं आहे. विश्रामा, खालीं जाऊन देवढीवरून जवान धाड, कीं बापूला म्हणावं मागं या—

**एक स्वारः**—( प्रवेश करून ) सरकार, आपल्या पायाच्या पुण्याईनं टोपीवाला खडकी गांवांत कोंडला गेला. आपल्या सैन्यानं त्याला अगदीं त्राहि त्राहि करून सोडला आहे—!

**बाजीरावः**—जा—जा— तूंही जा-— बापूंला म्हणावं मागं या—( स्वार जातो. )

**गहेनाजीः**—थांबावं सरकार. इतकी उतावळी कां ? हा निरोप खरा कशावरून ? मी तपासतों बघा. ( शिपायास ) तुझं नांव काय ?

**शिपाईः**—महादू रामजी,

**गहेनाजीः**—तूं कुठं राहतोस ?

**शिपाईः**—येरवड्यास—

**गहेनाजीः**—तूं आलास तेव्हां साहेब काय करीत होते ?

मालिक शाखा

शिपाई:—निजले होते ?

गहेनाजी:—निजले होते ? इकडे लढाई चालली असतां—साहेब निजले होते—?

शिपाई:—नाहीं नाहीं, लिहित होते.

गहेनाजी:—मग तुझ्यापाशीं चिठी दिली नाहीं ती.-?

शिपाई:—ते लढाईवर गेले होते—

गहेनाजी:—( त्याचा गळा धरून ) हरामखोरा, खरं सांग-तुला कोणीं पाठविलं तें-?

शिपाई:—( घाबरून ) बाऽऽळाजीऽऽपंतानं--

बाजीराव:—अरेरे—! मीं निरोप उगीच पाठविला—विश्रामा,-विश्रामा-जवान पाठविलास ?

विश्राम:—होय सरकार—

बाजीराव:—मग आतां धाड दुसरा. ' नको '' नको ' म्हणावं. लवकर—लवकर—पाठीव.

गहेनाजी:--विश्रामा—दे याला तटावरून खालीं फेंकून-( त्याला नेतात. )

बाजीराव:—नको हो—साहेब रागावेल.

गहेनाजी:—आतां साहेबाच्या बापाचं आम्ही काय लागतों. ( इतक्यांत पड्यांत बार. '' मोर दीक्षित पडले, नारायणराव बक्षी मेले. बापू गोखले देखील धरून नेले. पेशव्यांची फौज उधळली. इंग्रज आले. धांवा धांवा दुकानें बंद करा '' असा एकाच हलकल्होळ उडतो. )

बाजीराव:--गहेनाजी, पहा-पहा-बरं काय झालंय तें. हें पहा मी जातों दिव्यांच्या घाटानं सासवडावरून माहुलीला. बापू आले ह्मणजे त्यांनाही म्हणावं या. ( त्यांना धरुन नेल्याची आरोळी. बार ) खरं का हो हें-? त्यांना खरंच का धरून नेलं असेल ?

गहेनाजी:—सरकार, आपण स्वस्थ असा. उगीच धीर सोडूं नका. आपण इथून हालल्यावर पुण्याचे हाल कुत्रा तरी खाईल काय—? मी हा येतोंच खरी स्थिति काय आहे ती पाहून. कदाचित् ही आवई त्या बाळाजीनंसुद्धां

उठविली असेल. ( हुजऱ्यांस ) सरकारास संभाळा रे, मी हा पहा आतां आलोंच. ( बार. )

**बाजीराव**:--( घाबरून ) अरे बापरे-! आलेच वाटतं हे इकडे-! जा रे जा तुम्ही-आधीं ३।४ शें मशाली लावा. मला नाहीं इथं आतां धीर धरवत.

१ **हुजऱ्या**:—सरकार- लढाईत हे बार चालले आहेत. घाबरण्याचं कांहीं एक कारणं नाहीं. ( बार )

२ **हुजऱ्या**:—आपल्या केसालाही धक्का लागणार नाहीं सरकार.

**बाजीराव**:—तें सारं खरं रे- (बार) पण जा —जा तुम्ही आधीं इथनं-कराच आधीं ताबडतोब निघण्याची तयारी— ( ते नाइलाज म्हणून जातात. ) कुठला या बापू वगैरेंच्या नादीं लागलों असं झालंय मला.( बार ) अरे—अझून नाहीं का झाली तयारी ! काय गैदी लोक हे— ! सारे लेकाचे माझ्या जिवावर उठले आहेत- ! ( शिपायांस हांक मारतो. ) अरे विश्रामा—ए रामा—अरे विसाजी- हे शिंचे सारे गेले कुठं-

**वाराणसीबाई**:— ( प्रवेश करून ) काय झालंय असं-! लढाईत तर म्हणतात आमचाच जय आहे. ( बार )

**बाजीराव**:—आग लागो त्या जयाला—( बार ) चला—चला-जा तुमचीही निघण्याची तयारी करा !

**वाराणसीबाई**:--उगीच तें कुठं जायचं —? ( पडद्यांत पूर्वोक्त गलबला. )

**बाजीराव**:—ऐकलंस-!इंग्रज आले ! आतां काय करावं—जा, जा लवकर, निघण्याची तयारी कर.

**वाराणसीबाई**:—काय करावं बाई या अशा स्वभावाला— ! सगळं जग हंसेल बरं अशानं— ! लढाई चालली म्हणजे असं व्हायचंच—( बार )

**बाजीराव**:—अग पुरें पुरें तुझं ब्रह्मज्ञान. जा— आधीं चालती हो—का घालूं कांहीं टाळक्यांत— ( ती खिन्न होऊन जाते. बार ) अरे-अझून नाहीं कारे मशाली पेटल्या ? ! ( बार ) तें कांहीं नव्हे— मीच आपला सज्या स्वारीनिशीं पुढं होतों कसा,(जाऊं लागतो इतक्यांत लक्ष्मी दृश्य होते. )

**बाजीराव**:--( घावरतो. ) कोऽऽण— ?

**लक्ष्मी**:—बाबासाहेब, मला ओळखलं नाहींस–? गंगाधर शास्त्र्याच्या लेकीला—या लक्ष्मीला विसरलास काय ? कुठं आहेत ? त्या तुझ्या अष्टनायका कुठं आहेत ? सुखाच्या वेळच्या साऱ्या. ( बार ) कां, असा घाबरतोस कां ?

**बाजीराव**:—मला मारणार का आहेस तूं– ? लक्ष्मी, हे बघ–माझे अपराध पोटांत घाल आणि मला जायला वाट दे. ( बार )

**लक्ष्मी**:—कुठं निघालास– ?

**बाजीराव**:—दिव्याच्या घाटाकडे —अरे अजून नाहीं कारे मशाली पेटल्या ?

**लक्ष्मी**:—नुसत्या मशालीच काय– सगळी पेशवाईच आतां पेटली आहे. बाजीराव, एवढ्या मोठ्या दौलतीचा मालक तूं– कांहींतरी शरम धर. अरे एकदां पुण्यांत इंग्रज घुसले तर–( बार )

**बाजीराव**:—नको– नको— मला हें राज्य नको नी ही दगदग नको!

**लक्ष्मी**:—नको ना– ? मग पळतोस कशाला ? सारे सरदार बोलाव–सातारच्या श्रीछत्रपतींना बोलाव– आणि पंतप्रधानपदाचीं वस्त्रं परत दे. म्हणजे त्यांची ते वाटेल ती व्यवस्था करून घेऊं देत. असा पळून गेलास तर अपेशाला मात्र धनी होशील ! तुझ्याकरितां म्हण अगर पेशवाईकरितां म्हण– आज बापू गोखल्यासारखे हिरे चमकताहेत. त्यांच्या श्रमाची, त्यांच्या स्वामिभक्तिची अशी माती करूं नकोस.— (बार )

**बाजीराव**:—कंटाळलों– कंटाळलों मी या उपदेशाला— ( पळून जाऊं लागतो—लक्ष्मी हात धरते. )

**लक्ष्मी**:—अरे भ्याडा– या लक्ष्मीच्या रूपांत पेशवाईची लक्ष्मी तुला पळून जाऊं नको म्हणत आहे हें लक्षांत आण आणि धीर धरून उभा रहा. ( तो झटापट करून जातो. लक्ष्मी ' हाय हाय ' करीत पडते. )

[ पडदा ]

## अंक चवथा समाप्त.

— —

# पेशवाई.

## अंक पांचवा.

### प्रवेश पहिला.

**स्थळ:**—पुणें इंग्रजी छावणी—बेटावरचा बंगला.

**एल्फिन्स्टन:**—पहा रॉबर्टसन–याप्रमाणं हें मोठं काम तर उरकलं. नामदार कंपनीचा दक्षिणेंतला अति मोठा कांटा-आज उपटून निघाला–पुणं सोडून पळून गेला, हें आयतंच आपल्या पथ्यावर पडलं. आतां त्याचा पाठलाग करण्याच्या आधीं हें शहर पुन: त्याच्या तावडींत न सांपडेल, अशी खबरदारी घेतली पाहिजे. बाकी आपल्याला यांच्या सैन्याचा दम समजला. पण पुणं जर का पुन: कबजांतून जाईल, तर सगळी मसलत फसली म्हणून समजा. पेशव्याखेरीज इतर कोणी सरदार चालून येईल असं होणार नाहीं. कारण सर्वांस त्यानं डंवचून सोडलं आहे, आणि दरएक थोरा मोठ्या कुळाची हुर्मज घेण्याचा त्याचा भारी तडाखा. त्यामुळं हे पटवर्धन, रास्ते वगैरे लोक विरुद्ध आहेत. झालेल्या गोष्टीबद्दलची हकीगत मुंबईला लिहून धाडलीत ? केव्हां ?

**रॉबर्टसन:**—केव्हांच. रात्रीं मशाली लावून स्वारी पळाली, त्या उजेडांत च लिहून ॲड्ज्यूटंट टॉम्सन् याला खुद्द धाडलें आहे. व आणखी लोक पाहिजेत म्हणून लिहिलं आहे.

**एलिफन्स्टन**:—वा: ! हें फार बरं केलं. आतां जनरल स्मिथला पाठवितों बाजीरावाचे पाठीवर, आणि तुम्ही असा शहर संभाळून.

**रॉबर्टसन**:—मला या शहराची बिलकुल माहिती नाहीं. लोक वगैरे सर्वच अपरिचित.

**एलिफन्स्टन**:—त्याची काळजी नको. त्याबद्दल मी एकाची सोय करून ठेविली आहे. वसईच्या तहापासून आत्तांपर्यंत आमची घडी सारखी बसावी, यासाठीं तो सद्गृहस्थ फार झटला आहे. पेशव्यानं त्याच्या माणसांना सतावलं म्हणून तो आमच्या बाजूस आला. खरोखरच बिनमोल माणूस. कालच्या लढाईच्या ऐन रंगाच्या वेळीं बापू गोखले परतला, तें कारस्थान त्याचंच. कुंपनी सरकारचं राज्य व्हावं अशी त्याची फार खटपट. माणूस कांहीं बदफैली नाहीं. एक अंगवस्त्र आहे-पण त्याचा उपयोग त्यानं पेशव्याच्या अंतरंगांतली माहिती काढण्याकडे केला-थोडा पैशाचा लोभी आहे.—पण त्याबरोबरच अल्पसंतुष्ट आहे. आज सारं पुणं आपल्याकरितां त्यानं चकविलं आहे.

**रॉबर्टसन**:—काय बरं त्याचं नांव—?

**एलिफन्स्टन**:—त्याचं नांव बाळाजीपंत. ( शिपायास बोलावतो ) बाळाजीपंतांना बोलाव. ( बाळाजीपंत येतो त्यास ) या बसा असे दूर दूर कां ? अहो तुम्ही तर आमचे परम दोस्त. आजवर संभाळलंत-तसं या रॉबर्टसन साहेबांना संभाळून घ्या. ( दोघांचा शेकहँड होतो. ) तूर्त पुणें शहरची व्यवस्था यांच्याकडे दिली आहे.

**बाळाजीपंत**:—कांहीं हरकत नाहीं.

**एलिफन्स्टन**:—बरं तर रॉबर्टसन या आतां. ( तो जातो ) काय बाळाजीपंत, काय नवल विशेष ? रात्रीं कांहीं गडबड झाली काय ?

**बाळाजीपंत**:—कांहीं विशेष नाहीं. आमच्या योजनेप्रमाणें बापू गोखल्याला पेशव्यांचे निरोपावर निरोप जाऊन ते परतले, ते थेट पर्वतीला गेले; पण तेथें होतं कोण ? पेशवा गेला दिव्याच्या घाटाकडे दिवे लावायला ! बापूंनीं पर्वतीचं दर्शन घेतलं आणि आपल्या मारुतीला लागलींच तिकडे दावला. बिचारा आपल्या घरीं सुद्धां गेला नाहीं.

**एलिफन्स्टन**:—तसाच एकनिष्ठ आणि शूर आहे तो. कालच्या लढाईत तो

खरोखरच आम्हांला साफ तोंडींत होता. पण बाळाजीपंत, तुमच्या योगानं आमचं यश राहिलं.

**बाळाजीपंतः**—छेः ! छः ! असं कसं म्हणतां– ! आपला पुण्यप्रतापच तसा. आपल्यां बाजूला न्याय– तेव्हां आपणांलाच जय मिळणं हेंच योग्य. खरोखरच आपलं राज्य आम्हांवर चिरकाल चालो.

**एल्फिन्स्टनः**—आमचे सरकार आपले उपकार विसरणार नाहीं. कालचे लढाईची हकीकत मुंबईस लिहून कळविली आहे. त्यांत तुम्हांला कांहीं गांव वंशपरंपरेनें मिळावेत अशीही मागणी केली आहे. परवानगी आली कीं त्यांच्या सनदा आम्ही तुम्हांला मोठ्या समारंभानें देऊं. काय हो बाळाजीपंत, काल त्यांच्या दारूगोळ्याची तर अगदींच दैना दिसून आली. भिवा हवलदारानं केली वाटतं ती ?

**बाळाजीपंतः**—वेळ अनुकूल म्हणून सर्व कांहीं सुसूत्र जमून आलं. ती सारी मंडळी साहेबांच्या दर्शनास आली आहेत.

**एल्फिन्स्टनः**—होय का ? बोलवा बरं त्यांना—( ते तिघे येतात ) कोण हो तुम्ही ?

**पहिलाः**—मी भिवा हवालदार साहेब !

**एल्फिन्स्टनः**—हवालदार कुणाचा ? आमचा कीं पेशवे सरकारचा ?

**भिवाः**—हा– हा–! आतां आपलाच आहे–सरकार ?

**एल्फिन्स्टनः**—अस्सं–! काय केलंत तुम्हीं—?

**भिवाः**—पानशांच्या साऱ्या दारूंत बाजरी मिसळली–साहेब—

**एल्फिन्स्टनः**—बरं–उभा रहा–एके बाजूस. तूं कोण ?

**दुसराः**—मी दाऊदभाई भुसारी, साब—

**एल्फिन्स्टनः**--तुझा धंदा–?

**दाऊदभाईः**—पहिला भुसाचा व्यापारी—आतां धान्याचा व्यापार करतों, साब—

**एल्फिन्स्टनः**—तुमचं दुकान कुठं होतं—? आमच्या हद्दींत ?

**दाऊदभाईः**—नाहीं साब, समदा व्यापार पेशवे सरकारच्या हद्दींत, साब—

**एल्फिन्स्टनः**--तुम्हीं काय केलंत–?

**दाऊदभाई**:--मोदीखान्याजवळ दुकान घेऊन तिथं धान्य भरलं आणि तें भुयारांतून नेऊन दारूंत मिसळलं साव—

**एलिफन्स्टन**:—वा: ! शाबास—? तिसरे तुम्ही हो कोण ?

**तिसरा**:—माझं नांव आप्पाजी, बापाचं नांव रावजी, उपनांव मोडके, जात ब्राह्मन.

**एलिफन्स्टन**:—ब्राह्मण !

**तिसरा**:—शिरिमंत नी आम्ही कोपरगांवांत एके ठिकानीं खेळलेले, बसलेले—उठलेले—

**एलिफन्स्टन**:—तुम्ही ब्राह्मण ना ? मग तुमची भाषा अशी कशी ?

**तिसरा**:—आम्ही येजुर्वेदी ब्राह्मन. आमाला सूद बाशा नाहीं येत. गाडीचे काय आमी लिवनं शिकलों हाव ?

**एलिफन्स्टन**:—तुम्हीं काय केलं—?

**तिसरा**:--आमी नी दाऊदभाई दोघांनीं मोदीखान्यापाशीं वखार बांधली आन् दारूमंदीं बाजरी मिसळलीन् काय ?

**एलिफन्स्टन**:—अस्सं-! बाळाजीपंत, यांना बक्षीस देऊं म्हणतां ?

**बाळाजीपंत**:—हें का मीं सांगायला पाहिजे. साहेबांनीं कडीं, तोडे, शेला, पागोटीं द्यावीं—

**एलिफन्स्टन**:—चुकताहांत तुम्ही-! आमचं न्यायशास्त्र या लोकांच्या बाबतींत फार कठोर आहे. आमच्या दृष्टीनं हे लोक राजद्रोही म्हणजे भयंकर अपराधी आहेत. केवळ कडीतोड्यांकरितां हे पेशव्यावर उठले, तसे हे उद्यां आमच्यावर उठणार नाहींत कशावरून-? ( एक पुस्तक उघडून ) हें पहा तुमचं धर्मशास्त्र काय सांगतं तें. शुक्रनीतींत म्हटलं आहे कीं—अशांना राष्ट्राच्या बाहेर घालवून द्यावं अगर बेड्या घालून किल्ल्यावर टाकून द्यावं. आमच्या कायद्यानं तर यांना देहांत प्रायश्चित्तच मिळालं असतं. आतां तुमच्याकरितां मी यांना जीवदान देतों व पुरंदरावर तुरुंगांत पाठवितों. कोण आहे रे ? ( शिपाई येतो त्यास ) यांना बेड्या ठोकून पुरंदरावर पाठवून दे ( नेतात. ) बाळाजी कष्टी होऊं नका. आम्हांला न्यायाची गोडी आहे.

( पडदा )

## प्रवेश दुसरा.

**स्थळः**—पुणें, शनवारवाड्यापुढील पटांगण, लोक जमताहेत.

**१ लाः**—एवढं मोठं राज्य- पण काय हो चुटकीसरशीं गेलं !

**२ राः**—हें सारं कारस्थान बाळाजीचं बरं.

**१ लाः**—अहो, हळू बोला. उगीच नाहीं ती बदलाम यायची.

**३ राः**--आपलीच सद्दी संपली— उगीच दुसऱ्याला बोल कां लावा ?

**१ लाः**--अरेरे ! अहो हे पहा- इकडून हे स्वार आले.

**२ राः**--अरे, पण त्यांत तो हरामखोर बाळाजी आहेच.

**१ लाः**--अरे ए बाबा, पुरें कर कीं आतां ! कां उगीच संकटाला बोलावतोस ?

**३ राः**—हे सगळे, वाड्यांत जातात वाटतं—!

**बाळाजीः**—( प्रवेश करून जाहिरनामा वाचतो. ) " तमाम लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं, रावपंडित प्रधान बाजीराव बाबासाहेब यांनीं नामदार ईस्ट इंडिया कुंपनी सरकार बहादुर यांच्या आश्रयावर आजदिन पावेतों १५ वर्षे राज्य केलें एवढ्या कालांत तमाम सरदार, संस्थानिक, जहागिरदार यांचीं वतनें, जहागिरी, मुलुख, प्रांत, गड, किल्ले वगैरे अन्यायानें खालसा केलीं. राज्यांत बहुत अनर्थ झाले. पेंढारी, पुंड, पाळेगार, लुटारू वगैरेंनीं घाटमाथा व कोंकणपट्टी यांत प्रळय मांडला. दिवसां राज्यांत दरोडे पडूं लागले, खून होऊं लागले, लोकांचीं जीवितवित्तें सुरक्षित राहीनाशीं झालीं, अनाचार बहुत वाढला, याच्या कागाळ्या विलायतेंत नामदार कुंपनी सरकारच्या कानापर्यंत गेल्या. तेव्हां या समस्त गोष्टींचा जाबसाल सर्व पंडित यांस पुशिला असतां तिकडे दुर्लक्ष करून राज्यांत रयतेचे कल्याणाची अनास्था केली. इतक्यांत त्यांचे सल्ल्यानें म्हणा किंवा कोणत्याही कारणांनीं मुक्काम पंढरपूर येथें कुंपनी सरकारचे परम दोस्त सेनाखासखेल गायकवाड सरकार यांचेकडून आमचे मार्फतीनें पेशव्यांच्या दरबारांत मिस्टर गंगाधरशास्त्री पटवर्धन दिवाण बहादुर आले होते, त्यांचा घात झाला. त्याची पूर्ण व बारीक चौकशी केल्यावर

त्रिंबकजी डेंगळे मूळ अदावतीला कारण झाले. ही आगळिक झाली असून पेशवे ह्यांनीं त्यांला पाठीशीं घाळून ज्या बहादुर कुंपनी सरकारनीं त्यांना राज्य-स्थानीं आणून स्थापलें त्यांवर परतोन उठले असतां ईश्वराचे कृपेनें असत्पक्षाचा मोड होऊन पंडित प्रधान हे जागा सोडून पळत सुटले आहेत. तेव्हां पुढें दुसऱ्या व्यवस्था होई तों भीमा आणि नीरा यांच्या मधचा सर्व मुलुख कप्तान हेन्री दंदास रॉबर्टसन् साहेब बहादुर यांच्या बंदोबस्ताकडे दिल्हा आहे. त्यांत न्यायमनसुबी निवडणें, जाब जाबसाल लिहिणें, वसूल बाकी गोळा करणें इत्यादि संपूर्ण कामें त्यांच्यावर सोंपविलीं आहेत. यांत कोणाची तसनस होणार नाहीं. कोणाची जहागीर, सरंजाम आदिकरून यांस तिळप्राय धक्का लागणार नाहीं, लोकांनीं पूर्ववत् चालावें. पेशवे सरकारचें राज्य अभिलाष करण्याची मुदलींच नामदार कुंपनी सरकारास इच्छा नाहीं. परंतु धनी एका-एकीं शहर, राज्य टाकोन गेले, तेव्हां अनाथांचें पाळण करणें हें कुंपनी सर-कारचें ब्रीद आहे. यास्तव नगरवासी जनहो, भिण्याचें कांहीं कारण नाहीं. 'गेले ते इंग्रज आणि राहिले ते पेशवे' असेंच सर्वांनीं समजावें व आज-पासून पंडित प्रधान बाजीरावसाहेब यांची द्वाही व नामदार आनरेबल ईस्ट इंदिया कुंपनी सरकार यांचा हुकूम मान्य करीत जावा. मिति कार्तिक शु॥ ९ रोज सोमवार शके १७३९ ईश्वरनाम संवत्सर तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १८१७ इसवी.''

गव्हर्नर जनरलचे हुकुमावरून,

**मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन.**

**१ ला प्रेक्षकः**—जाहीरनाम्यांत फार चांगलं सांगितलं आहे, नाहीं ?

**२ रा प्रेक्षकः**—इंग्रज म्हणतात 'आम्हांला राज्याचा अभिलाष नाहीं,' असं कोण बरं म्हणणार आहे ?

**१ ला प्रेक्षकः**—एकूण श्रीमंतांना पुनः गादीवर बसविणार तर ?

**३ रा प्रेक्षकः**—कशाला पुनः श्रीमंत गादीवर ? अनाचाराचीच पुनः भर ना ? मला तर वाटतं बुवा. हेच राजे असावेत. बेटावरच पहा बरं; त्यांच्या राज्यांत कसा न्याय आहे तो—

**२ रा प्रेक्षकः**—बाजीरावसाहेब पुनः गादीवर आणतील ही गोष्टच बोलूं नका. एकदां उपटलेला वृक्ष पुनः लावतील तरी कसा ?

**१ ला प्रेक्षकः**—तुमचं तुम्ही तुमच्या मनांत कां हो ठेवाना ? उगीच नाहीं तो त्रास शिंचा ? पेशवाई काय नी इंग्रजशाही काय ? आम्हांला थोडंच कोण हत्तीच्या गंडस्थळावर बसविणार आहे ? वारा वाहील तशी पाठ दिली म्हणजे झालं.

**३ रा प्रेक्षकः**—एवढे होता पेशव्यांचे अभिमानी, तर कां गेला नाहीं मरायला खडकीस ? चालले— ! उचलली जीभ नी लावली टाळयाला !

**१ ला प्रेक्षकः**—हो पण–आतां बाळाजीपंत काय करतात पाहूं.

**२ रा प्रेक्षकः**—मरेना हरामखोर–

**३ रा प्रेक्षकः**--उगीच भलतं सलतं बोलूं नका हं– पीडा होईल.

( वेशीपुढें कदीम शिपाई पहारा करीत आहे. त्याची नी इंग्रज शिपायांची झटापट होते– तो दाद देत नाहीं. असा पडदा उघडतो. )

**बाळाजीः**--(पुढें होऊन ) अरे कदीम, उगीच कां भांडतोस ? जाऊं दे त्यांना आंत. अरे बाकीच्या सगळया वाड्यांत इंग्रजांच्याच चौक्या बसल्या, सगळया देवळांत आणि मशिदींत सुद्धां सामानाची मोजदाद होऊन इंग्रजांचे चौकीवाले बसले. अरे सगळीकडचे– कोतवालचावडीवरचाही भगवा झेंडा खालीं काढून त्या ठिकाणीं इंग्रजी बाव्हटे चढले. आणि इथंच कां तूं आडवितोस ?

**कदीमः**—अरे जारे बम्मन– ! मैने आजतक शिरिमंत पेशवाका निमक खाया है. उन्का होकम मुझे चाहिये. बाद बेफिकर उपर चढो, क्या तुमारे पास उन्की इजाजत है ? अगर नही है तो मै किसू तऱ्हासे तुझे जाने दो ?

**बाळाजीः**—अरे वेड्या, तुझे सरकार तर केव्हांच पळून गेले. अरे आतां इंग्रजांचं राज्य आहे, बरं का ?

**कदीमः**—खबरदार ! एकदफा बोला बस्स ? जिस तिसनें आपना काम संभाळना. तुमारा काम फकत् कलम घासनेका है. और कामसे तुझे मतलब नहीं. ( तलवार परजून ) मेरा काम इस तरवारसे है. उन्का परवानगी लाव, पीछे अंदर जाव.

**बाळाजी**:—अरे, काल खडकीवर लढाई झाली– माहीत नाहीं का तुला ?

**कदीम**:--मुझे सब् मालुम है.

**बाळाजी**:—अरे, त्यांत बापू गोखले वगैरे सगळी मंडळी पळून गेली.

**कदीम**:—अब् देखो तूं यहां ऐसी बकबक मत करो. खबूरदार, हम किल्ला खालीं नहीं करेंगा.

**बाळाजी**:—( मनांत ) हा असा वळणार नाहीं. याला युक्तीयुक्तीनंच घेरला पाहिजे. ( आपल्या शिपायांस एकीकडे ) जारे, तुम्ही जरा दूर उभे रहा, खूण केली कीं या. ( ते दूर होतात. )

**कदीम**:—बम्मन तूं किस्लीये इदर खडा है ? तमाम लोक आपआपने काम-पर गये है. तुभी क्यंव नहीं जाता ? तुने जो साहेब लाया है उन्से मै नही डरता. ऐसे हजारों बखत मुझपर गुजेर है. लेकिन मेरी इस जिंदगीमें मैने कभी शिकस्त नाहि खायी.

**बाळाजी**:—खरोखरच तसा तूं शूर आहेस.कुठं कुठं बरं असे वख्त आले ?

**कदीम**:-दिल्लीमें सिंदिये सरकारके मेहेलपर मै निगेहेवान था. उस् वख्त कई लोगने आफवा उठाई के दरबारमे गुलाम कादरने सिंदियेका कत्तल किया. बाद मुझको हजारों अदमीओसे लढना हुवा. बाद थोडे वखतसे श्री महादजीसाहेब खुद आये. और जब उन्होंनें मुझे लढते देखा, वो निहायत राजी हुवे.और सके इबजमें मुझे एक कंठी और एक तोड और ये समशेर बक्षीस दियी.

**बाळाजीपंत**:—ओ हो, हीच का तरवार ती ? !

**कदीम**:—हां–! ये समशेर, ये. ( दाखवितो. )

**बाळाजी**:—पाहूं बरं, या तरवारीवर जास्त काय आहे ती नक्षी ?

**कदीम**:—हां देखो, इस समशेरपर कैसी उमदी नक्षी निकाली हुई है. ( बाळाजीच्या हातांत तरवार देतो. बाळाजी ती पहात रहातो व डोळ्यानें आपल्या शिपायांस खुणा करतो. शिपाई येऊन मुसक्या आंवळतात ) हाय ! हाय ! बंम-ननें मेरा घात किया. ( बाळाजी वेशीवर चढून भगवें निशाण काढून इंग्रजी तांबडे निशाण लावीत असतां ) अरे, ये हरामखोरकूं कोई ज्यूतेसे मारनेकूं नहीं सकता है क्यारे– ! साले, काय कूं तुम बम्मन हुवे– ? दुष्मनके हात मे आपनी मा देनेकूं तयार हुवे ! आफसोस–आफसोस ! ! !

( पडदा )

## प्रवेश तिसरा

**स्थळ:**—पुणें-मुंबईमधील जंगलरस्ता.

( बापू गोखले, त्रिंबकजी डेंगळे, आबा पुरंदरे, विंचूरकर, गहेनाजी. )

**आबा:**—दैवदुर्विलास म्हणतात तो हा-! खडकीच्या लढाईचं फळ हातीं येणार तर श्रीमंतांना पळ काढण्याची बुद्धि झाली.

**बापू:**--यांच्या पळण्यानं तर मी बेजारलों बुवा. साताऱ्याहून छत्रपती आणले. वाटलं कीं त्यांच्या संगतीनं तरी हे धीर धरून राहतील. पण पळण्याच्या कामांत पेशव्यांच्या पुढें छत्रपतींचा पाय-काय करावं आतां ? !

**आबा पुरंदरे:**—मला वाटतं गहेनाजी, तुम्ही, विंचूरकर आणि रामचंद्रपंत सुभेदार यांनीं रहावं हमेश श्रीमंतांबरोबर. आणि आप्पा देसायांना आपल्याबरोबर घेऊन आपण एक चांगली मातबर लढाई देऊं या. हें पहा सध्यां पुण्याला, आहे रॉबर्टसन-त्याचा फौज फांटा थोडकाच आहे. तेव्हां एकदम अचानक छापा घालूं या आणि आधीं पुणं घेऊ या ताब्यांत.

**बापू गोखले:**--पुणं तर परत घेतलंच पाहिजे. बाबासाहेब पळाले तरी आम्हीं पुणं सोडायला नको होतं.- पण आतां खेद करून काय उपयोग ? पण पुण्याकडे चाललेली ही इंग्रजी फौज आधीं तोडूं या आणि मग रॉबर्टसनचा यथास्थित समाचार घेऊं या

**आबा पुरंदरे**—आहा-! ही युक्ति बरी आहे. त्रिंबकजी, कोणत्या कामगिरीवर तुम्ही रहातां

**त्रिंबकजी:**--वाटेल त्या ! पाहिजे तर पुण्यावर जातों, पाहिजे तर घाटांत राहून इंग्रजांची कत्तल मारतो-पाहिजे असेल तर दुसरी कोणती कामगिरी असेल तर ती सांगा; पण उगीच पळण्याखालीं माझीं घोडीं मारूं नका.

**बापू गोखले:**--असं करूं या- मी, त्रिंबकजी आणि देसाई, तिघेजण या मुंबईच्या फौजेला कोरेगांवावर नदीच्या गळ्यांत आडवितों. आबा, तुम्ही पुण्याकडून त्यांच्या मदतीस कोणीं धांवलं तर त्यांचा समाचार घ्या. विंचूरकर, गहेनाजी, तुम्ही श्रीमंतांना संभाळा. हें पहा या कोरेगांवावरच आपण निर्धाराचा

सोक्ष किंवा मोक्ष करून घेऊं या. वाटेल तें करा आणि श्रीमंतांना पळूं देऊं नका त्यांच्या नि आमच्यांमध्यें शत्रू आला तर आम्ही विजयी होऊनही उपयोग होणार नाहीं; घ्या देवाचं नांव आणि लागा आपआपल्या कार्याला. बोला हर हर महादेव. ( जातात. )

( पडदा. )

---

## प्रवेश चौथा.

---

**स्थळः**—डोंगरकठाडी- एका खडकाच्या आश्रयास उभा राहून दूरवर पहात उभा राहिलेला असा ठाकुरदासबुवा उभा असतां- पडदा उघडतो.

**ठाकुरदासबुवाः**—( स्वगत ) आपलेपणाची जाणीव ही खरोखरच विसरतां येत नाहीं. विधिनेमाप्रमाणं स्वराज्यसूर्य अस्तास जाणार हें भवितव्य मनाला पटलं असतांही- असं होऊं नये अशी मनाची इच्छा बळावी आणि तीमुळं मनाची चलबिचल होऊन जीवाला चैन वाटतनासं होतं. काय करावं या संस्काराला-( एकतारीच्या आवाजांत पद म्हणत असलेली लक्ष्मी येतांना पाहून,) हा आणखी एक दुःखप्रद देखावा. या लक्ष्मीचा या स्वराज्यांत बाप मारला गेला. इची अब्रू या स्वराज्यांत गेली—तरी पण स्वराज्य रहावं म्हणून हिची धडपड—कुठं तो कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ असा बाळाजी आणि कुठं ही लक्ष्मी. त्याला स्वराज्य जाणं हाच पुत्रोत्सव वाटतो, तर इला तें रहाणं हा मोक्ष वाटतो ! खरोखरच जगन्नियंत्या तुझी लीला अतर्क्य आहे.

**लक्ष्मीः**—( प्रवेश करून स्वगत ) स्वराज्याचा रथ एकदां जो घसरणीला लागला आहे-तो पहावं तर जास्त जास्तच वेगानं चालला आहे. बापू वगैरे त्याला मध्येंच आडविण्याचा प्रयत्न करतात; पण या भित्र्या बाजीरावाच्या चंचल वृत्तीची उशी मिळून तो पुन्हां आपला जास्तच वेगाने अधोगतीला लागतो. ( ठाकुरदासबुवास पाहून ) अग बाई, माझी गुरुमाउली तर इथंच आहे. ( वंदन करून ) गुरुमहाराज,

ठाकुरदासबुवाः—लक्ष्मी, इकडे कुणीकडे–?

लक्ष्मीः—स्वराज्याच्या कुंकवाचा धनी जिकडे–तिकडे मी.

ठाकुरदासबुवाः—म्हणजे–बाजीराव या बाजूस आला आहे की काय–? कोरेगांवची लढाई फिसकटली—?

लक्ष्मीः—थेट खडकीचाच प्रकार. बापू, त्रिंबकजी आणि आप्पा देसाई यांनीं इंग्रज कोरेगांवांत कोंडला तर इकडे श्रीमंत वळले पंढरपुराकडे ! काय करावं ? कोरेगांवची लढाई गुरुमहाराज, खरोखरच मातबरीची झाली ! उभयपक्षींही मोठ्या शौर्यानं लढले. क्षणोक्षणीं विजयाचं पारडं खालीं वर होत होतं. जय बापूंचा पण फळ इंग्रजाला, हें सारं त्या बाजीरावामुळं बरं !

ठाकुरदासबुवाः—पण आतां कष्टी होऊन काय उपयोग ?

लक्ष्मीः—गुरुमहाराज, एखाद दुसऱ्या गोष्टीबद्दल अश्रु ढाळायचे आहेत का ? पहावं तिकडे निराशा–त्रिदोष झालेल्या रोग्याप्रमाणं ह्या स्वराज्याची स्थिति खरो-खरंच झाली आहे. केवळ जाईल ती वेळ आपली एवढंच खरं. अशा स्थितींत मलाच काय पण तें पहा आपल्यालासुद्धां दुःख होत आहे. महाराज, बाजीरावाची नालायकी तर आहेच. पण आमच्या लोकांचा अमानुष गुण—

ठाकुरदासबुवाः—अमानुष गुण–! कोणता बरं तो ? !

लक्ष्मीः—आपलेपणाची जाणीव नसण्याचा—तात्कालिक फायद्यावर लक्ष देण्याचा–निव्वळ स्वार्थासाठीं महत्त्वाच्या कार्याचं मूळसुद्धां करपून टाकण्याचा–हा अमानुष गुण आमच्याच लोकांच्या आश्रयाला वाढला आहे. महाराज, ही फितुरी या फितुरीनं सारं निसंतान केलं बरं—

ठाकुरदासबुवाः—फितुरी तर आमच्या लोकांच्या पांचवीला पुजली आहे.

लक्ष्मीः—इंग्रज कोरेगांवांत कोंडला त्याबरोबर बापूंनीं वाघासरशी उडी घेतली. तीव्र इंग्रजांच्या वर्मीं घाय बरं. पण तो कोणीं अंगावर घेतला कळलं का ? श्रीमं-तांच्या विश्वासाच्या त्या भिकार बांकड्यानं. त्याच्या दारासमोर दोन तास नुसती टिपरी झडली. माणसांचा सडा झाला ! आपसांत मारामारी करून मेले मराठे आणि जगले कोण तर इंग्रज. इंग्रजांच्या पलटणी तरी का इंग्रजांच्या जात-वाल्यांच्या आहेत—?

ठाकुरदासबुवाः—आतां हें असंच चालायचं ! लक्ष्मी, स्वराज्य जाणार हें

ग्रंथ संग्रहालय

आतां ठरलंच आहे. पण याचा बेदावा ज्या स्थलावर होणार तें स्थल हें नव्हे. हें श्रीरामदासांचं आनंदवनभुवन आहे या ठिकाणीं स्वराज्याचा बेदावा लिहिला जाणार नाहीं. ती पापी भूमी तापीच्या पलीकडे नागपूर प्रांतांत आहे. तूं आतां तिकडे जा. काय तुझा निर्वाणीचा उपाय असेल तो कर. आप्पासाहेब भोंसलेसुद्धां दुसरा बापू गोखले आहे तूं इकडची काळजी करूं नकोस मोठमोठीं मोहरीं गेलींच आहेत–कदाचित् या पुण्यभूमीकरितां फर्जी ही पतन पावेल. पण अत्यंत लाजीरवाणी अशी प्यादेमात कुठं होणार असेल तर ती तापीच्या पलीकडे. तर तिकडे जा.

**लक्ष्मी:**—गुरुमहाराज, खरंच का शेवटीं हा महाराष्ट्र स्वराज्यास मुकणार ? ( कष्टी होते– ) जातें आतां–पण तसंच जर कांहीं झालं तर या देहानं तरी हे पाय पहाण्याचा योग येणार नाहीं. स्वराज्याची जीवज्योत लयास जाण्याचे आधीं ही लक्ष्मी–ही महाराष्ट्राची लक्ष्मी–ही स्वराज्याची लक्ष्मी–आपल्या देहाची सांडवण करणार. स्वराज्यावांचून मला इतरत्र कुठंही चैन पडणार नाहीं. त्याशिवाय मला जगून तरी काय करायचं आहे ? महाराष्ट्रा, जागा आहेस काय ? अरे तुझं स्वराज्य चाललं–अरे तुझ्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला ठोकण्याची तयारी झाली–तुझी काळनिद्रा नाहीं का संपत–! हाय हाय ! स्वराज्य–स्वराज्य–स्वराज्य ! अखेर स्वराज्य जाणारच आं–! ( जाते. )

**ठाकुरदासबुवा:**—या स्त्रिया म्हणजेच आमच्या जीवज्योती–आमच्या चित्‌छक्ती–यांच्या हृदयाला घरे पडावे हें साहजिकच–पण दिमाखानं सर्व कारभार करणाऱ्या पुरुषांनीं आपल्या मूर्खपणानं वैभवश्रीला असं लाथाडावं हें बरं नाहीं. याचं हें प्रायश्चित्त त्यांना मिळतच आहे– पण त्यांच्या सान्निध्याचीं कटु फळं मात्र माझ्या आवडत्या सीमंतिनींना चाखावीं लागत आहेत. भवितव्यता बलीयसि हेंच खरं. ( बापू गोखले येऊन वंदन करतात. )


**बापू:**—महाराज, या अपराध्याला–या पाप्याला क्षमा करा. रणांतून अपयश घेऊन परत येणं हें माझ्या कधींही स्वप्नांतसुद्धां आलं नाहीं. तें एकदां नाहीं दोनदां नाशिबीं आलं. खरोखरच आम्हीं मुळींच हार खाल्ली नाहीं. खडकीवर काय किंवा कोरेगांवावर काय आमच्या तलवारीचं पाणी आम्हीं इंग्रजांला चांगलंच दाखविलं. पण ऐन निकालाचे वेळीं बाबासाहेब पळ काढतात आणि मग वाड-

विसकटून त्यांच्या पाठोपाठ जावं लागतं. यामुळं माणूस जाया होतं आणि शत्रू बळावत आहे.

**ठाकुरदासबुवाः**—बापू, तुम्ही कष्टी होऊं नका. परमेश्वर तुमचा पाठीराखा आहे. तुम्ही घाबरूं नका. जयपराजय हे तर हातचे मळ आहेत. पूर्वजन्मींचा ऋणानुबंधच असा कीं, तुला बाजीरावासारखा धनी मिळाला, त्याचं पाप तुला नडत आहे. जसा दुष्टबुद्धि दुर्योधन तसा हा बाजीराव–तूं त्याच्या पदरीं अमोल रत्न कर्ण सांपडला आहेस. आतां संसर्गजनित दोष तुला भोगले पाहिजेत, उपाय नाहीं. जीवित हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणं आहे. अशा बिकट स्थितींतही तूं एकनिष्ठ स्वामिसेवा करून स्वराज्याकारितां लढतोस याबद्दल तुझी कीर्ति अजरामर राहील. तूं आहेस तोंपर्यंत हें स्वराज्य जात नाहीं हा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. बाकी हें लक्षांत ठेव, कीं तुमचा हा कौरवपक्ष आहे आणि इंग्रजांचा पांडवपक्ष आहे. विषाद करण्याचं मुळींच प्रयोजन नाहीं. ( तोफांचे आवाज. )

**शिपाईः**—( प्रवेश करून ) सरकार, इंग्रजी फौजेचा गोळा चालू झाला. पेशवेसरकार छत्रपतीसह सोलापुराकडे चालते झाले. आपल्या स्वारांची मांड हुकुमाची वाट पहात आहे. रामचंद्रपंत सुभेदार तर शत्रूशीं केव्हांच भिडले.

**बापूः**—श्रीमंत पळाले ! नशीबच तसं–उपाय नाहीं. गुरुमहाराज, येतों मीं ! आज या अष्टीच्या रणांत एक तर शत्रूला पुरती धूळ चारीन, नाहीं तर हा देह झुंजतां झुंजतां खालीं ठेवीन. शेवटीं निपाणकरानं डाव साधला. वेळापुरावर इंग्रज आल्याची वर्दी घोरपडे आणि बाबर यांनीं सकाळींच दिली असतां निपाणकर ती बातमी खोटी आहे म्हणाले. असो. परमेश्वर न्यायी आहे. स्वतःच्याच अन्नावर उठणाऱ्या या राक्षसांना काय शिक्षा द्यायची हें त्यानं केव्हांच ठरवून ठेवलं असेल. आज हीच प्रतिज्ञा. महाराज, स्वामिभक्तीसाठीं, स्वराज्याकरितां ही समशेर आजवर वागविली आहे. हा देहसुद्धां त्याचकरितां इतका पोसला आहे. आज मी मराठ्यांच्या रणकौशल्याची शिकस्त करणार. रणकल्लोळ माजविणार. या रणदेवतांनो, या–आज बापूचा पराक्रम पहा. आज मी स्वराज्याकारितां शेवटचा डाव खेळणार. शेवटचं हत्यार खेळणार. महाराष्ट्रा, तुझ्या नशिबाची परीक्षा या अष्टीच्या मैदानावर आहे. तुझ्याकरितां आज हा बापू प्रेताच्या राशीवर राशी पाडील. पण यश मिळवील. पण अपेशाचं जिणं केव्हांही दाखविणार नाहीं. बाबासाहेब,




दुसरे बाजीरावसाहेब मालकमसाहेबांच्या स्वाधीन झाले त्या ठिकाणची आणि त्याच्या आसपासची स्थिति दर्शविणारा नकाशा.

म. ग्रं. सं. ठाणे,
९०३
भा८क

हा तुमच्या बापूचा शेवटचा नमस्कार घ्या ! महाराष्ट्रा, या तुझ्या निःसीम पुत्राचं हें अखेरचं वंदन घे ! माझा मारुती घोडा आणि ही तलवार यांच्या जोरावर आज मी तुंबळ युद्ध करणार आणि समरचमत्कारानं सारं जग स्तंभित करणार ! बोला—हरहर महादेव. ( जातो. ) ( पडद्यांत बंदुकांचे बार आणि एकच गलगा. )

**ठाकुरदासबुवा**:—एक दैव अनुकूल नसलं कीं हे असले सद्गुणसुद्धां मातीमोल होतात. बापू, तूं खरोखरच महात्मा आहेस. पण या महाराष्ट्राची नी तुझी ऋणानुबंधानं पडलेली सांगड याच अष्टीच्या रणांगणावर तुटणार, आत्तां तुटणार. ( पडद्यांत बार. "बापू पडले" अशी एकच आरोळी ) हाय हाय ! परमेश्वरा आतां या महाराष्ट्राचं नशीब फुटलं खास.

( पडदा )

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**:—प्रांत नागपूर-स्थळ बोरीनजीक जंगलप्रदेश.

( इंग्रजी दरबार, बाजीराव साहेब आणि मालकम साहेब यांची भेट होण्याच्या आधीं. जंगलरस्त्यावर इंग्रजी शिपायांच्या बरोबर बाजीराव, पुरंदरे आणि विंचूरकर येतात. )

**कॅप्टन**:—हम् हुकूमका ताबेदार. फकत बाजीराव साबका तलवार रहनेका—बाकी सबका हत्यार खालीं होनेका. आबकू सरकारके साथ आनेका है तो आपके साथ हत्यार नही चाहिये. बिगर हत्यार चलो.

**बाजीराव**:—आबा, विठ्ठलराव, द्या—द्या त्या तुमच्या तलवारी त्याच्याकडे. आतां उगीच ओढून धरण्यांत काय फायदा ?

**विठ्ठलराव**:—सरकार काय सांगतां हें आपण आम्हांला ?

**आबा**:—मालकमच्या भेटीस आपण कैदी म्हणून जात नाहीं हें आहेना आपल्या लक्षांत ?

**बाजीराव**:—कसाही गेलों तरी आतां कांहीं लढाई तरी नाहींना द्यायची ? मग हीं हत्यारं घेऊन काय करायचीं ? मला तरी बुवा लढाईचा कंटाळा आला.

**आबा**:—सरकार, लढाईचा म्हणण्यापेक्षां पळण्याचा कंटाळा आपल्यास येईल तर खरोखर आम्हांला आनंद होईल. आपण थोडा धीर धरा. पहिल्या गोळ्यासरशीं आपण पळतां याला काय म्हणावं ? अझूनही इंग्रजांना पुरून उरेल इतका आमचा सरंजाम आहे. आपल्याच अन्नावर–आपल्याच सेवेसाठीं–आपल्याच सुखस्वास्थ्यासाठीं आजवर हा सरंजाम वाढला आहे. त्याचा उपयोग करून घ्या. तिकडे खानदेशांत त्रिंबकजी डेंगळ्यांनीं इंग्रजाला फारच भंडावून सोडलं आहे. रामदिनच्या घोडेस्वारांनीं इंग्रजांची कही बेजार झाली आहे, दवलतरावानंही हातपाय हालवायला सुरुवात केली आहे. वेळ वाईट आहे–स्थिति वाईट आहे–म्हणून का थोर पुरुष वाईट वर्तन करतील ? सरकार मारतां मारतां मरूं या–पण हें रांडरोटीकरितां म्हणून शरण जाणं नको. पुणं सुटलं–बापू गेले–छत्रपती कैद झाले–आईसाहेबही शत्रूच्या हातीं लागल्या–तरी पण अद्याप आम्ही आहोत. अद्याप आपण पेशवे आहांत. आपण म्हणजे महाराष्ट्राची अब्रू. आपल्यासाठीं वरिश्रींचं ठाण मांडणारे शूर गडी अद्याप आहेत. मग शरण जाण्याची गोष्ट कां काढतां ? आपल्यासाठीं आपल्या जीवाची परवा न करणारे अद्याप अनेक आहेत. मग असा त्रागा कां ? मालकमच्या भेटीस जाणार असाल तर मानानं चला. पेशवे म्हणून चला–कैदी म्हणून जाऊं नका. असं आपलं जाणं हें आम्हांला तरी मृत्यूपेक्षांही जास्त दु:खदायक होईल.

**बाजीराव**:—अहो पण त्यांनीं सगळ्या दिशा बांधल्या आहेत ना ? आतां तुमचा टिकाव तरी कसा लागणार ? नको बुवा–हें पेशवेपदहीं नको नी त्या लढायाही नकोत. पुरंदरे, विंचूरकर–उगीच विलक्षण हट्ट धरूं नका. चला एकदां इंग्रजांना हा पेशवाईचा बेदावा लिहून देऊं या–नको बाबा हीं कारस्थानं नी कारभार. एक क्षणाचीही फुरसत नाहीं, स्नानसंध्या करीन म्हटलं तर. इंग्रजांपुढं आमचा निभाव लागेल असं नाहीं मला वाटत.

**विंचूरकर**:—हा केवळ आत्मघात होतो आहे हां ?

**पुरंदरे**:—सरकार, आतां निर्वाणीचा प्रश्न. इंग्रजाला आमचा नायनाट करता